# समाजशास्त्र

## इयत्ता अकरावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# समाजशास्त्र

## इयत्ता अकरावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

Z1B5J1

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**समाजशास्त्र विषय समिती**
डॉ. वैशाली दिवाकर, अध्यक्ष
डॉ. वैशाली जोशी, सदस्य
डॉ. सुजाता गोखले, सदस्य
डॉ. प्रल्हाद माने, सदस्य
सौ. वर्षा सरोदे, सदस्य सचिव

**समाजशास्त्र अभ्यास गट**
डॉ. सलमा अजीज
श्री. आयवन जॉन
डॉ. व्यंकटेश खरात
डॉ. रेणुका बडवणे
श्री. चंद्रकांत खंडागळे
डॉ. प्रकाश खेत्री
श्री. अधिकराव हजारे
श्री. सुनील शिंदे
डॉ. हेमंत सोनकांबळे
श्री. मदनमोहन विश्वकर्मा
श्रीमती सुरेखा किनगांवकर
श्री. रोनाल्ड लुईस
श्री. गुणवंतराव काळगापुरे
डॉ. श्रीकांत पारखी
श्री. दयाशंकर वैद्य

**लेखक**
डॉ. वैशाली दिवाकर
डॉ. वैशाली जोशी
डॉ. विजय मारूलकर

**भाषांतर**
डॉ. चेतना देसाई
श्रीमती वैशाली वाघमारे

**मुख्य समन्वयक**
श्रीमती प्राची रवींद्र साठे

**मुखपृष्ठ व सजावट**
श्री. देवदत्त बलकवडे

**अक्षरजुळणी**
डी.टी.पी. विभाग,
बालभारती, पुणे

**कागद**
७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**
N/PB/2019-20/QTY.- 20,000

**मुद्रक**
M/s. Sohail Enterprises, Thane

**संयोजक**
सौ. वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**
श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी

श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी

श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**
श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# – प्रस्तावना –

विद्यार्थी मित्रहो,

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जगात अनेकदा सामाजिक शास्त्रे आणि प्रामुख्याने समाजशास्त्र या विषयाचा अभ्यास का करायचा हा प्रश्न पडतो. तुमचे मित्र, नातेवाईक तर नक्कीच तुम्हांला हा प्रश्न विचारतील, की समाजशास्त्रात तुम्ही कशाचा अभ्यास करता? थोड्या संदिग्ध सुरात तुम्ही सांगाल, की आम्ही समाजाचा अभ्यास करतो आणि मग प्रश्नांची फैरीच झडेल, की समाजाचा वेगळा अभ्यास करण्याची गरज काय? आपण आपला समाज ओळखत नाही का? या पुस्तकातून तुम्हांला या प्रश्नांची ठोस उत्तरे देता येतील, अशी आम्हांला नक्की खात्री आहे.

आज वैज्ञानिक माहिती व तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे आपलं आयुष्य खूपच सोपे झाले आहे असे वाटत असतानाच आपल्याला जाणवते, की एक चांगलं सुजाण आयुष्य जगण्यासाठी केवळ तंत्रज्ञान उपयोगी नाही. मानवाला आपल्या आसपासच्या घटनांचा अर्थ लावण्याची, ते सहजपणे समजून घेण्याची नितांत गरज असते.

अनेक समाजशास्त्रज्ञांना असे वाटले होते, की तंत्रज्ञानामुळे या सामजिक आंतरक्रिया शुष्क, मानवविरहित होतील व समाजाची वीण बदलेल. काही प्रमाणात ही भीती खोटी ठरली. आपल्यातील सामाजिक देवाण-घेवाणीचे स्वरूप बदलले. ते अधिक गुंतागुंतीचे बनायला लागले. याचे स्वरूप समजून घेण्यासाठी केवळ तंत्रज्ञान पुरेसे नसून समाजशास्त्रासारख्या विषयाची गरज अधिक प्रकर्षाने भासू लागली. समाजशास्त्र वैयक्तिक गोष्टींवर भर न देता प्रश्नांच्या ‘सामाजिक’ बाजूंवर जास्त भर देते. त्याचप्रमाणे, आज जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, स्थलांतर या प्रक्रियांमुळे कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म यांमध्ये अमूलाग्र बदल होत आहेत. संकरित संस्कृती हे आजच्या काळाचे वैशिष्ट्य बनले आहे. हे परिवर्तन समजून घेण्यामध्ये समाजशास्त्र मदत करते.

इयत्ता ११ वीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विविध महत्त्वाच्या संकल्पनांचा आणि पायाभूत समाजशास्त्रीय मांडणीचा समावेश केला आहे. यांमधून आपले दैनंदिन व्यवहार सामाजिक जडणघडणींमधून बनलेले असतात हे समजायला मदत होईल. थोडक्यात, या विषयाद्‌वारे समाजातील विविधता समजून घेतली जाते आणि त्या वैविध्यतेचा आदर केला जातो.

अध्ययन अधिक सुलभ, रंजक व कृतीयुक्त होण्यासाठी तुम्हांला माहितीपर चौकटी, विविध कृती, क्यू.आर. कोडवर देण्यात येणारे साहित्य याचा निश्चितच उपयोग होईल.

समाजशास्त्रामध्ये चिकित्सात्मक आणि विश्लेषणात्मक अभ्यासासाठी आवश्यक कौशल्ये विकसित केली जातात. ही कौशल्ये आज मोठ्या प्रमाणावर मानव संसाधन विकास क्षेत्रांमध्ये, बिगरशासकीय संस्था, पत्रकारिता, प्रसारमाध्यमे, नियोजन आणि विकास, सामाजिक संशोधन, शासकीय धोरणनिर्मिती प्रक्रियेमध्ये वापरली जातात. समाजशास्त्राच्या ज्ञानामुळे अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध होतील. आम्हांला अशी आशा आहे, की सामाजिक वास्तवाकडे अधिक समतोल पद्‌धतीने बघण्याचा दृष्टिकोन यामुळे तुम्हांला मिळेल.

**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१

## – शिक्षकांसाठी –

११ वी चा समाजशास्त्र हा विषय अध्ययनार्थ्यांना समाजशास्त्राच्या रोमांचक ज्ञानक्षेत्राची ओळख करून देतो. या विषयाशी संबंधित अशी धारणा आहे, की हा सामान्यज्ञानावर आधारित आहे. परंतु, हा विषय आपल्या दैनंदिन वास्तवाशी जोडला आहे. यासाठीच शिक्षकांनी समाजशास्त्रीय संकल्पना आणि दैनंदिन जीवनातील साम्यस्थळे, दुवे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे अत्यावश्यक आहे. समाज आणि मानवी सामाजिक संबंध यांचा अभ्यास खालील अनुदेशनात्मक तंत्रे वा पद्धती वापरून जीवंत करता येईल.

- **सहयोगी अध्ययन** : प्रभावी, सर्जनशील आणि आनंददायी अध्ययन अनुभवांसाठी सहयोगी अध्ययन तंत्रांचा वापर करता येईल. उदा., विचार-जोडी, देवाणघेवाण, जिगसॉ, वर्तुळाच्या आत-बाहेर, इ.

- **यु-ट्यूब वरील दुव्यांवर आधारित चर्चा** : शिक्षकाने स्वतः आधी youtube वरील चित्रफिती पहाणे गरजेचे आहे. (Whats App) समाज माध्यमांच्या मदतीने विद्यार्थ्यांना हे दुवे (links) द्यावेत. अथवा संगणक प्रयोग शाळेतील फलकावर link लिहावी. या चित्रफितीनंतर वर्गात चर्चा अथवा लेखी कार्य द्यावे.

- **छोट्या गटातील चर्चा** : तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे छोटे गट तयार करावेत. सर्व गटांना ३ ते ४ मिनिटे चिंतन/विचार करण्यासाठी एखादा विषय द्यावा. त्यानंतर १० मिनिटे गटचर्चेसाठी वेळ द्यावा. प्रत्येक गटाचा प्रतिनिधी आपल्या चर्चेतील ३ महत्त्वाचे मुद्दे संपूर्ण वर्गासमोर सादर करेल. शिक्षक फलकावर अध्ययन मुद्द्यांचा सारांशरूपाने आढावा घेतील.

- **समवयस्कांसोबत/सहाध्यायी अध्ययन** : पाठ्यक्रमाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या संबंधित असलेल्या आपल्या आवडीच्या एखाद्या विषयावर विद्यार्थी PPT तयार करतील. त्याचे वर्गात सादरीकरण करतील. शिक्षक त्याप्रसंगी इतर पूरक माहिती पुरवतील.

- **वादविवाद** : अनेक घटकांना विविध पैलू असतात व ते चर्चेचे सहज विषय बनतात. या विषयांआधारे वर्गात औपचारिक वादविवाद सादर करता येईल.

- **मुलाखत** : एखाद्या विषयावरील छोट्या सर्वेक्षणाच्या (नमुना संख्या-५) आधारे अहवाल लेखन करता येईल.

- **क्षेत्रभेट** : एखादा छोटा गट बिगरशासकीय संस्था (NGO) अथवा खेडे अथवा आदिवासी क्षेत्र वा वस्तूसंग्रहालय अशा ठिकाणांना भेट देईल. मोबाइल फोनच्या मदतीने छोटी चित्रफित बनवून वर्गात सादर करता येईल अथवा अहवाल लेखन करता येईल. वर्गातील सादरीकरणानंतर त्यावर आधारित चर्चेचे नियोजन करता येईल.

- **कृतीपत्रिका/स्वाध्याय** : प्रत्येक घटकाअंती, उजळणी स्वरूपाचा स्वाध्याय संपूर्ण वर्गासाठी आयोजित करता येईल. या स्वाध्यायावर वर्गात चर्चा घेता येईल किंवा गृहपाठ म्हणूनही देता येईल.

प्रत्येक घटकांअंती, नमुन्यादाखल प्रश्न दिले आहेत, हे सर्वसमावेशक नाहीत. विद्यार्थी व शिक्षक प्रश्नपेढी तयार करतील अशी अपेक्षा आहे. प्रश्नांचे स्वरूपही विविधांगी असावे. प्रत्येक घटकाला सारखा भारांश दिला आहे. शिक्षकांनी सर्जनशील प्रश्न विचारावे जेणेकरून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, स्वअभिव्यक्तीला वाव मिळेल. विद्यार्थ्याने केवळ पाठांतरापेक्षा मिळवलेल्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करावा असे अपेक्षित आहे. यासाठी संकल्पना चित्रे, स्वअभिव्यक्तीचे प्रश्न, उताऱ्यावरील प्रश्न यांचा समावेश करण्यात आला आहे.

समाजशास्त्राचा अभ्यास आनंददायी व स्मरणीय बनवा. खूप शुभेच्छा!

## क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | समाजशास्त्राची ओळख | • समाजशास्त्राचा अर्थ, स्वरूप आणि उदय स्पष्ट करता येणे.<br>• समाजशास्त्राचे महत्त्व व उपयोजितता यांची चिकित्सा करता येणे. |
| २. | पाश्चिमात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान | • समाजशास्त्राच्या विकासातील पाश्चिमात्य व भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान जाणून घेता येणे.<br>• पाश्चिमात्य व भारतीय समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या संकल्पना व सिद्धांतांचे महत्त्व स्पष्ट करता येणे. |
| ३. | समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना | • समाजशास्त्रातील पायाभूत संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• व्यक्ती आणि समाज यांच्यातील सहसंबंधाची चिकित्सा करता येणे.<br>• सामाजिक संरचनेचे घटक स्पष्ट करता येणे.<br>• सामाजिक संरचनेच्या घटकांचे वर्गीकरण करून त्यांची तुलना करता येणे. |
| ४. | सामाजिक संस्था | • सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप जाणून घेणे.<br>• व्यक्तीच्या सामाजिक जडणघडणीतील सामाजिक संस्थांच्या भूमिकेचे चिकित्सक विश्लेषण करता येणे. |
| ५. | संस्कृती | • मानवी संस्कृती म्हणजे काय हे जाणून घेऊन मानवी जीवनातील संस्कृतीचे महत्त्व यांची चर्चा करणे.<br>• संस्कृतीचे विविध प्रकार व घटक यांचे वर्गीकरण करता येणे आणि त्यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करता येणे.<br>• संस्कृतींमधील विविधतेचे आकलन करणे.<br>• संस्कृतीचे संकरण जाणून घेणे. |
| ६. | सामाजीकरण | • सामाजीकरणाची प्रक्रिया जाणून घेणे.<br>• सामाजीकरण घडवून आणणाऱ्या संस्थांची तुलना करणे.<br>• सामाजीकरण घडवून आणणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करणे. |
| ७. | सामाजिक स्तरीकरण | • सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप स्पष्ट करता येणे.<br>• सामाजिक स्तरीकरणाच्या विविध निर्धारकांचा शोध घेता येणे.<br>• सामाजिक स्तरीकरणाचे परिणाम स्पष्ट करता येणे. |
| ८. | सामाजिक परिवर्तन | • सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व वैशिष्ट्ये स्पष्ट करता येणे.<br>• सामाजिक परिवर्तनाचे घटक ओळखता येणे.<br>• सामाजिक परिवर्तनासंबंधी विधायक अभिवृत्ती बाळगणे. |

# अनुक्रमणिका

## विभाग – १


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | समाजशास्त्राची ओळख | १ |
| २. | पाश्चिमात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान | १२ |
| ३. | समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना | २२ |
| ४. | सामाजिक संस्था | ३६ |
| ५. | संस्कृती | ५३ |
| ६. | सामाजीकरण | ६५ |
| ७. | सामाजिक स्तरीकरण | ७५ |
| ८. | सामाजिक परिवर्तन | ८६ |
| | **विभाग – २** | |
| | उतारे | ९७ |

# १. समाजशास्त्राचा परिचय

**१.१ समाजशास्त्र – व्याख्या आणि स्वरूप**
**१.२ समाजशास्त्र – उगम आणि व्याप्ती**
**१.३ समाजशास्त्राचे महत्त्व**

## प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये आपण समाजशास्त्र ही एक स्वतंत्र विद्याशाखा कशी आहे हे शिकणार आहोत. समाजशास्त्राचे स्वरूप आणि व्याप्ती याचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा हा या प्रकरणाचा उद्‌देश आहे.

युरोपमधील १८ व्या व १९ व्या शतकांतील सामाजिक, बौद्धिक परिस्थिती आणि समाजशास्त्राचा उगम यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला गेला आहे. एक विद्याशाखा म्हणून समाजशास्त्राचा उगम युरोपमध्ये झाला.

समाजशास्त्र ही एक स्वतंत्र विद्याशाखा म्हणून १९ व्या शतकाच्या मध्यात उदयास आली. समाजशास्त्राच्या उदयानंतर मानवी समाजाचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोन बदलला. समाजशास्त्र हे एक स्वतंत्र ओळख असलेले नवीन सामाजिक शास्त्र म्हणून उदयाला आले.

समाजशास्त्र हे प्रामुख्याने मानवी समाजाचा अभ्यास करते. म्हणून 'समाजाचे शास्त्र' अशी त्याची ओळख निर्माण झाली. समाजशास्त्र हे एक सामाजिकशास्त्र आहे. त्याची स्वतंत्र ओळख आहे म्हणूनच आज जगात सर्वत्र समाजशास्त्राचे महत्त्व आणि व्यावहारिक उपयुक्तता निर्विवादपणे मान्य होत आहे.

समाजशास्त्रात मुख्यत्वेकरून मानवी जीवन, मानवी क्रिया यांचा अभ्यास केला जातो. मानवी समाजाचा उदय, विकास आणि मानवी समाजाची संरचना आणि कार्य यांच्या अभ्यासाला महत्त्व दिले जाते. सामाजिक जीवनातील विविध घटकांमधील परस्परसंबंध आणि परस्परावलंबनाचा विचार समाजशास्त्र करते. हे शास्त्र समाजातील स्थिरता आणि परिवर्तन, उत्क्रांती आणि क्रांती या घटकांवरही प्रकाश टाकते.

समाजशास्त्र हे स्वतंत्र सामाजिकशास्त्र असून सामाजिक घटनांचा शास्त्रीय अभ्यास करते. थोडक्यात हे एक सामाजिक संबंध आणि सामाजिक वर्तनाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.

## १.१ समाजशास्त्राची व्याख्या आणि स्वरूप

समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र असून यात सामाजिक संबंध आणि मानवी समाजाचा अभ्यास केला जातो. तसेच सामाजिक संबंध, त्याचे प्रकार, विविधता, सामाजिक समूह, सामाजिक संरचना, सामाजिक दर्जा, सामाजिक नियमने, सामाजिक समस्या, समाजाचे बदलते स्वरूप इत्यादी अनेक गोष्टींचा अभ्यास यात केला जातो.

समाजशास्त्र म्हणजे काय? या प्रश्नाचे अत्यंत साधे व सोपे उत्तर असे की, समाजशास्त्र म्हणजे 'समाजात राहणाऱ्या माणसांचा अभ्यास' किंवा समाजशास्त्र म्हणजे 'सामाजिक घटनांचा शास्त्रीय अभ्यास'. समाजशास्त्राची अचूक व्याख्या समजावून घेण्यासाठी आपल्याला समाजशास्त्र या शब्दाची व्युत्पत्ती कशी झाली हे समजावून घ्यावे लागेल.

फ्रेंच तत्त्ववेत्ता 'ऑगस्ट कॉम्त' यांना समाजशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते. Sociology हा इंग्रजी शब्द १८३९ मध्ये प्रथम

वापरल्याचे श्रेय ऑगस्ट कॉम्त यांना दिले जाते. त्यांनी 'Positive Philosophy' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या चौथ्या आवृत्तीत त्यांनी प्रथम 'समाजशास्त्र' ही संज्ञा वापरली.

लॅटीन भाषेतील 'Socius' व ग्रीक भाषेतील 'Logos' या शब्दांपासून 'Sociology' ही संज्ञा तयार झाली. Socius म्हणजे सहकारी किंवा सहयोगी होय. कालांतराने Socius हा शब्द समाज या अर्थाने वापरला जाऊ लागला. Logos म्हणजे शास्त्र किंवा अभ्यास. म्हणजेच समाजशास्त्राचा शब्दशः अर्थ 'समाजाचे शास्त्र' असा होतो. सुरुवातीला कॉम्त यांनी या शास्त्रास 'सामाजिक पदार्थविज्ञान' ही संज्ञा वापरली. नंतर त्याला समाजशास्त्र हे नाव दिले गेले. त्यांनी सामाजिक घटनांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारे समाजशास्त्र हे नवीन शास्त्र शोधले.

### १.१.१ व्याख्या

१. ***ऑगस्ट कॉम्त :*** "सामाजिक व्यवस्था आणि प्रगतीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र."

२. ***जॉर्ज सिमेल :*** "समाजशास्त्र हे मानवी आंतरसंबंधांच्या स्वरूपाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे."

३. ***ऑक्सफर्ड डिक्शनरी :*** "समाजशास्त्र म्हणजे मानवी समाजाचा विकास, संरचना आणि कार्य यांचा अभ्यास होय."

या व्याख्यांचे विश्लेषण करताना असे लक्षात येते की, बहुतेक समाजशास्त्रज्ञांच्या मते, सामाजिक संबंध आणि सामाजिक घटना हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे. समाजशास्त्र आणि त्याचा अभ्यासविषय यांचे स्वरूप अत्यंत व्यापक व गुंतागुंतीचे आहे. त्यामुळे समाजशास्त्राची एक सर्वमान्य अशी व्याख्या करता येत नाही. तरीदेखील, वरील व्याख्यांवरून सामान्यपणे पुढील तीन मुद्दे दिसून येतात.

१. वरील सर्व व्याख्यांमध्ये समाजशास्त्राच्या शास्त्रीय स्वरूपावर भर दिला आहे.

२. या व्याख्यांमध्ये मानव आणि समाज यांच्यातील संबंधांवर भर दिला आहे.

३. या व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, समाजशास्त्र हे एक गुंतागुंतीचे शास्त्र असून इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा वेगळे आहे.

**समाजशास्त्रीय कल्पनाविस्तार म्हणजे काय?**

समुद्रातील माशांना सागरी जीवशास्त्र किंवा समुद्री लहरींबाबत काही समज असते का?– बहुधा नाही. आपल्या बऱ्याच जणांचं या माशांसारखच असतं. ज्या समाजात आपण राहतो व ज्या संस्कृतीचे पाईक असतो तिची नीट समज आपल्याकडे नसते. आपल्या भोवतालच्या परिस्थितीचे आकलन होण्यासाठी सामान्यज्ञानाच्या पलीकडे जाऊन सखोल विचार करणे आवश्यक असते. आपल्या दैनंदिन जीवनाचा अर्थ चांगल्या प्रकारे समजण्यासाठी समाजशास्त्रीय कल्पनाविस्तार हे उपयुक्त साधन आहे.

१९५९ मध्ये सी.राईट मिल्स् यांनी 'The Sociological Imagination' हे पुस्तक लिहिले. मिल्स् यांच्या मते, ज्यांच्याकडे उत्तम प्रकारचे समाजशास्त्रीय ज्ञान असते, त्यांच्याकडे एक खास वैचारिक दृष्टीही असते. या समाजशास्त्रीय कल्पनाविस्ताराच्या दृष्टीमुळे व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवनातील परस्परसंबंध चांगल्या प्रकारे समजतो. मिल्स् यांच्या मते आपल्या व्यक्तिगत समस्यांचे आकलन होण्याबरोबरच त्यांना सामाजिक संदर्भ लावून त्या सोडवण्यासाठी लागणारा कृतिशील दृष्टिकोन समाजशास्त्रीय कल्पनाविस्तारामुळे आपल्याला मिळतो.

### १.१.२ समाजशास्त्राचे स्वरूप

समाजशास्त्र ही एक ज्ञानशाखा असून ती मानवाचे सामाजिक जीवन आणि समाजाचे विस्तृत ज्ञान देते. समाजशास्त्र हे इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा अनेक बाबतींत वेगळे आहे. समाजशास्त्राचे स्वरूप समजून घेण्यासाठी खालील मुद्दे पाहणे आवश्यक आहे.

१. **समाजशास्त्र एक अनुभवाधिष्ठित विज्ञान आहे:** समाजशास्त्रामध्ये सामाजिक तथ्यांचा अभ्यास आणि विश्लेषण हे वैज्ञानिक पद्धतीच्या साहाय्याने केले जाते. हे शास्त्र केवळ आरामखुर्चीत बसून केलेल्या तात्त्विक चिंतन किंवा विचारांवर आधारित नाही. तर निरीक्षण, प्रयोग, परीक्षण अशा वैज्ञानिक प्रक्रियांच्या माध्यमातून समाजशास्त्रात नियम मांडले जातात. अनुभवाधिष्ठितता हे समाजशास्त्राचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते.

> **अनुभवाधिष्ठिततावाद**
>
> या वैचारिक दृष्टिकोनानुसार मानवी ज्ञान हे अनुभवाच्या आधारेच साध्य करता येते. अनुभवाधिष्ठिततावादानुसार ज्ञान हे संशोधकांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असते.

२. **समाजशास्त्र हे एक सैद्धांतिक आणि उपयोजित विज्ञान आहे :** समाजशास्त्रीय सिद्धान्ताची निर्मिती आणि विकास अत्यंत पद्धतशीरपणे झालेला आहे. जुन्या सिद्धान्ताचे परीक्षण करणे आणि नवीन सिद्धान्ताची निर्मिती करणे ही प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. समाजशास्त्र हे एक शुद्ध सैद्धांतिक शास्त्र म्हणून ओळखले जात होते, परंतु आता मात्र समाजशास्त्र हे केवळ एक सैद्धांतिक शास्त्र राहिलेले नाही तर समाजशास्त्राच्या विविध शाखा या सामाजिक ज्ञानाच्या उपयोजनावर आधारलेल्या असून त्यांचा समाजात मोठा उपयोग होत आहे. म्हणजेच समाजशास्त्र हे शुद्ध विज्ञान आहे. तसेच ते एक उपयोजित विज्ञानही आहे.

३. **समाजशास्त्र हे तथ्यांवर आधारित विज्ञान आहे :** समाजशास्त्राचा उद्देश हा समाजातील सत्य घटनांचा शोध घेणे हा आहे. समाजात जे जसे घडते तसा त्याचा अभ्यास केला जातो. समाजात 'काय असले पाहिजे' यापेक्षा 'काय आहे' याचा विचार समाजशास्त्रात केला जातो. उदा., समाजशास्त्रात समाजातील संघटनात्मक आणि विघटनात्मक घटकांचा अभ्यास केला जातो. तसेच नैतिक-अनैतिक घटकांचाही अभ्यास केला जातो.

४. **समाजशास्त्र हे समग्र विज्ञान आहे :** समाजशास्त्र संपूर्ण समाजाचा अभ्यास करते. यात समाजातील फक्त एखाद्या विशिष्ट भागाचाच अभ्यास केला जात नाही तर सामाजिक जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास केला जातो.

## १.२ समाजशास्त्र – उदय आणि व्याप्ती

### १.२.१ समाजशास्त्राचा उदय

समाजशास्त्राच्या उदयाची प्रक्रिया समजावून घेण्यासाठी आपल्याला समाज आणि त्या त्या काळातील विचार यांतील संबंध जाणून घेणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक कालखंडातील सामाजिक परिस्थिती आणि त्यात निर्माण होणारे विचार यांच्यामध्ये संबंध असतो आणि त्या काळावर त्याचा प्रभाव असतो. तसेच त्यांच्यात सुसूत्रता असते.

सुरुवातीच्या काळातील समाजशास्त्रज्ञांनी ज्या कल्पना किंवा विचार केला त्यांचे मूळ हे युरोपातील सामाजिक परिस्थितीमध्ये दिसून येते. युरोपमधील फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीमुळे जे

प्रचंड आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तन झाले त्यातून समाजशास्त्राचा एक शास्त्रीय विद्याशाखा म्हणून उदय झालेला आपल्याला दिसून येतो. या बदलांच्या कालखंडाला युरोपमधील 'प्रबोधनाचा कालखंड' असे म्हटले जाते. कारण याच काळात १८ व्या शतकातील फ्रेंच तत्त्ववेत्यांच्या विचारांना मूर्त, प्रकट रूप प्राप्त झाले.

प्रबोधनकाळात पारंपरिक विचार प्रक्रियेत टोकाचे बदल झाले व विचार करण्याच्या आणि वास्तवाकडे बघण्याच्या नवीन पद्धती पुढे आल्या. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे व्यक्ती नवीन दृष्टिकोनातून बघू लागल्या. वैज्ञानिक आणि विवेकवादी विचारांना महत्त्व प्राप्त झाले. फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीच्या काळात जी वैज्ञानिक आणि व्यावसायिक क्रांती झाली त्यातून एक नवीन दृष्टिकोन निर्माण झाला. त्यातूनच समाजशास्त्राचा उदय झाला.

**प्रबोधन काळ**

प्रबोधन काळ म्हणजे युरोपीय विचारांचा असा कालखंड की ज्यात कारणमीमांसा, अनुभव, धार्मिक आणि पारंपरिक अधिकारांना आव्हान दिले गेले आणि त्यातून धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी आणि लोकशाही मूल्ये असणारा समाज निर्माण झाला. या काळामध्ये बौद्धिक घटकांमुळे प्रत्यक्षवादी/विज्ञानवादी, तर्कशुद्ध, विवेकवादी व शास्त्रीय विचारांना महत्त्व प्राप्त झाले. त्यांनीही कार्यकारण संबंधांवर भर दिला. या बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंतांमध्ये प्रामुख्याने थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, रूसो, मॉंटेस्क्यु, फ्रान्सिस बेकन, सिसेरो, मॅकिअॅव्हली इत्यादी विचारवंतांचा समावेश करता येतो.

औद्योगिक क्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांतीने जुन्या युरोपातील प्रत्येक गोष्टीला आव्हान उभे केले. वर्गांची पुनर्रचना झाली, जुनी वर्ग व्यवस्था मागे टाकून नवीन वर्ग निर्माण झाले. धर्माला आव्हान निर्माण झाले. धर्माचे महत्त्व कमी होऊ लागले. कौटुंबिक संरचना, मूल्ये बदलली. महिलांच्या स्थानात बदल होऊ लागला. राजेशाही नष्ट होऊन लोकशाहीचा उदय झाला. धर्म, समुदाय, सत्ता, संपत्ती आणि समाजाची संकल्पना देखील बदलली.

या सर्वांतून निर्माण झालेल्या सामाजिक परिस्थितीतून समाजशास्त्राचा उदय कसा झाला हे आपण पाहू. सामाजिक परिस्थिती, व्यावसायिक आणि वैज्ञानिक क्रांती, बौद्धिक शक्तींचा प्रभाव, औद्योगिक आणि फ्रेंच राज्यक्रांती या सर्व घटनांच्या परिणामांमुळे युरोपमध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले व त्यातूनच समाजशास्त्राचा उदय झाला.

## समाजशास्त्राच्या निर्मितीवर प्रभाव टाकणारे घटक

१. **व्यापारी क्रांती :** सन १४५० ते १८०० या काळात घडलेल्या अनेक घटनांची मालिका म्हणजे ही क्रांती होय. या सर्व घटनांमुळे युरोपमधील मध्य युगातील कुंठित आणि उपजीविकेपुरती असणारी अर्थव्यवस्था बदलू लागली. व्यावसायिक क्रांती म्हणजे उद्योग आणि आर्थिक व्यवहारांत वाढ होऊन मोठ्या प्रमाणात उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे युरोपीय देशांची आर्थिक व राजकीय सत्ता निर्माण झाली. उद्योगासाठी भूमार्गापेक्षा सागरी मार्गांना अधिक पसंतिक्रम मिळू लागला. युरोपमधील बाजारात पूर्वेकडून आलेल्या उत्पादित माल, मसाले आणि कापडाची रेलचेल दिसू लागली.

बँक सेवा अधिकाधिक विस्तारित होऊ लागली. आर्थिक क्रांतीचे हे द्योतक होते. कागदी चलन अस्तित्वात आले. या सर्व क्रांतीकारी बदलांमुळे मध्यम वर्गाची निर्मिती होऊन त्यांनाही आर्थिक सत्तेत सहभागी होता येऊ लागले हा अत्यंत महत्वाचा बदल होता.

या सर्व बदलांचा परिणाम म्हणून समाजातील सामाजिक संबंधांमध्ये बदल होऊ लागले. या सर्व बदलांचे स्वरूप आणि प्रकार हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय बनला.

२. **औद्योगिक क्रांती :** इंग्लंडमध्ये १८ व्या शतकामध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडून आले. प्रथम इंग्लंडमध्ये, नंतर इतर युरोपीय देशांमध्ये आणि नंतर इतर खंडांमध्ये हे बदल दिसू लागले. औद्योगिक क्रांती ही एक अशी घटना होती की जिचा युरोपमधील सर्व सामाजिक क्षेत्रांवर प्रभाव पडला.

औद्योगिक क्रांतीमुळे अनेक नवनवीन साधने, यंत्रे व तंत्रज्ञानात सुधारणा होत होत्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन होत होते. १७६० ते १८३० च्या दरम्यान यंत्रसामग्री, तंत्रज्ञान आणि उत्पादनाच्या व्यवस्थेमध्ये नवीन शोधांची मालिकाच निर्माण झाली होती. ज्याच्या परिणामार्थ कारखाना उत्पादन पद्धती निर्माण झाली.

**सरंजामशाही व्यवस्था** → **भांडवलशाही व्यवस्था**

या आर्थिक बदलांमुळे सरंजामशाही मागे पडून भांडवलशाही पद्धती निर्माण झाली. भांडवलदारांचा नवीन वर्ग निर्माण झाला. त्यांनी औद्योगिक व्यवस्था आपल्या नियंत्रणात ठेवली. औद्योगिक क्रांतीमुळे समाजात मोठा बदल झाला. जुन्या घरगुती उत्पादित वस्तूंकडून नव्या यंत्रोत्पादित वस्तूंकडे वाटचाल सुरू झाली. अशा प्रकारे औद्योगिक क्रांतीचा संपूर्ण समाजावर खूप प्रभाव पडला होता.

**संघ पद्धती :** संघ पद्धती म्हणजे १३ व्या शतकात युरोपमध्ये प्रचलित असलेली एक वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन पद्धत होती.

संघ पद्धतीचा अस्त, कारखाना पद्धतीचा उदय, कामगारांची श्रमविभागणी, ग्रामीण-नागरी स्थलांतर, वर्ग व्यवस्था, कामगार संघटना, आर्थिक असमानता आणि लोकशाही पद्धती हे सर्व औद्योगिक क्रांतीचे दृश्य, अदृश्य परिणाम होते.

या सर्व प्रक्रियेत खूप मोठ्या प्रमाणावर ग्रामीण-नागरी स्थलांतर घडून आले. या सर्वांचा हेतू कारखान्यात काम करण्याचा होता. कारखान्यांना आणि नव्याने निर्माण होणाऱ्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेला विविध सेवा पुरवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नोकरशाही निर्माण झाली. या अर्थव्यवस्थेत मुक्त बाजारपेठ ही कल्पना होती ज्यामुळे तिथे कारखान्यातून उत्पादित झालेली अनेक उत्पादने विनिमयासाठी उपलब्ध होती.



औद्योगिक क्रांती

औद्योगिक क्रांती, भांडवलशाही आणि त्यांच्या विरोधात निर्माण होणाऱ्या विविध प्रतिक्रिया या सर्व गोष्टींमुळे पाश्चात्त्य समाजात मोठ्या प्रमाणावर उलथापालथ होत होती, त्याचा समाजशास्त्रज्ञांवर खूप प्रभाव पडला. हे सर्व बदल आणि त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या अभ्यासात ऑगस्ट कॉम्त, एमिल डरखाईम, कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, जॉर्ज सिमेल हे सर्व समाजशास्त्रज्ञ व्यस्त होते.


या क्रांतीतून निर्माण झालेल्या पुढील महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा अभ्यास समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता.

अ) कामगारांची स्थिती

ब) संपत्तीचे हस्तांतरण

क) नागरीकरण

**३. फ्रेंच राज्यक्रांती :** समाजशास्त्राच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरलेला घटक म्हणजे १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीने सुरू केलेली राजकीय क्रांतीची मालिका होय. प्रामुख्याने फ्रेंच समाजात निर्माण झालेल्या अव्यवस्था व अराजकतेमुळे या काळातले अनेक विचारवंत अस्वस्थ झाले होते.



फ्रेंच राज्यक्रांती

समाजाचे पुनर्संघटन करण्यासाठी काही विचारवंत एकत्र आले होते. १८ व्या व १९ व्या शतकांतील राजकीय क्रांतीमुळे समाजात जे अराजक व असंघटन निर्माण झाले होते ते दूर करून समाजाची नव्याने घडी बसवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सामाजिक व्यवस्था हा शास्त्रीय समाजशास्त्रज्ञांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला होता. यात ऑगस्ट कॉम्त आणि एमिल डरखाईम यांसारखे विचारवंत अग्रगण्य होते.

सन १७८९ मध्ये झालेली फ्रेंच राज्यक्रांती हा स्वातंत्र्य आणि समता यांसाठीच्या मानवी लढ्याच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. यामुळे सरंजामशाहीचा अंत होऊन नवीन समाजव्यवस्था अस्तित्वात आली. या क्रांतीमुळे फक्त फ्रान्समध्येच नाही तर संपूर्ण युरोपमध्ये दूरगामी बदल झाले. या क्रांतीतून पुढे आलेल्या संदेशामुळे भारतासारखे देशही प्रभावित झाले. भारताच्या राज्यघटनेच्या प्रास्ताविकातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये फ्रेंच राज्यक्रांतीतूनच ज्ञात झालेली आहेत.

**४. वैज्ञानिक क्रांती :** पुनरुज्जीवनाच्या कालखंडात युरोपमध्ये वैज्ञानिक क्रांती घडून आली. सर्वच क्षेत्रांत विज्ञानावर भर देण्यात आला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत तांत्रिक विकासाचा प्रभाव दिसून येत होता. विज्ञानाला सर्वत्र उच्च प्रतिष्ठा व दर्जा प्राप्त होत होता व विज्ञानाशी संबंधित क्षेत्रांतील व्यक्तींना सर्वांत यशस्वी मानून त्यांना समाजात खूप प्रतिष्ठा मिळत होती.

वैज्ञानिक क्रांतीचा प्रभाव हा फक्त मानवी जीवनातील भौतिक बदलांपुरताच नव्हता तर तो निसर्ग आणि समाजाबद्दलच्या कल्पनांवरही परिणाम करत होता.

युरोपमधील समाजशास्त्राचा उदय हा विज्ञानाच्या शोधांचा आणि कल्पनांचाच एक भाग आहे असे मानले जात होते. सुरुवातीच्या काळातील समाजशास्त्रज्ञांचा असाच आग्रह होता की, समाजशास्त्राची रूपरेषा ही भौतिकशास्त्र किंवा जीवशास्त्रासारख्या नैसर्गिक विज्ञानांप्रमाणे असावी.

प्रबोधनाचा कालखंड हा वैज्ञानिक क्रांतीचा साक्षीदार होता. मानवी जीवनातील सर्व गरजा भागवण्याचे एक साधन म्हणून विज्ञानाकडे बघितले जात होते. नवीन वैज्ञानिक शोधांमुळे अंधश्रद्धांचे उच्चाटन होत होते. समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यामध्ये या कालखंडाचे योगदान महत्त्वाचे आहे.

**५. नागरीकरण :** औद्योगिक क्रांतीचा एक परिणाम म्हणजे लोक मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातून शहरात स्थलांतरित होत होते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे औद्योगिक क्रांतीमुळे शहरात उपलब्ध होत असलेल्या नोकऱ्या हे होय. या

स्थलांतर व शहरांच्या वाढीचा परिणाम म्हणून शहरांत असंख्य समस्या व प्रश्न निर्माण झाले. उदा., अतिरिक्त गर्दी, प्रदूषण, वाहतूक, आरोग्यविषयक प्रश्न, झोपडपट्ट्यांची वाढ इत्यादी.

शहरी जीवनाचे स्वरूप आणि समस्या यांकडे मॅक्स वेबर आणि जॉर्ज सिमेल यांसारखे इतर अनेक समाजशास्त्रज्ञ आकर्षित झाले. पहिले अमेरिकन समाजशास्त्रीय विचारपीठ शिकागो स्कूल हे नागरीकरणाच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी निर्माण झाले.

**उपक्रम – १**

व्यापारी, वैज्ञानिक, औद्योगिक आणि फ्रेंच राज्यक्रांती हे समाजशास्त्राच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण घटक आहेत याचा अभ्यास आपण केला. भारताच्या संदर्भात औद्योगिक विकासाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम जाणून घ्या.

### १.२.२ समाजशास्त्राची व्याप्ती

एखाद्या विषयाची व्याप्ती म्हणजे त्याची अध्ययन कक्षा किंवा क्षेत्र होय. तसेच विषयाची व्याप्ती म्हणजे त्याच्या अभ्यासाची सीमारेषा देखील होय. समाजशास्त्राचा अभ्यासविषय खूप व्यापक आहे. कारण सामाजिक आंतरक्रियांमधील सर्व घटक समाजशास्त्राच्या अभ्यासात समाविष्ट होतात. समाजशास्त्राची व्याप्ती पुढील नवीन अभ्यास क्षेत्रांच्या आधारे समजावून घेता येते.

* **जैव समाजशास्त्र :** जैव समाजशास्त्र ही शाखा समाजशास्त्रात नव्याने निर्माण झाली आहे. या शाखेतील संशोधक समाजशास्त्रातील विविध तंत्रे आणि पद्धतींचा वापर करून, तसेच या पद्धतींच्या निष्कर्षांचा उपयोग करून जीवशास्त्राची मानवी सामाजिक जीवनातील भूमिका काय आहे याचा अभ्यास करतात.

* **कलेचे समाजशास्त्र :** कलेच्या समाजशास्त्रात सौंदर्यशास्त्र आणि कला जगताचा अभ्यास केला जातो. यात कलेच्या उत्पादन व ग्रहणाचा सामाजिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

* **विपणन बाजार संशोधनाचे समाजशास्त्र :** ही समाजशास्त्राची व्यावहारिक शाखा असून यात समाजशास्त्रीय पद्धती वापरून अर्थपूर्ण पद्धतीने बाजारनीती समजावून घेण्याचा प्रयत्न केला जातो. यात समाजशास्त्रातील व बाजारनीतीतील सैद्धान्तिक ज्ञान, ग्राहकांच्या विविध प्रकारांचे ज्ञान व गरजा यांचे विश्लेषण केले जाते.

* **दृश्य माध्यमांचा अभ्यास करणारे समाजशास्त्र :** सामाजिक जीवनातील सर्व दृश्यांचा/चित्रांचा अभ्यास समाजशास्त्राची ही शाखा करते. समाजशास्त्रीय संशोधनात सर्व दृश्य प्रतिमांचा वापर सामाजिक तथ्य म्हणून करण्याचा प्रयत्न या शाखेद्वारा केला जातो.

* **डायस्पोरा अध्ययन :** डायस्पोरा अध्ययन हा एक नवीन आंतरविद्याशाखीय अभ्यासविषय समाजशास्त्रात नव्याने अभ्यासला जाऊ लागला आहे. यात प्रामुख्याने स्थलांतर व त्याचे मानवी जीवनातील विविध भागांवर होणारे परिणाम अभ्यासले जातात. उदा., सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक, लोकसंख्याविषयक, मानववंशशास्त्रविषयक, राजकीय, आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय संबंधांविषयी अभ्यास केला जातो.

**डायस्पोरा :** डायस्पोरा म्हणजे अशी विखुरलेली लोकसंख्या जिचे मूळ स्थान म्हणजे एखादा लहान भौगोलिक भाग असतो. डायस्पोरा म्हणजे एखाद्या समूहाचे आपल्या मूळ निवासस्थानापासून झालेले स्थलांतर होय. ग्रीक भाषेत डायस्पोरा म्हणजे 'विखुरणे' पण आता डायस्पोरा ही संज्ञा व्यक्तींच्या अशा गटाला उद्देशून वापरली जाते जे त्यांच्या मूळ स्थानापासून दूर राहूनही तिथली नाळ तुटू देत नाहीत.

## चित्रपट अध्ययन

चित्रपट अध्ययन ही २० व्या शतकातील एक नवीन विद्याशाखा आहे. ही एक आंतरविद्याशाखीय शाखा असून विविध सैद्धान्तिक, ऐतिहासिक आणि समीक्षात्मक दृष्टिकोनातून सिनेमा या माध्यमाकडे बघितले जाते. यात प्रामुख्याने चित्रपटांचा कलात्मक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि कथानकीय (narrative) प्रभावाचा विचार केला जातो. वर्ग, वंश, लिंगभाव, वांशिकता यांसारख्या सामाजिक गटांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रामध्ये चित्रपटांकडे संहिता म्हणून बघितले जाते. समाजशास्त्रात, चित्रपटांतून समाजशास्त्र किंवा चित्रपटांचे समाजशास्त्र असे अभ्यासक्रम अनेक विद्यापीठांनी सुरू केले आहेत.

## विकास अध्ययन

विकास अध्ययन हे आंतरविद्याशाखीय क्षेत्र असून जागतिक विकासातील असमानता शोधण्याचा यात प्रयत्न केला जातो. यात ऐतिहासिक संदर्भ तपासून आंतरराष्ट्रीय विकासाचा प्रश्न व प्रक्रियांचा अभ्यास केला जातो. यात प्रामुख्याने 'विकसित' आणि 'विकसनशील' समाजातील परस्परसंबंध, त्यातील विविध संस्थांची भूमिका आणि त्याचे सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि पर्यावरणीय बदलांच्या प्रक्रियेवर आणि त्याच्या होणाऱ्या परिणामांवर लक्ष केंद्रित केले जाते.

एक व्यावसायिक अभ्यास क्षेत्र म्हणून विकास अध्ययनाला आज खूप महत्त्व आणि वाव आहे. यात सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन, धोरणांचे विश्लेषण, बिगरशासकीय संस्था आणि मानवतावादी काम, शिक्षण, विकास कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी, स्वयंसेवकांचे व्यवस्थापन, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पत्रकारिता, आस्थलांतर आणि निर्वासितांसाठी सेवा, प्रवास व पर्यटनविषयक कार्य, आंतरसांस्कृतिक संबंधांबाबत सल्लामसलत, जनसंपर्क आणि संवाद, शहर नियोजन, आंतरराष्ट्रीय विकास, सार्वजनिक आरोग्य, समुदायातील काम, पर्यावरणात्मक व हवामानातील बदल यांचे संशोधन अशा अनेक संधी ही शाखा उपलब्ध करून देते.

## संस्कृती अध्ययन

१९६० च्या दशकात पाश्चिमात्य समाजात 'लोकप्रिय संस्कृती' चा अभ्यास करण्यामधील रस वाढत होता. त्यातून संस्कृती अध्ययनाची शाखा पुढे आली. संस्कृती अध्ययनाची सुरुवात ही इंग्लंडमधील 'बर्मिंगहॅम सेंटर फॉर कॉन्टेम्परारी कल्चरल स्टडी' येथे झाली. विविध प्रकारची समकालीन लोकप्रिय संस्कृती अभ्यासण्याची संधी संस्कृती अध्ययनातून उपलब्ध करून दिली जाते. एखादी व्यक्ती अथवा समुदायाची मूळ अस्मिता, त्यांच्यावर झालेले शिक्कामोर्तब (labelling) उपभोग पद्धती, नियम, अधिकार, सेन्सॉरशिप यांबाबतचे प्रश्न अभ्यासण्याची संधी यातून मिळते.

समकालीन संस्कृती अध्ययनात दैनंदिन जीवनाला अत्यंत गांभीर्याने घेतले जाते. महानगर संस्कृतीमधील जीवनपद्धती, उपभोग आणि सामाजिक संबंध यांचा अभ्यास यात केला जातो. संस्कृती ही दैनंदिन जीवनातून निर्माण होत असते. उदा., दैनंदिन आहार पद्धती, रोजच्या जीवनातील राहणीमान व फॅशन, करमणुकीची साधने, साजरे केले जाणारे सण, उत्सव इत्यादी थोडक्यात संस्कृती अध्ययनातून संस्कृती बनण्याची प्रक्रिया अभ्यासली जाते व असे मानले जाते की ही प्रक्रिया सत्ता संबंधांशी जोडलेली आहे.

संस्कृती अध्ययनात इतर अनेक विद्याशाखांमधून अभ्यास पद्धती व सिद्धान्त घेतले जातात.

वर नमूद केलेली सर्व अभ्यास क्षेत्रांची यादी ही सर्वसमावेशक स्वरूपाची नाही, ही समाजशास्त्र या विस्तृत विद्याशाखेत समाविष्ट असलेली काही मोजकी अलीकडील उदाहरणे आहेत. समाजशास्त्राची व्याप्ती ही बदलत्या, आधुनिक व गुंतागुंतीच्या समाजात अधिक व्यापक होत आहे.

**उपक्रम – २**

तुमच्या परिसरातील दोन स्थलांतरित व्यक्तींची मुलाखत घ्या. स्थलांतराचे कारण, अनुभव व समस्यांसंबंधी आपण काढलेल्या निष्कर्षांची वर्गात चर्चा करा.

## १.३ समाजशास्त्राचे महत्त्व

समाजशास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे :

१. **समाजशास्त्र समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करते :** समाजशास्त्रामुळे समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे शक्य झाले आहे. विविध क्षेत्रांमध्ये प्रगती साधण्यासाठी गुंतागुंतीच्या मानवी समाजाचे शास्त्रीय ज्ञान असणे आवश्यक आहे. समाजाचे शास्त्र आपल्याला आपल्या क्षमता, आपली बुद्धी व आपले स्व समजण्यास मदत करते. आपल्याला बदलत्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी मदत करते. तसेच सामाजिक जीवन समजावून घेण्यासाठी मार्गदर्शन करते.

२. **समाजशास्त्र समाजातील विविधतेसंबंधी ज्ञान देते :** विविध समाज, समूह, समुदाय, त्यांची जगण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती, सांस्कृतिक विविधता, धार्मिक आणि प्रादेशिक भिन्नता व समाजाचे बहुआयामी स्वरूप समजावून घेण्यासाठी समाजशास्त्र मदत करते.

३. **समाजशास्त्रामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो :** सामाजिक वास्तवाकडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन समाजशास्त्रामुळे विकसित होतो. यामुळे व्यक्ती अधिकाधिक वस्तुनिष्ठ, विवेकवादी, चिकित्सात्मक, पूर्वग्रहमुक्त आणि सकारात्मक विचार करू लागते.

४. **समाजशास्त्र हे व्यवसायाभिमुख आहे :** समाजशास्त्राची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत आहे. आधुनिक काळातील गतिमान समाजाचे समाजशास्त्रीय ज्ञान मिळवण्यासाठी या शास्त्राची नितांत गरज आहे. बदलत्या समाजातील व्यवसायांचे स्वरूपही सतत बदलत आहे. बदलता समाज, बदलत्या गरजा आणि व्यवसायाचे बदलते स्वरूप या सर्वांचा ताळमेळ समाजशास्त्रीय ज्ञान घालू शकते. या दृष्टिकोनामुळे समाजशास्त्राचे महत्त्व वाढत आहे. समाजशास्त्र हा फक्त बंद खोलीत शिकवण्याचा विषय नाही तर अनेक क्षेत्रांत याची उपयुक्तता सिद्ध झाली आहे व वाढत आहे. उदा., उद्योगधंदे, सामाजिक सेवा, समाजकार्य, कायदा, स्पर्धा परीक्षा, मार्केटिंग, जनसंपर्क, पत्रकारिता, प्रसारण, कौशल्य विकास, संपर्क क्षेत्र, बिगर शासकीय संघटना (NGO), कामगार कल्याण, सामाजिक सुरक्षा, विमा क्षेत्र, पुनर्वसन, सामाजिक कल्याण, ग्रामीण विकास, पर्यटन, कुटुंब कल्याण, जनगणना प्रक्रिया, योजना आणि नियोजन, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक संशोधन, सामाजिक समपुदेशन, पोलिस खाते, आदिवासी कल्याण, सर्वसमावेशक शिक्षण, सुधारणात्मक प्रशासन, उपभोक्ता संशोधन इत्यादी.

५. **सामाजिक समस्यांवर उपाय शोधणे :** सध्याचा समाज हा अनेक सामाजिक प्रश्नांना तोंड देत आहे. जसे की, दारिद्र्य, बेकारी, दहशतवाद, अतिरिक्त लोकसंख्या, स्थलांतर आणि सामाजिक अस्वस्थता, व्यसनाधीनता, सामाजिक विघटन, वांशिक आणि जातीय संघर्ष, धार्मिक

दंगली, जमातवाद, बालगुन्हेगारी इत्यादी हे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी अतिशय समतोल ज्ञान आवश्यक असते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा योग्य वापर करून असे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जातो.

६. **समाजशास्त्र हे माणसाला काळानुरूप ज्ञान देते आणि दक्ष ठेवते :** समाजशास्त्राला व्यावहारिक मूल्ये आहे. हे माणसाला काळानुरूप तसेच दक्ष राहण्यास मदत करते. सामाजिक परिस्थिती, सामाजिक घटना, बदलता समाज आणि या सर्वांना योग्य प्रतिसाद कसा द्यावा याचेही भान समाजशास्त्राकडून मिळते.

**उपक्रम – ३**

तुमच्या परिसरातील कुठल्याही बिगरशासकीय संस्थेला भेट देऊन त्यांच्या कामाबद्दल माहिती गोळा करा आणि त्याचे वर्गात PPT सादरीकरण करा.

या पाठात तुम्ही समाजशास्त्राचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती व समाजशास्त्र अभ्यासण्याची उपयुक्तता जाणून घेतली. यापुढे समाजशास्त्राच्या विकासात योगदान दिलेल्या महत्त्वाच्या विचारवंतांविषयी जाणून घेण्याची उत्सुकता तुमच्यामध्ये निश्चितपणे निर्माण झाली असेल.

## सारांश

- समाजशास्त्रात मानवाचे सामाजिक वर्तन आणि सामाजिक संबंधांचा अभ्यास केला जातो.
- ऑगस्ट कॉम्त यांनी प्रथम 'समाजशास्त्र' ही संज्ञा वापरली त्यामुळे त्यांना समाजशास्त्राचा जनक असे म्हटले जाते.
- 'समाजशास्त्र' हा शब्द 'Latin' भाषेतील 'Socius' आणि ग्रीक भाषेतील 'Logos' या शब्दांपासून बनला आहे. याचा अर्थ 'समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र'.
- समाजशास्त्राचे संस्थापक/जनक म्हणून कॉम्त बरोबर स्पेन्सर, डरखाईम, मार्क्स, वेबर यांचीही नावे घेतली जातात.
- आधुनिक गुंतागुंतीच्या समाजात समाजशास्त्राला खूप महत्त्व आहे.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. Socius या शब्दाचा अर्थ ............. हा होय.
(शास्त्र, सहकारी, सामाजिक)

२. Logos या शब्दाचा अर्थ ............. हा होय.
(सहयोगी, शास्त्र, पद्धती शास्त्र)

३. समाजशास्त्राचे जनक ............. यांना मानले जाते.
(डरखाईम, वेबर, कॉम्त)

४. समाजशास्त्रज्ञ जेव्हा दैनंदिन जीवनातील व्यावहारिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्याला ............. शास्त्र म्हणतात.
(शुद्ध, व्यावहारिक /उपयोजित, सैद्धान्तिक)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) जीवशास्त्राच्या मानवी सामाजिक जीवनातील भूमिकेचा अभ्यास – जैव समाजशास्त्र

(ii) सौंदर्यशास्त्र आणि कला जगताचा अभ्यास – कलेचे समाजशास्त्र

(iii) समाजशास्त्र व बाजार नीतितील सैद्धांतिक ज्ञान व ग्राहकांचे विविध प्रकार व त्यांच्या गरजांचे विश्लेषण – बाजार संशोधनाचे समाजशास्त्र

(iv) सामाजिक जीवनातील दृश्यांचा, चित्रांचा अभ्यास – डायस्पोरा अध्ययन

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| डायस्पोरा अभ्यास, The Positive Philosophy, सैद्धांन्तिक विज्ञान |

१. कॉम्तने समाजशास्त्र ही संज्ञा प्रथम या ग्रंथात वापरली -

२. समाजशास्त्रीय सिद्धान्ताचा विकास करणे हे समाजशास्त्रात महत्वाचे असते -

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. जेव्हा समाजशास्त्रीय संशोधन हे फक्त संशोधनाच्याच हेतूने केले जाते तेव्हा त्याला व्यावहारिक शास्त्र म्हणतात.

२. बलात्कार, द्वेष, गुन्हा आणि दहशतवाद ही सामाजिक संस्थेची उदाहरणे आहेत.

**प्र.२ (अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. समाजशास्त्राचे अनुभवाधिष्ठित स्वरूप.

२. विकास अध्ययन.

**(ब) टीपा लिहा.**

१. समाजशास्त्राचे स्वरूप

२. समाजशास्त्रातील नवीन अभ्यास क्षेत्रे

३. प्रबोधन काळ

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्र

२. सैद्धान्तिक शास्त्र आणि उपयोजित शास्त्र

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. डायस्पोरा


२. जैव समाजशास्त्र

**प्र.५ खालील विधाने चूक की बरोबर ते सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे समाजात बदल घडून आले.

२. नैसर्गिक शास्त्रांमधील प्रगतीचा प्रभाव एक विद्याशाखा म्हणून समाजशास्त्रावर झाला.

**प्र.६ (अ) संकल्पना चित्र तयार करा.**




**(ब) आपले मत नोंदवा.**

१. भारत प्रगतीच्या वैज्ञानिक अवस्थेत आहे का? तुमच्या मताचे स्पष्टीकरण द्या.

२. चित्रपट आणि समाज यांच्यातील संबंधाविषयी थोडक्यात सांगा.

**प्र.७ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५० शब्द)**

आजच्या जगातील समाजशास्त्राची व्याप्ती याची सुयोग्य उदाहरणांद्वारे चर्चा करा.

**उपक्रम**

वर्गामध्ये प्रत्येकी ५-७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचे गट करून खालील मुद्द्यांवर गटचर्चा घडवून आणा.

(१) समाजशास्त्र हा दैनंदिन जीवनाशी जोडलेला विषय आहे.

(२) समाजशास्त्रामधील नोकरी/व्यवसायाच्या संधी.

***

# २. पाश्चिमात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान

**२.१ पाश्चिमात्य समाजशास्त्रज्ञांचा परिचय**

**२.२ भारतीय समाजशास्त्रज्ञांचा परिचय**

**प्रस्तावना**



***अब्दुल रहमान इब्न-खाल्दुन :***

समाजशास्त्र ही पाश्चिमात्य कल्पना आहे असे मानले जाते. पण काही विचारवंत, अभ्यासक जगाच्या वेगवेगळ्या भागांत खूप पूर्वीपासून समाजशास्त्र उपयोगात आणत होते.

अब्दुल रहमान इब्न-खाल्दुन यांचा जन्म उत्तर आफ्रिकेत ट्युनिस येथे झाला होता. राजकारणात सक्रिय राहिले. त्यांनी ट्युनिस, मोरोक्को, स्पेन येथील सुलतानांना सेवा पुरवली. ते शैक्षणिक क्षेत्रात परतले. त्यांनी समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास, अनुभवाधिष्ठित संशोधन आणि सामाजिक घटनांमागील कारणांचा अभ्यास यांवर भर दिला. विविध सामाजिक संस्था आणि त्यांच्यातील परस्परसंबंध यांच्या अभ्यासावर त्यांनी भर दिला. प्राथमिक अवस्थेतील समाज व आधुनिक समाज यांच्या तुलनात्मक अभ्यासातही त्यांना रस होता.

ऑगस्ट कॉम्त आणि एमिल डरखाईम यांनी फ्रान्समध्ये समाजशास्त्राचा पाया रचला त्यामुळे फ्रान्स ही समाजशास्त्राची जन्मभूमी मानली जाते. ही समाजशास्त्रीय परंपरा नंतरच्या काळात यथावकाशपणे इतर युरोपीय आणि पाश्चिमात्य देशात पसरली.

समाजशास्त्राचा विकास फक्त पाश्चिमात्य जगापुरताच मर्यादित नाही. भारतातही समाजशास्त्राचा विकास झाला आहे. समाजशास्त्रात अनेक भारतीय समाजशास्त्रज्ञांनी मोलाचे योगदान दिले आहे. या पाठात आपण ऑगस्ट कॉम्त, एमिल डरखाईम व कार्ल मार्क्स हे पाश्चिमात्य विचारवंत तसेच जी.एस. घुर्ये, एम.एन. श्रीनिवास आणि इरावती कर्वे हे भारतीय विचारवंत अशा सहा समाजशास्त्रीय विचारवंतांचे योगदान अभ्यासणार आहोत.

या प्रत्येक समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्राच्या व्यापक कक्षेत राहून महत्त्वाचे संशोधन केले आहे. त्यांच्या अभ्यासविषयाशी व क्षेत्राशी निगडित अनेक महत्त्वपूर्ण संकल्पना त्यांनी विकसित केल्या. तसेच सामाजिक वर्तनाचे स्पष्टीकरण देताना अनेक दिशादर्शी सिद्धांतांची निर्मिती केली.

## २.१ पाश्चिमात्य समाजशास्त्रज्ञांचा परिचय

### ऑगस्ट कॉम्त (१७९८ ते १८५७)



ऑगस्ट कॉम्त

ऑगस्ट कॉम्त, यांना समाजशास्त्राचा जनक मानले जाते. त्यांचा जन्म १९ जानेवारी १७९८ मध्ये फ्रान्समध्ये मॉन्टपेलियर येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव 'इसिडोर ऑगस्ट मॅरिक फ्रँकॉइस झेवियर कॉम्त'

असे होते. ते बंडखोर वृत्तीचे व प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणारे होते. ते गणिततज्ञ व तत्त्ववेत्ते होते. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी 'समाजाच्या पुनर्रचनेची' गरज व्यक्त केली होती.



**हॅरियट मार्टिनॉ (१८०२-१८७६):** या ब्रिटिश सामाजिक विचारवंत होत्या. काही विचारवंताच्या मते त्या पहिल्या स्त्री समाजशास्त्रज्ञ होत्या. त्यांनी अनेक ग्रंथ व निबंध लिहिले. कॉम्त यांनी 'Cours de Philosophie Positive' हा फ्रेंच भाषेतील ग्रंथ १८३९ मध्ये प्रकाशित केला. मार्टिनॉ यांनी याच ग्रंथाचे दोन विभागांत १८५३ मध्ये भाषांतर केले. त्याचे नाव 'The Positive Philosophy of August Comte' होय. हे त्यांचे अतिशय मोलाचे योगदान होते. कॉम्त यांची इंग्रजी भाषा बोलणाऱ्या जगाशी ओळख करून देण्याचे श्रेय मार्टिनॉ यांना जाते.

'सोसायटी इन अमेरिका' हा त्यांचा १९३७ सालामधील प्रसिद्ध ग्रंथ आहे. या ग्रंथातील त्यांचे विचार हे समाजशास्त्रीय पद्धतीचे उत्तम उदाहरण आहे. मार्टिनॉ यांच्या मते, ''समाजाचा अभ्यास करताना, त्यांच्या राजकीय, धार्मिक आणि सामाजिक संस्थांच्या सर्व पैलूंचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.'' त्याचबरोबर त्यांनी स्त्रियांच्या अभ्यासाचा यामध्ये समावेश करण्याचा आग्रह धरला. विवाह, मुले, धार्मिक व्यवहार आणि वंश यांसारख्या मुद्द्यांचा अभ्यास करणाऱ्या त्या पहिल्याच समाजशास्त्रज्ञ होय. त्यांच्या मते, जर आपल्याला स्त्रियांचे दुय्यम स्थान समजून घ्यायचे असेल तर समाजाचा समग्र अभ्यास करणे गरजेचे आहे.

'तीन अवस्थांचा नियम', 'प्रत्यक्षवाद', 'विज्ञानांचे वर्गीकरण' असे सिद्धान्त त्यांनी मांडले. समाजशास्त्राचे वर्णन करताना त्यांनी 'स्थितिशीलता' आणि 'गतिशीलता' या घटकांचा विचार केला.

त्यांचे असे मत होते की, ज्याप्रमाणे मानवी मनाची उत्क्रांती होते त्याचप्रमाणे समाज मनाचीही होते. प्रत्येक व्यक्तीचा विकास बालपण त्यानंतर चौकस पौगंडावस्था आणि सहज स्वाभाविक तात्त्विक प्रौढावस्था या अवस्थांतून होतो तसाच समाजाचा विकासही अशाच अवस्थांतून होतो असे त्यांचे मत होते.

कॉम्तचे सामाजिक तत्वज्ञान हे मानवी विचारांच्या तीन अवस्थांच्या संकल्पनेवर आधारित आहे. त्यांच्या मते मानवी ज्ञान हे उत्क्रांतीच्या तीन अवस्थांमधून संक्रमित होत गेले आहे.

(१) धार्मिक अवस्था
(२) तात्त्विक/अध्यात्मिक अवस्था
(३) वैज्ञानिक/प्रत्यक्षवादी अवस्था.

**(१) धार्मिक/धर्मशास्त्रीय अवस्था :** या पहिल्या अवस्थेत मानवाच्या विचार आणि कल्पनांवर पूर्णपणे अलौकिक आणि अनैसर्गिक घटकांचा पगडा होता. माणसाचा असा विश्वास होता की, जगातील सर्व घटना या देवाकडून नियंत्रित केल्या जातात किंवा घडवल्या जातात. माणसाचा देवावर आणि अमानवी शक्तींवर आत्यंतिक विश्वास होता. माणूस असे मानत होता की, सर्व घटना या अनैसर्गिक व अमानवी शक्तींमुळे घडतात. उदा., सर्व नैसर्गिक आपत्ती या देवाच्या कोपामुळे घडून येतात.


**(२) अध्यात्मिक तात्त्विक अवस्था :** या अवस्थेलाच वैचारिक विकासाची अमूर्त अवस्था असे म्हटले जाते. या अवस्थेत अतिंद्रिये अमानवी शक्तींवरील विश्वास हळूहळू अमूर्त स्वरूपाच्या शक्तीवर बसू लागतो. या अमानवी शक्तींमुळेच

मानवाच्या आणि निसर्गाच्या सर्व हालचाली नियंत्रित होत असतात असे मानले जाते. पहिल्या अवस्थेपेक्षा वैचारिक पातळीत दुसऱ्या अवस्थेत बराच विकास झालेला दिसून येतो. 'एकच देव' या संकल्पनेत बराच बदल या अवस्थेत होतो. त्यामुळे बरीचशी सुधारणा मानवाच्या विचार प्रक्रियेत झालेली असते असे कॉम्तचे मत होते.

**(३) वैज्ञानिक/प्रत्यक्षवादी अवस्था :** कॉम्तच्या मते ही मानवी विचारांची सुधारित आणि वैज्ञानिक अवस्था असते. कल्पनांची जागा निरीक्षणांनी घेतलेली असते. प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा करणे, परीक्षण करणे या गोष्टींना या अवस्थेत महत्त्व प्राप्त होते. यात सामाजिक जीवनातील घटनांचे तथ्यांच्या साहाय्याने नियमांत रूपांतर करण्याचा किंवा नियम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.

कॉम्तला समाजशास्त्राचा विकासही अशाच अवस्थांमधून अपेक्षित होता. म्हणूनच हा तीन अवस्थांचा नियम' त्याने ज्ञान, सामाजिक संघटन आणि इतर घटकांनाही लागू केला.

## एमिल डरखाईम (१८५८-१९१७)



एमिल डरखाईम

फ्रान्समधील एपिनल या खेड्यात १५ एप्रिल १८५८ रोजी डरखाईमचा जन्म झाला. अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून त्याला कॉलेजमध्ये अनेक बक्षिसे व पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

डरखाईमने सामाजिक तथ्य, सामाजिक ऐक्य, सामूहिक प्रतिनिधित्व, सामाजिक मूल्ये, ज्ञानाचे समाजशास्त्र आणि समाजातील नैतिकता, गुन्हा आणि शिक्षा यांवर आपल्या अभ्यासात भर दिला.

### डरखाईमचा आत्महत्येचा सिद्धान्त

डरखाईमने आत्महत्येचे विस्तृत असे विवेचन त्यांच्या 'ल स्युसाईड' या ग्रंथात केले आहे. त्यांच्या मते 'आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आणि घटना आहे'. डरखाईमच्या मते आत्महत्येला कारण हे वैयक्तिक कमकुवतपणा, मानसिक नैराश्य किंवा कोणतेही वैयक्तिक आर्थिक किंवा कौटुंबिक घटक कारणीभूत नसतात. त्यांच्या मते, आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे. खूप मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण करून डरखाईमने हे पटवून दिले की आत्महत्या ही सामाजिक बाब आहे.

जेव्हा सामाजिक ऐक्य किंवा समाजाबरोबरची एकरूपता नष्ट होते तेव्हा आत्महत्या हा घटक सक्रिय होतो. तसेच माणसावर नकारात्मक दबाव, नैतिक मूल्यांचा ऱ्हास किंवा मूल्य संघर्ष निर्माण होतो तेव्हा आत्महत्या घडून येण्याची शक्यता असते.

**आत्महत्येची व्याख्या** "प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, सकारात्मक किंवा नकारात्मक व्यक्तीकडून केली जाणारी कृती की जिचा शेवट आत्मनाशामध्ये होतो, त्यास आत्महत्या असे म्हणतात."

**आत्महत्येचे प्रकार** :

डरखाईमच्या मते आत्महत्येचे पुढील प्रकार आहेत.

**१. आत्मकेंद्रित आत्महत्या:** जेव्हा व्यक्ती समाजापासून वेगळी होते तेव्हा एकटेपणाची भावना निर्माण होते किंवा समाजात त्याला कोणतेही महत्त्व राहिले नाही असे वाटू लागते तेव्हा ती व्यक्ती स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करते. व्यक्ती जेव्हा स्वतःतच रममाण झालेली असते आणि समाजातील इतर कोणाशीही देणे-घेणे राहत नाही त्या वेळेस व्यक्ती आत्मकेंद्रित आत्महत्या करते. ज्या व्यक्ती एकलकोंड्या, आत्ममग्न असतात किंवा ज्याची इतरांबरोबर राहण्याची इच्छाशक्ती नष्ट झालेली असते त्या या प्रकारची आत्महत्या करतात.

**२. नियमनविरहित/प्रमाणकशून्य आत्महत्या :** नियमनांचा ऱ्हास, कायद्यांचे उल्लंघन, मूल्यांचे अवमूल्यन अशा परिस्थितीस नियमनविरहितता असे म्हणतात. अचानकपणे निर्माण झालेल्या एखाद्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास व्यक्ती जेव्हा असमर्थ ठरते तेव्हा नियमनविरहित आत्महत्या केली जाते. या अवस्थेत नियमनांपासून व्यक्तींची, समाजाची फारकत झालेली असते. डरखाईमच्या मते, जेव्हा आर्थिक मंदी किंवा खूप भरभराट होते, तेव्हा नियमनविरहित आत्महत्या घडतात.

**३. परार्थवादी/परहितवादी आत्महत्या :** हा प्रकार आत्मकेंद्रित आत्महत्येच्या अगदी विरोधी स्वरूपात आहे. यात व्यक्ती समाजाबरोबर इतकी एकरूप होते आणि समाजात इतरांचे भले व्हावे म्हणून आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होते. ही मूल्याधिष्ठित कृती मानली जाते. जपानी लोकांची हाराकिरी किंवा पूर्वीच्या काळातील सतीप्रथा ही परार्थवादी आत्महत्येची उदाहरणे आहेत.

**४. दैववादी आत्महत्या :** जेव्हा अतिरिक्त सामाजिक दडपण आणि हस्तक्षेपामुळे व्यक्ती खचून जाते तेव्हा या प्रकारची आत्महत्या घडते.

आत्महत्येच्या सिद्धान्ताची मांडणी करताना डरखाईमने सामाजिक घटक, सामाजिक परिस्थिती हे कसे आत्महत्येस जबाबदार घटक असतात व आत्महत्या हे कसे सामाजिक तथ्य आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.




विलियम ड्युब्योई

**विलियम ड्युब्योई (१८६८-१९६३):** हे एक अमेरिकन समाजशास्त्रज्ञ, इतिहासतज्ज्ञ, नागरी हक्क कार्यकर्ता, लेखक आणि संपादक होते. २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील अमेरिकेतील एक सर्वांत महत्त्वाचे कृष्ण वर्णीय वंशाचे विरोधक नेते म्हणून ते नावाजले गेले होते. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. समाजशास्त्रीय अध्ययनामधील वंश आणि वंशभेदाची ओळख हे त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

ते हार्वर्ड विद्यापीठातून पीएच.डी. मिळवणारे पहिलेच आफ्रिकन कृष्णवर्णीय वंशाचे विद्यार्थी होत. त्यांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला व कृष्णवर्णीय कला व साहित्याला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, वाचकांनी कृष्णवर्णीय साहित्यातील सौंदर्य टिपायला शिकले पाहिजे.

त्यांनी आफ्रिकेतील कृष्णवर्णीय समाजाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर क्षेत्रीय अभ्यासाचा वापर केला. फिलाडेल्फियामधील जवळजवळ २५०० कृष्णवर्णीय लोकांच्या त्यांनी मुलाखती घेतल्या. या संशोधनावर आधारित त्यांनी त्यांचा 'द फिलाडेल्फिया निग्रो' (१८९९) हा ग्रंथ लिहिला. त्याचबरोबर त्यांनी अतिशय सखोल पद्धतीने कृष्णवर्णीय कामगारांच्या शोषणाचे समाजशास्त्रीय विश्लेषण केले. त्यांच्या मते, कृष्णवर्णीय कामगारांनी उत्पादक आणि ग्राहक यांच्या सहकारी तत्त्वावर उभी असणारी अशी एक स्वतंत्र अर्थव्यवस्था निर्माण करावी. हीच अर्थव्यवस्था आर्थिक विषमता आणि कृष्णवर्णीय लोकांचे दारिद्र्य मिटवू शकेल.

## कार्ल मार्क्स (१८१८ ते १८८३)



कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स हा जर्मन अभ्यासक, तत्ववेत्ता, अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार, राजकीय विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार, वकील आणि थोर क्रांतिकारक होता. मार्क्सला साम्यवादाचा रचनाकार मानले जाते. त्यांचे विचार हे संपूर्ण जगात अत्यंत सामर्थ्यशाली व प्रभावी ठरले.

भांडवलशाही ही एक अशी अर्थव्यवस्था आहे जी नफ्यावर आधारित असलेला स्पर्धात्मक बाजार, कामगार, खाजगी मालमत्ता आणि उत्पादनाच्या साधनांच्या मालकीवर अवलंबून असते.

## मार्क्सचा वर्ग संघर्षाचा सिद्धान्त

वर्ग संघर्षाचा सिद्धान्त ही संकल्पना मार्क्सच्या विचारांच्या केंद्रस्थानी आहे. त्याच्या साम्यवादी जाहीरनाम्यामध्ये त्याने असे म्हटले आहे की, इतिहासाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये दोन वर्गांमध्ये संघर्ष झालेला आहे. भांडवलदार आणि कामगार या दोन वर्गांमध्ये कायम वैरभाव आणि द्वेषभाव दिसून येतो.

मार्क्सच्या मते, 'आर्थिक घटक हाच समाजातील वर्गांचा पाया असतो.' त्यांच्या तत्वज्ञानात ते वर्गीय स्तरीकरणाला सर्वोच्च महत्त्व देतात. त्यांनी इतिहासाचा अन्वयार्थ वर्ग संघर्षाच्या दृष्टिकोनातूनच मांडला आहे.

समाजातील वर्ग म्हणजेच आर्थिक वर्ग होय, जे मुख्यत्वेकरून उत्पादन आणि आर्थिक विकासाच्या वितरण प्रक्रियेवर आधारित असतात.

**कार्ल मार्क्सने केलेले भांडवलशाही समाजातील वर्ग संघर्षाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे सारांशरूपात मांडता येते.**

१. **मालमत्तचे महत्त्व :** मार्क्सच्या मते, संपत्तीचे स्वरूप हे कोणत्याही समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. उत्पादनाच्या साधनांशी व्यक्तीचे नाते काय आहे यावर वर्गव्यवस्था ठरत असते.

२. **वर्गांचे ध्रुवीकरण :** संपूर्ण समाजाचे दोन भिन्न वर्गांमध्ये विभाजन होत असते. वैरभाव असणारे हे वर्ग असतात. भांडवलशाही समाजव्यवस्थेत अत्यंत तीव्र असे वर्गांचे ध्रुवीकरण होणे हे स्वाभाविक असते.

**उपक्रम – १**

"वर्गांचे ध्रुवीकरण" आणि "वर्गांचे ऐक्य" वर्तमानकाळात प्रासंगिक आहे का? यावर चर्चा करा.

३. **अतिरिक्त मूल्य :** कामगारांचे शोषण करून भांडवलदार अतिरिक्त नफा कमवत असतो.

४. **दारिद्र्यात वाढ :** कामगारांच्या वाढत्या शोषणातून कामगार वर्गाच्या दारिद्र्यात वाढ होत असते. मार्क्सच्या मते, हे दारिद्र्य हा साधनांच्या दुर्मीळतेचा परिणाम नसून तो कामगारांच्या शोषणाचा परिणाम आहे.

५. **परात्मता/अलगता :** आर्थिक शोषण आणि अत्यंत प्रतिकूल स्थिती यांमुळे कामगारांना परात्मतेला सामोरे जावे लागते. काम ही कामगाराची अभिव्यक्ती राहत नसून अत्यंत खालावलेले जीवनमान ही त्याची ओळख बनते. कामगार हा स्वतःपासून, कामापासून आणि उत्पादनापासून अलग किंवा परात्म होतो.

६. **वर्गांचे ऐक्य आणि संघर्ष :** वाढत्या वर्गाविषयक

जाणिवेमुळे एका वर्गातील व्यक्तींमध्ये एकात्मता वाढत जाते व विरुद्ध वर्गाबद्दल आत्यंतिक द्वेषभाव वाढतो.

७. **क्रांती:** या वर्ग संघर्षाचा शेवट क्रांतीने होतो. यामुळे भांडवलशाही समाजाच्या रचनेचा ऱ्हास होतो.

८. **कामगारांची हुकूमशाही:** क्रांतीनंतर कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होते. भांडवलदार वर्गाचा क्रांतीत अस्त होतो. मार्क्सच्या मते, ही एक संक्रमण अवस्था आहे.

९. **साम्यवादी समाजाचा उदय:** खासगी मालमत्तेच्या विनाशानंतरच वर्ग आणि वर्ग संघर्ष संपुष्टात येईल. मार्क्सने म्हटल्याप्रमाणे वर्गविरहित समाजात अंतिमतः राज्यसंस्थादेखील लोप पावेल. या समाजव्यवस्थेत कोणाकडेच खासगी मालकी हक्क नसेल. प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार कामाला हातभार लावेल आणि त्याच्या/तिच्या गरजांनुसार त्यांची मिळकत असेल.

## २.२ भारतीय समाजशास्त्रज्ञांचा परिचय

'समाजशास्त्र' आणि 'सामाजिक मानववंशशास्त्र' हे दोन्ही विषय भारतात ब्रिटनमधून आले. जे ब्रिटिश अभ्यासक भारतात राहिले आणि नंतर जे भारतीय अभ्यासक ब्रिटन आणि अमेरिकेत शिक्षणासाठी गेले त्यांनी हे दोन्ही विषय भारतात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात पॅट्रिक गेडेस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभाग स्वतंत्रपणे सुरू झाला तेव्हापासून भारतात समाजशास्त्राला एक स्वतंत्र विद्याशाखा म्हणून दर्जा मिळाला. त्यानंतर मात्र भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नांमधून भारतात हे शास्त्र विकसित होत गेले. ज्यांनी भारतात समाजशास्त्रीय अभ्यासाचा पाया रोवला, त्यामध्ये प्रामुख्याने जी.एस. घुर्ये, आर. के. मुखर्जी, डी. पी. मुखर्जी, बी. एन. सील, बी. के. सरकार, एम. एन. श्रीनिवास, ए. आर. देसाई, इरावती कर्वे, एस. सी. दुबे इत्यादींचा समावेश होतो.

जी.एस. घुर्ये, एम.एन. श्रीनिवास आणि इरावती कर्वे यांची भारतीय समाजशास्त्राच्या विकासातील भूमिका व योगदान आपण अभ्यासणार आहोत.

### डॉ. जी.एस. घुर्ये – (१८९३ ते १९८३)



डॉ.जी.एस.घुर्ये

गोविंद सदाशिव तथा जी.एस. घुर्ये यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक संबोधले जाते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय समाजशास्त्राची उभारणी करताना समाजशास्त्रज्ञांची पहिली पिढी त्यांनी तयार केली. त्यांनी १९५२ मध्ये 'Indian Sociological Society' या संस्थेची स्थापना करून Sociological Bulletin या नियतकालिकाची सुरवात केली.

डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या लेखनात संकल्पना आणि परिप्रेक्ष्यांची खूप विविधता दिसून येते. त्यांच्या अभ्यासाचा कल हा मुख्यत्वेकरून जगाच्या विविध भागांतील संस्कृतींच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणे हा होता. त्यांनी विशेषकरून भारतातील संस्कृतीचा सविस्तर अभ्यास केला. त्यांनी केलेल्या जातिव्यवस्थेचा अभ्यास हा महत्त्वाचा संदर्भ म्हणून वापरला जातो.

**डॉ. घुर्ये यांचे भारतीय जमातींविषयीचे विश्लेषण :** डॉ. जी.एस. घुर्ये यांनी जमातींचा अभ्यास सामान्य आणि वैशिष्ट्यपूर्ण अशा दोन्ही पद्धतींनी केला. अनुसूचित जमातींवरील ग्रंथात त्यांनी ऐतिहासिक, प्रशासकीय आणि सामाजिक

बाजूंवर भर दिला आहे. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील महादेव कोळी जमातीचा स्वतंत्र अभ्यास केला आहे.

ज्या काळात अनेक प्रस्थापित मानववंशशास्त्रज्ञ व प्रशासक असे मत व्यक्त करत होते की, आदिवासी जमातींची स्वतंत्र ओळख कोणत्याही परिस्थितीत जपली गेली पाहिजे त्याच काळात डॉ. जी.एस. घुर्ये यांचा आदिवासींवरील प्रबंध प्रकाशित झाला. त्या दरम्यान वसाहतवादी प्रशासक आदिवासींची अनुसूची बनवत होते. सरकारी मानववंशशास्त्रज्ञ आदिवासींना संरक्षण देण्याच्या बाजूने होते व राष्ट्रवादी मंडळी त्यांना विरोध करत होती. राष्ट्रवादी मंडळींच्या मते, त्यांना संरक्षण देऊन किंवा त्यांना परिघाबाहेर ठेवून 'फोडा आणि राज्य करा' हीच नीती अमलात आणली जात आहे.

भारतातील विविध भागांतील 'आदिवासींचे हिंदूकरण' होण्याची जी एक प्रदीर्घ प्रक्रिया दिसून येत होती तिचा अभ्यास डॉ. जी.एस. घुर्ये यांनी केला. घुर्ये यांच्या मते, गणेश, काली, शिव या आदिवासींच्या दैवतांना आर्यांच्या इंद्र, विष्णू आणि ब्रह्मा यांच्या बरोबरीने स्थान मिळू लागले. भारतीय समाजातील विविध संस्कृतींची सांगड घालण्यासाठी आत्मवाद, कुलप्रतिकवाद व निसर्गवाद यांचा आधार घेतला गेला. त्यातूनच भारतातील जमातींना हिंदू मानले जाऊ लागले. घुर्ये असे म्हणतात की, त्यामुळेच स्वेच्छेने ते स्वतःला हिंदू संस्कृतीत सामावून घेऊ लागतात. ताना भगत, विष्णू भागवत, कबीर पंथी आणि इतर अनेक आदिवासी पुढाऱ्यांनी हिंदू संस्कृती आदिवासींमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला व त्यामुळे अनेक आदिवासी जमाती या स्वतःला हिंदू मानू लागल्या.

डॉ. घुर्ये यांचे जमातींविषयीचे विश्लेषण हे मुख्यतः त्यांच्या राष्ट्रवादी धारणेचे द्योतक होते. त्यांच्या मते, भारतीय समाजात ऐक्य प्रस्थापित करण्याचे एकमेव महत्त्वाचे साधन म्हणजे जाती आणि जमातींमधील सांस्कृतिक ऐक्य होय.

**डॉ. जी.एस. घुर्ये यांचे भारतातील जाती व्यवस्थेसंबंधीचे विचार :** १९३२ मध्ये प्रकाशित झालेला डॉ. जी.एस. घुर्ये यांचा 'Caste and Race in India' हा ग्रंथ भारतीय समाजशास्त्रात अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो. भारतातील जातिव्यवस्था आणि नातेसंबंध यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी या ग्रंथात ऐतिहासिक, मानव वंशशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यांचा एकत्रितपणे अभ्यास केला आहे. डॉ. जी.एस. घुर्ये यांनी जातिव्यवस्थेचा अभ्यास ऐतिहासिक, तुलनात्मक आणि एकात्मिक दृष्टिकोनातून केला. अंतर्विवाह हे जातिव्यवस्थेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य डॉ.जी. एस.घुर्ये यांनी मानले. त्यांच्या मते, जातिव्यवस्थेचा अभ्यास हा भारतातील बदलत्या वास्तवाच्या संदर्भात केला गेला पाहिजे. त्यांच्या मते जातिव्यवस्था हा भारतीय, सामाजिक आणि राजकीय जीवनातील एक ज्वलंत प्रश्न आहे. डॉ. घुर्ये यांचे जातिविषयक विश्लेषण अधिक विस्तृतपणे सातव्या पाठामध्ये दिले आहे.

## डॉ. एम.एन. श्रीनिवास (१९१६-१९९९)


डॉ.एम.एन. श्रीनिवास

म्हैसूर नरसिंहचार श्रीनिवास यांचा जन्म म्हैसूरमध्ये १६ नोव्हेंबर १९१६ रोजी झाला. म्हैसूर येथे सुरुवातीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विभागात प्रवेश घेतला आणि प्रोफेसर डॉ. जी.एस. घुर्ये यांचे ते विद्यार्थी झालेत.

त्यांच्या ब्राह्मणीकरण, संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण, धर्मनिरपेक्षता आणि प्रभावी जाती

या संकल्पनांचा आजही मोठ्या प्रमाणावर अभ्यास केला जातो.

## प्रभावी जातीची संकल्पना

भारतीय समाज हा जातिव्यवस्थेवर आधारित आहे. प्राचीन काळापासून भारतात अनेक जाती अस्तित्वात आहेत. त्यांच्यात परस्पर सहकार्य आणि सुसंवादही आहे. त्याचबरोबर त्यांच्यात परस्परावलंबन आणि संघर्षही आहे. जेव्हा एखादी जात दुसऱ्या जातीवर प्रभाव गाजवते किंवा कनिष्ठ मानलेल्या जातीचे शोषण करते तेव्हा संघर्ष निर्माण होतो. भारतात सर्वत्र जातीय विषमता आढळून येते.

डॉ.श्रीनिवास यांच्या मते, भारतीय जातिव्यवस्थेच्या चौकटीत असणाऱ्या सर्व जाती या वेगवेगळ्या स्थानांवर आहेत. त्यांच्यात विषमता आहे. काही जाती या खूप असंघटित अवस्थेत आहेत तर काही अत्यंत संघटित आहेत. त्यांच्याकडे सत्ता, प्रतिष्ठा आणि संख्याबळ आहे. त्यामुळे त्यांचा समाजावर वेगळा प्रभाव असतो. अशा जातींना श्रीनिवास 'प्रभावी जाती' किंवा 'प्रबळ जाती' असे म्हणतात.

## प्रभावी जातीची व्याख्या

"एखाद्या जातीचे संख्याबळ जेव्हा इतरांपेक्षा वाढते, त्यामुळे त्या जातीकडे आर्थिक आणि राजकीय सत्ता येते व त्यामुळे जेव्हा स्थानिक श्रेणी रचनेत त्यांचा दर्जा वाढतो तेव्हा त्या जातीला प्रभावी जात असे म्हणतात."

**त्यांनी प्रभावी जात ही संकल्पना पुढील सहा घटकांच्या आधारे स्पष्ट केली आहे.**

१. मोठ्या प्रमाणावर लागवडीयोग्य जमिनी (स्थानिक भागातील) ची मालकी
२. संख्याबळ
३. स्थानिक श्रेणी रचनेत उच्च स्थान (उच्च धार्मिक दर्जा)
४. पाश्चिमात्य शिक्षण
५. आर्थिक आणि राजकीय सत्तेचा उपभोग
६. जातीच्या सदस्यांनी उच्च व्यवसाय स्वीकारणे.


**श्रीनिवास यांनी दिलेली प्रभावी जातीची उदाहरणे–**

१. कर्नाटकातील लिंगायत आणि ओकालिगा
२. आंध्रप्रदेशातील रेड्डी आणि कम्मा
३. केरळमधील नायर आणि एरवा
४. तमिळनाडू मधील गोंडर, मुदलीयार आणि पद्याची

**उपक्रम – २**

जाती या मुद्द्याशी संबंधित पाच लेखांचे वाचन करा (उदा., प्रतिनिधित्व, जातीय अत्या-चार, आरक्षण) आणि काढलेल्या निष्कर्षांवर चर्चा करा.

## डॉ. इरावती कर्वे (१९०५–१९७०)


डॉ. इरावती कर्वे

इरावती कर्वे यांचा जन्म १५ डिसेंबर १९०५ रोजी म्यानमारमधील म्यांजान येथे झाला. नामवंत समाज सुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या त्या स्नुषा होत्या.

डॉ. इरावती कर्वे यांनी अनेक इंग्रजी आणि मराठी पुस्तकांमध्ये ८० पेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाशित केले. समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि मराठी साहित्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

नातेसंबंधांची संकल्पना – डॉ. इरावती कर्वे यांनी 'Kinship Organization in India' (1953) या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथातून भारतातील नातेसंबंधांचे सूक्ष्म विश्लेषण केले आहे. भारतातील विविध

भागांतील नातेसंबंधांचे तुलनात्मक चित्रण त्यांच्या नातेसंबंधांवरील ग्रंथात आपल्याला दिसून येते. या ग्रंथात आपल्याला नातेसंबंधांबाबतच्या महत्त्वाच्या संकल्पना प्रमुख भारतीय भाषांमध्ये समजावून घेता येतात. तसेच त्यांचा भाषिक आशय, वर्तन, दृष्टिकोन, वारसाहक्काबाबतचे नियम, विवाह आणि कुटुंबाचे प्रकार याबद्दलचे विस्तृत विश्लेषण समजते.

नातेसंबंध ही प्राथमिकतः एक सामाजिक सांस्कृतिक संकल्पना असून परिणामतः ती कौटुंबिक, जातीय आणि भाषिक घटकांशी संबंधित आहे. एका भाषिक गटात दिसणारे नातेसंबंध हे जातीय आणि कौटुंबिक गटातही आढळतात.

नातेसंबंध संघटनांचा अभ्यास करताना त्यांनी उत्तर, मध्य, दक्षिण आणि पूर्व याप्रमाणे भौगोलिक घटकांनुसार तसेच इंडो युरोपियन, द्रविडीयन अशा भाषिक प्रदेशांच्या आधारे देखील केला आहे. भौगोलिक घटकांनुसारही नातेसंबंधांची पद्धती बदलते. तशीच ती भाषिक घटकांनुसारही बदलते.

या पाठात आपण समाजशास्त्राचा विकास आणि वैचारिक जडणघडण कशी झाली आहे हे समजून घेतले. ऑगस्ट कॉम्त, एमिल डरखाईम, कार्ल मार्क्स या युरोपियन, तसेच जी.एस. घुर्ये, एम.एन.श्रीनिवास आणि इरावती कर्वे या भारतीय विचारवंतांचे योगदान आपण पाहिले. या वैचारिक योगदानातून समाजशास्त्राचा पाया घातला गेला आहे हे आपण जाणून घेतले.

**सारांश**

- कॉम्तने 'तीन अवस्थांचा नियम' हा समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण सिद्धान्त मांडला.
- डरखाईमने आत्महत्या हे सामाजिक तथ्य मानले व आत्महत्येचे चार प्रकार सांगितले.
- मार्क्सने भांडवलशाही व्यवस्थेची मूलभूत चिकित्सा केली. त्याचे महत्त्वाचे प्रतिपादन म्हणजे, 'मानवी इतिहास हा वर्ग संघर्षांचा इतिहास आहे.' मार्क्सचे वर्गसंघर्षाचे विश्लेषण हे आर्थिक घटकांवर आधारित आहे.
- डॉ. जी.एस. घुर्ये यांनी मुंबई विद्यापीठात स्वतंत्र समाजशास्त्र विभाग स्थापन केला. त्यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हटले जाते.
- प्रभावी जाती ही संकल्पना हे एम. एन. श्रीनिवास यांचे समाजशास्त्रातील महत्त्वाचे योगदान आहे. आजही या संकल्पनेचे महत्त्व भारतीय समाजात टिकून आहे.
- डॉ. इरावती कर्वे यांनाही भारतीय समाजशास्त्रात मानाचे स्थान आहे. त्यांचे समाजशास्त्र आणि सामाजिक मानववंशशास्त्रात मोठे योगदान आहे.
- भारतातील नातेसंबंध ही त्यांनी मांडलेली संकल्पना ही सामाजिक व सांस्कृतिक संकल्पना आहे.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. औद्योगिक क्रांती ............ येथे झाली.
(उत्तर अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया)

२. विज्ञान ............ यावर अवलंबून असते.
(विश्वास, तथ्ये, अंदाज)

३. भारतातील नातेसंबंधांवर ............ या महिला समाजशास्त्रज्ञांनी अत्यंत महत्त्वाचे काम केले.
(डॉ. इरावती कर्वे, सुमा चिटणीस, नीरा देसाई)

४. समाज विकासाच्या ............ या अवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे यात स्पष्टीकरणांचे स्वरूप अस्पष्ट असते पण पूर्णतः दैववादी नसते.
(धार्मिक, भौतिक, प्रत्यक्षवादी)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) अब्दुल रहमान इब्न खाल्दुन – उत्तर आफ्रिका

(ii) ऑगस्ट कॉम्त – फ्रान्स

(iii) हॅरियट मॉर्टिनॉ – इंग्लंड

(iv) कार्ल मार्क्स – रशिया

**प्र.१ (क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| ध्रुवीकरण, डॉ. एम.एन. श्रीनिवास, आर. एन. मुखर्जी |
|---|

१. मार्क्सच्या मते वर्ग हे शेवटी पूर्णपणे परस्पर विरोधी होतील.

२. या भारतीय समाजशास्त्रज्ञाने पाश्चिमात्यीकरण ही संकल्पना मांडली.

**प्र.१ (ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. समाजाच्या ज्या अवस्थेत अनुभवाधिष्ठित बाबींनाच स्पष्टीकरणाचे आधार मानले जाते ती म्हणजे धार्मिक अवस्था होय.

२. 'Le Suicide' हा ग्रंथ हॉब्ज यांनी लिहिला.

**प्र.२ (अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. आत्मकेंद्रित आत्महत्या

२. प्रभावी जात

**(ब) टीपा लिहा.**

१. डॉ. जी.एस. घुर्ये यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान

२. डरखाईमने सांगितलेले आत्महत्येचे प्रकार

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. धार्मिक अवस्था आणि प्रत्यक्षवादी अवस्था


२. प्रमाणक शून्य आत्महत्या आणि परार्थवादी आत्महत्या

**प्र.४ खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. मार्क्सच्या मते, भांडवलशाही पद्धतीमध्ये कामगारांमधील आपलेपणाची भावना वाढीस लागते.

२. इरावती कर्वे यांनी भारतातील नातेसंबंधाच्या अभ्यासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे

**प्र.५ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**(ब) आपले मत नोंदवा.**

१. जागतिकीकरणामुळे वर्गांचे अधिक जास्त ध्रुवीकरण झाले आहे असे वाटते का? ते उदाहरणासहीत स्पष्ट करा.

२. नातेसंबंधांची परिणामकारकता कमी होत आहे असे तुम्हांला वाटते का? कारणे द्या.

**प्र.६ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५० शब्द)**

१. तुम्ही कॉम्तच्या मानवी विचाराच्या तीन अवस्थांचा नियम अभ्यासले आहेत. कॉम्तच्या पहिल्या व तिसऱ्या अवस्थेच्या संदर्भाने भारतीय समाजातील आव्हानांची चर्चा करा.

**उपक्रम**

खाली दिलेल्या विषयांवर PPT किंवा पोस्टर्स बनवा.

१) समाजशास्त्रांचे योगदान.

२) स्त्री समाजशास्त्रज्ञ आणि त्यांचे योगदान.

३) सद्यकाळातील विद्यार्थ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्याची सामाजिक कारणे.

***

# ३. समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना

३.१ समाज
३.२. समुदाय
३.३. सामाजिक समूह
३.४. सामाजिक दर्जा, सामाजिक भूमिका, सामाजिक नियमने

## प्रस्तावना

समाजातील प्रत्येक सामाजिक घटनेचा अभ्यास समाजशास्त्रात केला जात असल्याने ते एक गुंतागुंतीचे शास्त्र मानले जाते. समाजशास्त्रीय संकल्पना अमूर्त असल्याने त्या समजण्यास अवघड जातात. उदा., समाज, समुदाय, कुटुंब, आंतरक्रिया, संघर्ष, संस्कृती, वर्ग, अलगता, भेदभाव, संरचना, कार्ये इत्यादी. आपण या पाठामध्ये समाजशास्त्रातील काही मूलभूत संकल्पना अभ्यासणार आहोत.

## ३.१ समाज

ॲरिस्टॉटलच्या मते, 'मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे.' तो समाजाशिवाय राहू शकत नाही. मानवाच्या मूलभूत आणि अगदी आवश्यक अशा काही गरजा आहेत. ज्या केवळ संघटनांच्या ठरावीक साचामध्ये किंवा चौकटीत राहूनच भागू शकतात. मानवाच्या उत्क्रांतीच्या काळापासून मानवाने जे सामूहिक जीवन निर्माण केले आहे त्यास 'समाज' असे म्हणतात. समाजामध्ये परस्पर वर्तणूक आणि नाती ही ठरावीक पद्धतीनेच असलेली दिसून येतात. जेव्हा व्यक्तीव्यक्तींमध्ये सामाजिक संबंध निर्माण होतात, त्यालाच समाज असे म्हणतात.

समाजशास्त्रामध्ये 'समाज' ही एक मूलभूत संकल्पना आहे. समाज हा शब्द 'socius' या लॅटीन शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ सहयोगी किंवा मैत्री असा होतो. जॉर्ज सिमेल यांनी 'Sociability' ला महत्त्व दिले आहे. याचाच अर्थ मानवाला इतरांच्या सोबत किंवा समूहात राहणे महत्त्वाचे वाटते.

'समाज' या शब्दाची व्याप्ती मोठी आहे. हा शब्द सर्वसामान्यांच्या माहितीचा आहे. लोक याचा वापर अगदी सहज किंवा आपल्या रोजच्या जीवनात करतात. उदाहरणार्थ, आर्य समाज, आदिवासी समाज, महिला समाज, सहकारी समाज, औद्योगिक समाज इत्यादी. समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र आहे. समाजशास्त्राचा खरा अर्थ जाणून घेणे आवश्यक आहे. बहुतेक वेळा 'समाज' (society) हा शब्द 'मंडळ', 'संघटन' किंवा 'समूह' यांसाठी वापरला जातो. उदाहरणार्थ, 'पिपल्स एज्यूकेशन सोसायटी', 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी', 'आयडिअल हाऊसिंग सोसायटी' इत्यादी. मात्र अशा प्रकारचा समाजाचा अर्थ समाजशास्त्रामध्ये गृहीत धरला जात नाही. समाजशास्त्रामध्ये 'समाज' ही संज्ञा वापरताना त्याला विशिष्ट अर्थ असतो, ज्यामध्ये तो शब्द वापरण्यामागे काही विशिष्ट वैज्ञानिक विचार असतो. आपण भौतिक शास्त्रामध्ये काही संज्ञा वापरतो त्याचप्रमाणे समाजशास्त्रामध्येही काही संज्ञा वापरल्या जातात.

या संदर्भात 'समाज' या संकल्पनेच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

### ३.१.१ व्याख्या

*(१)मॅक आयव्हर आणि पेज :* "समाज हा अनेक समूह व विभागातील क्रिया प्रतिक्रियांची, अधिकारांची आणि सहकार्याची अशी व्यवस्था आहे की ज्यामुळे मानवी वर्तन व स्वातंत्र्य यावर

नियंत्रण ठेवले जाते.”

*(२)ऑक्सफर्ड डिक्शनरी :* “कमी-जास्त प्रमाणामध्ये, समूहामध्ये राहणाऱ्या एकत्रित लोकांचा समूह म्हणजे समाज होय.”

*(३)मॉरिस गिन्सबर्ग :* “विशिष्ट संबंध व वर्तनाचे प्रकार यांनी एकत्रित बांधल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज होय. त्यामुळे अशा तऱ्हेचे संबंध न ठेवणाऱ्या किंवा दुसरे वर्तन प्रकार आचरणात आणणाऱ्या व्यक्तींपासून त्या समाजातील व्यक्ती वेगळ्या दिसतात.”

लोकांमधील सामाजिक संबंध हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे असे समाजशास्त्रज्ञांना वाटते. त्यामुळे समाज म्हणजे 'सामाजिक संबंधाची व्यवस्था होय.' अशी व्याख्या करता येते. अर्थात मानवामानवांतील सर्व संबंध हे सामाजिक असतातच असे नाही. सामाजिक संबंध अस्तित्वात येण्यासाठी काही निश्चित अटींची पूर्तता होणे आवश्यक असते. या अटी पुढीलप्रमाणे :

**(१) परस्परांची जाणीव असणे :** सामाजिक संबंधांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींना परस्परांच्या अस्तित्वाची जाणीव असावी लागते.

**(२) परस्परांमध्ये देवाणघेवाण होणे आवश्यक असते :** सामाजिक संबंध प्रस्थापित होण्यासाठी व्यक्तींमध्ये देवाणघेवाण होणे महत्त्वाचे असते. उदा., जेव्हा दोन व्यक्ती एकमेकांच्या विरुद्ध दिशेने धावत असतात तेव्हा त्यांना एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव असते. यामध्ये सामाजिक संबंधांची पहिली अट पूर्ण होते. पण जेव्हा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला नमस्कार करते व दुसरी व्यक्ती त्याला प्रतिनमस्कार करते तेव्हाच त्यांच्यात आंतरक्रिया होऊन सामाजिक संबंधाची दुसरी अट पूर्ण होते. हे संबंध सहकार्याचे असले पाहिजेत असे नाही तर ते संघर्षाचे सुद्धा असू शकतात.



सामाजिक आंतरसंबंध

### ३.१.२ समाजाची वैशिष्ट्ये

मॅक आयव्हर यांनी समाजाची पुढीलप्रमाणे काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

**(१)समाजात असलेली साम्ये :** व्यक्तींमधील साम्य हा समाजातील आवश्यक घटक आहे. लोकांच्या गरजा, ध्येय, कल्पना, मूल्ये, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांत साम्य असते. मॅक आयव्हर यांनी समाज म्हणजे साधर्म्य असे म्हटले आहे. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या साधर्म्य असल्याशिवाय समाज निर्माण होणे शक्य नाही. आपण सर्व एक आहोत ही जाणीव काही बाबतींत असणाऱ्या साम्यातून निर्माण होत असते. उदाहरणार्थ, आपण सर्व मानव वंशाचे आहोत किंवा आपण एकाच देवावर विश्वास ठेवतो, एकाच आचारसंहितेचे पालन करतो, समान भाषा बोलतो, कुटुंबात राहतो, अन्न,वस्त्र, निवारा या आपल्या मूलभूत गरजा आहेत इत्यादी.

**(२)सामाजिक भिन्नता :** साम्याप्रमाणेच समाज हा भिन्नतेवर देखील आधारित आहे. भिन्नता हा सशक्त समाजाचा महत्त्वाचा घटक आहे.

समाजातील विविध गरजा भागवण्यासाठी, विविध प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांचीही आवश्यकता असते. उदाहरणार्थ लिंग, वय, शारीरिक सामर्थ्य, बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्त्व, भौतिक वस्तू आणि संपत्तीवरील मालकी इत्यादींवरील आधारित भेद.

**(३)परस्परावलंबित्व :** समाजामध्ये एक व्यक्ती ही दुसऱ्या व्यक्तीवर स्वतःच्या गरजा भागवण्यासाठी अवलंबून असते. एक समूह, एक राष्ट्र, एक समुदाय हा विकासासाठी इतरांवर अवलंबून असतो. हेच परस्परावलंबित्व आपणास कुटुंबामध्येही दिसून येते. समाजामध्ये विविध प्रकारचे सामाजिक संबंध समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असतात.

**(४)सहकार्य :** गिसबर्टच्या मते, सहकार्य ही सामाजिक जीवनाची प्राथमिक प्रक्रिया आहे. सहकार्याशिवाय समाजाचे अस्तित्व अशक्य आहे. लोक प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या एकमेकास सहकार्य करत असतात.

**(५)नियमनात्मकता :** लोकांचे समाजातील वर्तन समाजयंत्रणेकडून मूल्यांकित केले जाते व नियंत्रित केले जाते. या नियंत्रणाच्या साधनांना 'नियमने' असे म्हणतात. नियमने ही कायमच समाजातील चुकीची वर्तणूक किंवा समाजाला घातक ठरणाऱ्या कृतींना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच नियमने समाजाला संरक्षित करत असतात किंवा करण्याचा प्रयत्न करतात.

**(६)गतिशीलता :** कोणताही समाज स्थिर नसतो. समाज परिवर्तनशील आणि सतत परिवर्तित होणारा असतो. जुन्या चालीरिती, परंपरा, मूल्ये, नियमने आणि संस्था या बदलत राहतात. नवीन चालीरिती, परंपरा, मूल्ये, नियमने आणि संस्था त्यांची जागा घेतात.

## ३.२ समुदाय

समान भूप्रदेशात कायमस्वरूपी वास्तव्य करणाऱ्या एकसंध समूहाला उद्देशून समुदाय ही संकल्पना वापरली जाते. 'समुदाय' ही संकल्पना नेहमीच विशिष्ट भौतिक भूप्रदेशाच्या संदर्भात वापरली जाते. मॅक आयव्हर आणि पेज असे म्हणतात, "समुदायाला नेहमीच एक प्रादेशिक स्वरूप असते. समान भूप्रदेश आणि समान जीवनपद्धती हे समुदायाचे वैशिष्ट्य असते."

'समान ध्येय व गरजा भागवण्यासाठी एका विशिष्ट प्रदेशावर राहणाऱ्या समूहास समुदाय असे म्हणतात.' समुदायामध्ये राहणारे लोक हे त्यांचे सामाजिक संबंध निर्माण करतात, त्यांच्यामध्ये एकमेकांबद्दल प्रेम आणि आपुलकी असते आणि ते समान जाणिवा धारण करतात.

### ३.२.१ व्याख्या

१) ***बोगार्डस इ.एस. :*** "विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या व आपलेपणाची भावना असलेला सामाजिक समूह म्हणजे समुदाय होय."

२) ***ऑक्सफर्ड डिक्शनरी :*** "समान भूभागावर राहणाऱ्या किंवा समान विशिष्ट गुणधर्म असणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे समुदाय होय."

३) ***जॉर्ज ल्युंडबर्ग :*** "मर्यादित भूप्रदेशात राहणाऱ्या व समान असे स्वतंत्र जीवन जगणाऱ्या मानवी लोकसंख्येस समुदाय असे म्हणतात."

समुदायामध्ये पुढील बाबी समाविष्ट होतात.

(i) समान भौगोलिक प्रदेश

(ii) समान आवडीनिवडी

(iii) परस्परावलंबित सामाजिक जीवन

(iv) आपलेपणाची भावना

### ३.२.२ समुदायाचे घटक

**मॅक आयव्हर यांनी समुदायाचे दोन महत्त्वाचे घटक सांगितले आहेत.**

(१) विशिष्ट भूप्रदेश (२) समुदाय भावना.

**(१)विशिष्ट भूप्रदेश :** समुदाय हा एक प्रादेशिक समूह आहे. तो कायम एक भौगोलिक प्रदेश व्याप्त करत असतो. त्याच्या स्वतःच्या अशा ठरावीक प्रादेशिक सीमारेषा असतात. प्रदेश हा समुदायाचा भौतिक पाया आहे. जरी स्थलांतर किंवा बदलाची सवय असली तरी भटक्या समाजामध्येही समुदाय असतो. लोकांचा समूह जेव्हा एका विशिष्ट प्रदेशामध्ये वास्तव्य करण्यास सुरुवात करतो तेव्हाच समुदाय तयार होतो.

एकत्र राहण्याने लोकांचे सामाजिक संबंध विकसित होतात. एकत्रित राहण्यामुळे लोकांना संरक्षण, सुरक्षा, निर्भीडता प्राप्त होते, यातून समुदायातील सदस्यांना त्यांचे समान ध्येय प्राप्त करण्यासाठी मदत होते. एकाच प्रदेशावर राहणाऱ्या लोकांमध्ये दृढ ऐक्य निर्माण होते. विशिष्ट प्रदेश हा सामुदायिक जीवनाचा पायाभूत घटक आहे.

**(२)समुदाय भावना:** समुदाय भावना म्हणजे समान विचार धारण करणे. सदस्यांमध्ये कायम एकत्रित असण्याची आणि समान उद्दिष्टांची जाणीव असावी लागते. समुदायामध्ये राहणाऱ्या व्यक्तींमध्ये एकत्रित जीवन जगण्याची जाणीव असावी लागते. समुदाय भावनेमुळे व्यक्ती आपल्या समुदायाशी भावनिकदृष्ट्या जोडल्या जातात.

**उपक्रम – १**

आदिवासी, ग्रामीण किंवा शहरी समुदायाला भेट द्या आणि ३ ते ५ लोकांशी चर्चा करून त्यांच्या कुटुंब, प्रथा, श्रद्धा व कार्य इत्यादींबाबत माहिती घेऊन अहवाल तयार करा किंवा मोबाइलवर एक छोटी फिल्म तयार करून वर्गात सादर करा.

### ३.३ सामाजिक समूह

सामान्यतः समूह या शब्दाचा अर्थ व्यक्तींचा समुच्चय असा असू शकेल. समूह हा शब्द मुक्तपणे वापरला जातो. काही वेळा सामाजिक समूह हा शब्द संपूर्ण मानव समूहासाठी वापरला जातो तर काही वेळा हाच शब्द दोन व्यक्तींनी मिळून बनलेल्या लहान समूहासाठी देखील वापरला जातो. सामाजिक समूह ही अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. मानव हा सामाजिक प्राणी आहे म्हणून तो नेहमी सामाजिक समूहात राहतो. जगात सर्वत्र मानव एकमेकांच्या घनिष्ठ सामाजिक साहचर्यात राहतात. जन्मापासून लोक नेहमीच समूहात राहतात. समूहात राहूनच ते समाजशील बनण्यास शिकतात. समूह जीवनाद्वारेच आपण आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यास समर्थ बनतो.



सामाजिक समूह

### ३.३.१ व्याख्या

***(१)ऑगबर्न आणि निमकॉफ :*** "ज्या वेळी दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रित येतात आणि परस्परांवर प्रभाव पाडतात त्या वेळी त्यांचा सामाजिक समूह निर्माण होतो."

***(२)ऑक्सफर्ड डिक्शनरी :*** "काही व्यक्ती या एकमेकांशी कमी-जास्त प्रमाणात संलग्न होतात किंवा एकत्रित येतात. कारण एकतर त्या समान वर्ग किंवा वंश म्हणून ठरावीक वैशिष्ट्ये धारण करतात किंवा ते आंतरक्रियेच्या विशिष्ट

आकृतिबंधामुळे एकमेकांसोबत बांधले गेलेले असतात."

***(३)मॅक आयव्हर आणि पेज :*** "परस्परांशी सामाजिक संबंध प्रस्थापित झालेल्या मानवांचा समुच्चय म्हणजे समूह होय."

थोडक्यात, साामजिक समूह म्हणजे

(१) समान ध्येय आणि अपेक्षा असणाऱ्या व्यक्तींचा समुच्चय.

(२) नियमित आंतरक्रिया असणाऱ्या व्यक्तींचा समुच्चय.

(३) समान गुणवैशिष्ट्ये असणाऱ्या व्यक्तींचा समुच्चय.

### ३.३.२ सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये

(i) सामाजिक समूह अस्तित्वात येण्यासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींची गरज असते. व्यक्तींशिवाय सामाजिक समूह हा तयारच होऊ शकत नाही. कमीत-कमी दोन व्यक्तींचा मिळून सामाजिक समूह निर्माण होतो. उदा., पती-पत्नी, दोन मित्र इत्यादी.

(ii)समूह निर्माण होण्यासाठी आंतरक्रिया महत्त्वपूर्ण मानली जाते. सामाजिक समूह हे सामाजिक आंतरक्रियांची व्यवस्था आहे.

(iii) समूह जीवनामध्ये परस्परांविषयीची जाणीव समाविष्ट असते.

(iv) 'आपलेपणाची भावना' समूहाचे ऐक्य दर्शवते. ही भावना सामूहिक जाणिवेची निर्मिती करते.

(v)समान गरजा भागवण्यासाठी समूह निर्माण होतात. उदाहरणार्थ, राजकीय समूह, धार्मिक समूह, जातीय समूह, क्रीडा समूह.

(vi) सदस्यांची वर्तणूक नियंत्रित करण्यासाठी प्रत्येक समूहाची स्वतःची अशी मूल्ये, नियम (लिखित/अलिखित) असतात.

(vii) सामाजिक समूह हे मूलतःच गतिशील असतात. याचाच अर्थ सामाजिक समूह हे वेळोवेळी परिवर्तित होत राहतात.

### ३.३.३ सामाजिक समूहांचे प्रकार

विविध समाजशास्त्रज्ञांनी समूहांच्या केलेल्या वर्गीकरणाचा अभ्यास करून सामाजिक समूहांचे विविध गुणधर्म पाहणार आहोत.

**(१)अंतःसमूह आणि बहिःसमूह :** अंतःसमूह म्हणजे ज्यामध्ये लोकांना आपलेपणाची भावना किंवा आपण याच समूहाचे आहोत असे वाटते तो समूह होय. या समूहामध्ये 'आपण किंवा आम्ही' अशी भावना असणारे सर्व लोक समाविष्ट होतात. अंतःसमूह म्हणजे एखाद्या कुटुंबासारखा छोटा किंवा समाजासारखा मोठा समूहही असू शकतो. अंतर्गत समूहाचे अस्तित्व 'बहिःसमूहाची' जाणीव करून देते. थोडक्यात, लोक ज्या समूहाला आपला समजत नाहीत किंवा आपण या समूहाचे नाही असे मानतात तो समूह म्हणजे बहिःसमूह/बाह्यसमूह.

**विल्यम सम्नर** यांनी या दोन समूहांतील फरक दाखवून दिला आहे. अंतःसमूह म्हणजे 'आम्ही समूह' आणि बहिःसमूह म्हणजे 'त्यांचा समूह'. अंतःसमूह लोक एकमेकांना त्यांच्यातीलच एक म्हणून ओळखतात आणि त्यांच्यात आपलेपणाची भावना असते. अंतःसमूहातील व्यक्तींना दुसऱ्या एखाद्या सांस्कृतिक किंवा वांशिकदृष्ट्या भिन्न वाटणाऱ्या समूहांकडून धोका वाटू शकतो किंवा द्वेष भावना जाणवते. यालाच समाजशास्त्रज्ञ बाह्य समूह किंवा 'त्यांचा' समूह असे म्हणतात. बहिःसमूहाची परिभाषाच अंतःसमूहाच्या संदर्भात केली जाते. बहिःसमूहामध्ये अशाच व्यक्तींचा समावेश केला

जातो ज्या आपल्यापेक्षा वेगळ्या आहेत असे वाटते किंवा ज्यांचा द्वेष केला जातो किंवा ज्यांच्याबरोबर स्पर्धा किंवा संघर्ष असतो. असे असले तरीही परिस्थितीनुसार अंतःसमूह आणि बहिःसमूहामधील भेदाची व्याख्या बदलू शकते.

**(२)ऐच्छिक आणि अनैच्छिक समूह : चार्ल्स एलवूड** यांनी हे वर्गीकरण मांडले आहे. त्यांच्या मते, ऐच्छिक समूहामध्ये राजकीय पक्ष, ट्रेड युनियन, युवा संस्था, सांस्कृतिक मंडळे इत्यादी येतात. अनैच्छिक समूहामध्ये कुटुंब, जात, वंश इत्यादी येतात.

ऐच्छिक समूहाचे सदस्यत्व हे स्वतः स्वीकारलेले असते. या समूहामध्ये सदस्य प्रवेश करू शकतात किंवा त्यातून स्वेच्छेने बाहेरही पडू शकतात. या समूहातील सदस्यांवर कोणत्याही प्रकारची सक्ती किंवा अधिक काळ राहण्याची सक्ती नसते. उदाहरणार्थ, व्यावसायिक समूह.

अनैच्छिक समूहाचे सदस्यत्व हे जन्माने प्राप्त होते किंवा यामध्ये स्वेच्छेपेक्षा सक्ती अधिक असते. उदाहरणार्थ, कुटुंब, जात, धार्मिक समूह, वंश इत्यादी.

| ऐच्छिक समूह | अनैच्छिक समूह |
|---|---|
| स्वेच्छेवर सदस्यत्व आधारित | जन्मावर सदस्यत्व आधारित |
| सदस्यत्व सोडणेही स्वेच्छेवर आधारित | कोणीही सदस्यत्व नाकारू शकत नाही/ते नाकारणे अवघड असते. |
| उदाहरणार्थ, राजकीय पक्ष, व्यापारी संघटना, युवा संघटना, सांस्कृतिक मंडळे | उदाहरणार्थ, कुटुंब, जात, वंश |

**(३)लहान आणि मोठा समूह : जॉर्ज सिमेल** यांनी याचे वर्गीकरण केले आहे. या वर्गीकरणामध्ये समूहाच्या आकारमानाला महत्त्व आहे.

लहान समूहामध्ये 'जोडी', 'त्रिकूट' आणि इतर लहान समूहांचा समावेश होतो. मोठे समूह हे वांशिक समूह, राष्ट्र आणि इतर मोठ्या मंडळांचे प्रतिनिधित्व करतात.

ज्या समूहांचा आकार खूप लहान असतो व ज्यामध्ये सर्वच व्यक्ती एकमेकांबरोबर आंतरक्रिया करू शकतात, संवाद साधू शकतात व कमीत-कमी एकमेकांशी परिचित असतात, त्यांना लहान समूह असे म्हटले जाते. काही प्राथमिक समूह जसे की, कुटुंब हेही लहान समूहामध्ये येते. लहान समूहालाच अनौपचारिक समूह देखील म्हटले जाते.

| लहान समूह | मोठा समूह |
|---|---|
| अनौपचारिक आणि आकृतिबंध नसलेला | औपचारिक आणि आकृतिबंध असलेला |
| अनौपचारिक आंतरक्रियांवर आधारित | औपचारिक आंतरक्रियांवर आधारित |
| व्यक्तिगत आंतरक्रिया | व्यक्तिगत आंतरक्रिया अवघड |
| आकाराने लहान | आकाराने मोठा |
| उदाहरणार्थ, जोडी, त्रिकूट, कुटुंब, नातेसंबंध | उदाहरणार्थ, राष्ट्र, विद्यापीठ, राज्य, वंश |

समूहामधील आंतरक्रियेच्या प्रक्रियेला महत्त्व देणारे जॉर्ज सिमेल हे पहिले जर्मन समाजशास्त्रज्ञ आहेत. समूहाच्या आकारमानावर प्रकाश टाकताना सिमेल म्हणतात, लहान समूहांमध्ये विशिष्ट प्रकारच्या आंतरक्रिया दिसून येतात. जसजसे समूहाचे आकारमान वाढत जाते तसतसे या आंतरक्रियांमध्ये बदल होतो, काही आंतरक्रिया संपूर्णपणे लुप्त होतात.

सर्वात लहान समूह म्हणजे 'जोडी' किंवा

दोन सदस्यांचा समूह. एक लग्न झालेले जोडपे हे 'जोडी' चे उदाहरण आहे. जेव्हा या लग्न झालेल्या जोडप्याला मूल होते तेव्हा ते तीन सदस्य होतात. यालाच 'त्रिकूट' म्हणजे तीन सदस्यांचे कुटुंब किंवा तीन सदस्यांचा लहान समूह असे संबोधले जाते.

**(४)प्राथमिक आणि दुय्यम समूह :** सामाजिक समूहांचे प्राथमिक आणि दुय्यम असे दोन समूहांमध्ये विभाजन केले जाते. सामाजिक आंतरक्रियांचे गुणधर्म आणि लक्षणे यांच्या आधारे प्राथमिक आणि दुय्यम असे समूहांचे वर्गीकरण केले जाते. ज्या समूहांमध्ये व्यक्ती एकमेकांसोबत परस्पर सहकार्य भावनेने काम करतात आणि त्यांच्यात जवळचे संबंध निर्माण होतात त्यांना 'प्राथमिक समूह' असे म्हणतात. कुटुंब हे प्राथमिक समूहाचे अगदी उत्तम उदाहरण आहे. परंतु जसजसा समाज विकसित होत जातो तसतसे दुय्यम समूह हे वाढत जातात. दुय्यम समूहांमध्ये व्यक्तींचे परस्परसंबंध हे खूप जवळचे नसतात. व्यावसायिक कंपनी, कामगार संघटना इत्यादी दुय्यम समूहाची उदाहरणे होत.

**(१)प्राथमिक समूह :** **चार्ल्स हार्टन कूले** यांनी त्यांच्या 'Social Organization' या पुस्तकामध्ये १९०९ साली 'प्राथमिक समूह' ही संज्ञा प्रथमतः वापरली. यामध्ये त्यांनी व्यक्तिगत, प्रत्यक्ष समोरासमोरील संबंध आणि सहकार्य अशा लहान समूहांच्या वैशिष्ट्यांचा उल्लेख केला. प्राथमिक समूह हे सामाजीकरणाची प्रक्रिया, भूमिका व दर्जाच्या विकासामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावतात.

प्राथमिक समूह हे व्यक्तीच्या रोजच्या जीवनातील आवश्यक घटक आहे. कुटुंब, जवळचा मित्र परिवार, शेजारी गाव हे सर्व प्राथमिक समूह आहेत. हे समूह अनौपचारिक संबंधावर आधारित असतात. सामाजिक जीवन हे याच समूहामधून सुरू होते.



प्राथमिक समूह

**✻ प्राथमिक समूहाची वैशिष्ट्ये**

(i) **भौतिक सान्निध्य :** भौतिक सान्निध्य हे प्राथमिक समूहासाठी आवश्यक असते. भौतिक सान्निध्य या वैशिष्ट्यामुळेच कुटुंब आणि शेजार हे प्राथमिक समूह म्हणून ओळखले जातात.

(ii) **समूहाचे लहान आकारमान :** प्राथमिक समूहासाठी त्याचा आकार लहान असणे आवश्यक असते. समूहातील लहान आकारामुळेच त्यातील सदस्यांचे एकमेकांबरोबर जवळचे संबंध निर्माण होतात.

(iii) **नात्यांचे शाश्वत स्वरूप :** नात्यातील शाश्वत स्वरूपाचे संबंध त्यातील सदस्यांमध्ये जास्तीत जास्त एकात्मता किंवा अतूटता निर्माण करतात.

(iv) **प्रत्यक्ष संबंध :** प्राथमिक समूह हे जवळीकतेवर किंवा निकटतेवर आधारित असतात. अशा प्रकारच्या समूहांमध्ये प्रत्यक्ष संबंध हे जवळीकता किंवा निकटता निर्माण करतात. हे समूहाची स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असते.

v) **समान उद्दिष्ट्ये आणि ध्येय :** येथे प्राथमिक समूहामधील सदस्यांमध्ये उद्दिष्ट्ये किंवा ध्येयाची साम्यता दिसून येते. यांतील सदस्य एकमेकांचा आदर करतात आणि सर्व प्रकारच्या भावना

एकमेकांसोबत वाटून घेतात.

(vi) **परस्परसंबंध हेच साध्य :** प्राथमिक समूहातील संबंध म्हणजे कोणतेही उद्दिष्ट साध्य करण्याचे साधन नसून ते परस्परसंबंध हेच त्या समूहाचे साध्य असते. या समूहातील संबंध हे अगदी स्वाभाविक असतात.

(vii) **अनौपचारिक नियंत्रण:** प्राथमिक समूहातील सदस्यांवर कोणत्याही प्रकारचे औपचारिक नियंत्रण नसते. ते परंपरागत आणि भावनिक बंधावर आधारित असतात.

वरील सर्व वैशिष्ट्यांबरोबरच व्यक्तिगत संबंध, समाविष्ट संबंध, सहज किंवा स्वयंस्फूर्त संबंध, निसर्गतःच असलेली तुलनात्मक अतुटता किंवा स्थायीभाव हे देखील प्राथमिक समूहाचे काही गुणधर्म आहेत.

**२) दुय्यम समूह :** दुय्यम समूह म्हणजे औपचारिक, व्यक्तिनिरपेक्ष समूह. हा समूह प्राथमिक समूहाच्या अगदी विरुद्ध असतो आणि त्याचे गुणधर्मही त्यापेक्षा अगदी वेगळे आहेत. उदाहरणार्थ, राष्ट्र, राजकीय पक्ष आणि कामगार संघटना इत्यादी. या समूहातील सदस्यांमध्ये मर्यादित सान्निध्य किंवा जवळीक दिसून येते.

ड्रेसलर आणि विलिस यांनी दुय्यम समूहाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

"ज्या समूहातील सदस्यांमधील परस्परसंबंध व्यक्तीनिरपेक्ष असतात त्या समूहांना दुय्यम समूह असे म्हणतात".

**✻ दुय्यम समूहाची वैशिष्ट्ये**

(i) **मोठे आकारमान :** दुय्यम समूह हा आकाराने मोठा असतो. प्राथमिक समूहाच्या मानाने यातील सदस्यत्व हे अमर्याद असते.

(ii) **अप्रत्यक्ष संबंध :** या समूहातील सभासदांचे संबंध हे सामान्यतः अप्रत्यक्ष स्वरूपाचे असतात. हे संबंध पत्र, दूरध्वनी, ई-मेल, व्हॉट्स ॲप इत्यादींवर अवलंबून असतात. हे संबंध अप्रत्यक्ष असतात कारण या व्यक्ती एकमेकांपासून दूर अंतरावर असतात.

(iii) **व्यक्तिनिरपेक्ष किंवा वस्तुनिष्ठ संबंध :** दुय्यम समूहातील व्यक्ती या बऱ्याचदा एकमेकांना वैयक्तिकरित्या ओळखत नसतात. त्याच्या मोठ्या आकारामुळे त्यांच्यामध्ये मर्यादित वैयक्तिक आंतरक्रिया होत असतात. हर्टन आणि हंट यांच्या मते, 'दुय्यम समूह हे ध्येयाभिमुख असतात.'

(iv) **हेतुपुरस्सर स्थापना :** एक 'विशिष्ट स्वारस्य समूह' म्हणून दुय्यम समूह हे यातील सदस्यांची ध्येय पूर्ण करण्यासाठी किंवा भागवण्यासाठी जाणीवपूर्वक स्थापन केलेले असतात.

(v) **औपचारिक संबंध :** दुय्यम समूहातील सदस्यांचे संबंध औपचारिक असतात. ते नियम, कायदे, कार्यपद्धती यांवर अवलंबून असतात.

| प्राथमिक समूह | दुय्यम समूह |
|---|---|
| समोरासमोरील जवळचे संबंध | आंतर राखून असणारे संबंध |
| परस्पर सहकार्य हा पाया | परस्पर सहकार्य अवघड |
| व्यक्तीच्या दैनंदिन जीवनामध्ये सहायक | व्यक्तीच्या दैनंदिन जीवनामध्ये असहायक |
| अनौपचारिक संबंध | औपचारिक संबंध |
| भौतिक सान्निध्य | भौतिक दूरत्व / अंतर |
| आकाराने लहान | आकाराने मोठा |
| नात्यातील स्थायीभाव | जास्त काळ न टिकणारे/ स्थायी नसणारे |
| सदस्यत्व व ओळख हेच साध्य असते. | विशिष्ट उद्दिष्ट पूर्तीसाठी जाणीवपूर्वक निर्मिती |
| परस्परांतील नाते हेच अंतिम साध्य असते. | परस्परांतील संबंध हे साध्य गाठण्याचे साधन असते. |

| अनौपचारिक नियंत्रण | औपचारिक नियंत्रण |
|---|---|
| उदाहरणार्थ, कुटुंब, सहकारी समूह, शेजार, नात्यांचा समूह किंवा नात्यातील माणसांचा समूह. | उदाहरणार्थ, राष्ट्र, राज्य, व्यावसायिक कंपनी, कामगार संघटना. |

**उपक्रम – २**

प्राथमिक आणि दुय्यम समूहाच्या आंतरक्रियांच्या छायाचित्रांचा वापर करून छायाचित्र निबंध तयार करा. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जवळच्या ठिकाणी जाऊन आपल्याकडील साधनांद्वारे (उदा., मोबाइल) विविध समूहांमधील आंतरक्रिया कशा घडतात किंवा काय स्वरूपाच्या असतात हे टिपण्याचा प्रयत्न करा.

छायाचित्र निबंध कसा तयार करावा यासाठी पुढील लिंकला भेट द्या.

http://www.collectivelens.com/blog/creating-photo-essay/

**✻ संदर्भ समूह :** **रॉबर्ट मर्टन** या समाजशास्त्रज्ञांनी संदर्भ समूह ही संकल्पना मांडली. रॉबर्ट मर्टन यांच्या मते, ज्या भूमिका व स्थान मिळवण्याची व्यक्तींची इच्छा असते अशाच समूहाकडे व्यक्ती संदर्भ समूह म्हणून बघतात. संदर्भ समूह म्हणजे असे समूह ज्यांच्या संदर्भाने व्यक्ती स्वतःच्या गुणवत्ता, परिस्थिती, दृष्टीकोन, मूल्य आणि वर्तनाचे मूल्यमापन करत असतात. म्हणूनच संदर्भ समूह म्हणजे असा गट ज्याच्याशी आपण आपली तुलना करतो.आपण आपल्या वर्तणुकीला आणि दृष्टिकोनाला मार्ग दाखवण्यासाठी संदर्भ समूहांचा वापर करतो आणि सामाजिक प्रमाणके ओळखण्यासाठी ते मदत करतात. भूतकाळात ज्याचा आपण भाग होतो किंवा भविष्यकाळात आपण ज्याचा भाग होऊ शकतो असा समूह म्हणजे संदर्भ समूह होय (एखादी लग्न झालेली व्यक्ती तिच्या/त्याच्या लग्न न झालेल्या मित्र, मैत्रिणीला संदर्भ समूह म्हणून पाहू शकते; जरी त्यांना माहीत असले की या समूहाचे आपण कायमचे सभासद नाही आहोत तरीही). इथे एक गोष्ट जाणून घेणे महत्त्वाचे ठरते की आपल्यापैकी बरेच जण हे अनेक संदर्भ समूहांवर अवलंबून असतो. संदर्भ समूह हे अनौपचारिक आणि औपचारिक अशा दोन प्रकारचे असतात.

बरेच संदर्भ समूह हे अनौपचारिक संदर्भ समूह असतात. या समूहातील व्यक्ती या व्यक्तिगत पातळीवरच संवाद साधत असतात. उदा., अनौपचारिक संदर्भ समूहामध्ये – कुटुंब, सहकारी समूह येतात.

औपचारिक संदर्भ समूहाचे विशिष्ट ध्येय किंवा उद्दिष्ट ठरलेले असते. त्यांची विशिष्ट अशी रचना व अधिकाराच्या जागा ठरलेल्या असतात. औपचारिक संदर्भ समूहामध्ये कामगार संघटन, सर्वोच्च न्यायालय इत्यादी येतात.

**संदर्भ समूहावरील अधिक माहितीसाठी खालील लिंक पहा.**

https://study.com/academy/lesson/referencegroup-in-sociology-defination-examples-types.html

## ३.४ सामाजिक दर्जा, सामाजिक भूमिका, सामाजिक नियमने

प्रत्येक समाजामध्ये सामाजिक दर्जा, सामाजिक भूमिका आणि सामाजिक नियमने या एकमेकांशी संबंधित संकल्पना असतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विशिष्ट असा दर्जा असतो. आपण आपल्या समाजातील स्थानानुसार भूमिका बजावत असतो. समाजामध्ये व्यक्तींच्या भूमिका आणि वर्तणुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही शिस्त आणि कायदे असतात, त्यांनाच 'सामाजिक नियमने' असे म्हणतात. या तीन पायाभूत संकल्पना पुढीलप्रमाणे–

### ३.४.१ सामाजिक दर्जा

प्रत्येक व्यक्तीची समाजामध्ये स्वतःची अशी एक स्वतंत्र ओळख असते. त्यातूनच त्या व्यक्तीचे समाजातील स्थान किंवा दर्जा ठरतो.

व्यक्तीचे सामाजिक परिस्थितीतील आणि नात्यातील स्थान म्हणजेच सामाजिक दर्जा होय. सामान्यतः आपण बऱ्याचदा एखाद्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा उच्च किंवा कनिष्ठ आहे असे म्हणतो. एखाद्या व्यक्तीची समाजातील प्रतिष्ठा आणि त्याची समाजातील सत्ता यावर आपण त्याचा दर्जा ठरवत असतो.

#### व्याख्या

१. ***राल्फ लिंटन :*** "विशिष्ट व्यवस्थेमध्ये एखाद्या व्यक्तीने विशिष्ट वेळेस मिळवलेले स्थान म्हणजे दर्जा होय."

२. ***ऑक्सफर्ड डिक्शनरी :*** "एखादी व्यक्ती, देश किंवा संस्था यांना ठरवून दिलेले अधिकार आणि जबाबदारी यांनुसार त्यांचे केलेले अधिकृत वर्गीकरण म्हणजे दर्जा होय."

३. ***टॉलकॉट पार्सन्स :*** "दर्जा म्हणजे भूमिकेचा स्थानात्मक पैलू होय."

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की दर्जा ही एक तुलनात्मक संज्ञा आहे. आपल्या समाजामध्ये एखादी व्यक्ती राष्ट्राचा राष्ट्रपती, विद्यापीठाचा कुलगुरू, जिल्हाधिकारी, बँक मॅनेजर, कामगार नेता, शिक्षक, पालक, सैनिक, विद्यार्थी, मुलगी इत्यादी दर्जा मिळवू शकतात. जरी असे असले तरी प्रत्येक ठिकाणी प्रत्येक व्यक्तीचा दर्जा हा बदलू शकतो. उदा., घरी पालक असलेली व्यक्ती शाळेत शिक्षक असू शकते किंवा दुकानात ग्राहक म्हणून किंवा एखाद्या राष्ट्राची नागरिकसुद्धा असते.

#### दर्जाचे प्रकार

**राल्फ लिंटन** यांनी दर्जाचे 'अर्पित दर्जा' आणि 'अर्जित दर्जा' असे दोन प्रकार सांगितले आहेत.

**(१) अर्पित दर्जा :** हा दर्जा समाजाने व्यक्तीला दिलेला किंवा बहाल केलेला असतो. सामान्यतः जन्माने हा दर्जा मिळतो. हा वय, लिंग, नाते संबंध, वंश इत्यादींवर आधारित असतो. मुळात हे निर्धारक जीवशास्त्रीय असतात, परंतु आपल्या संस्कृतीमध्ये सामाजिक अर्थाने ते अधिक महत्त्वपूर्ण आहेत.

**(२) अर्जित दर्जा :** अर्जित दर्जा म्हणजे व्यक्ती स्वतःच्या प्रयत्नांनी समाजामध्ये जे स्थान मिळवते त्यास अर्जित दर्जा असे म्हटले जाते. व्यक्ती स्वतःच्या विशेष कौशल्यांच्या आधारे स्थान किंवा दर्जा प्राप्त करते. राजकीय, क्रीडा, शिक्षण आणि उद्योग या सर्व सामाजिक क्षेत्रांत हे दिसून येते.

| अर्पित दर्जा | अर्जित दर्जा |
|---|---|
| हा जन्मावर आधारित असतो. | हा स्वतःच्या योग्यता किंवा प्रयत्नांनी मिळवतात. |
| व्यक्तीचे शारीरिक घटक जसे की वय, लिंग, नाते-संबंध यांच्याशी संबंधित. | व्यक्तीच्या बुद्धिमत्ता, कौशल्ये, महत्वाकांक्षा, योग्यता, प्रयत्न यावर आधारित. |
| गतिशीलतेचा अभाव. | अधिक गतिशील. |
| आधुनिक समाजामध्ये याला अधिक महत्त्व नाही. | आधुनिक समाजामध्ये अधिक महत्वाचे मानले जाते. |

### ३.४.२ सामाजिक भूमिका

दर्जाच्या कार्यात्मक पैलूला 'भूमिका' असे म्हणतात. हा दर्जाच्या कर्तव्याशी संबंधित आचरणाचा किंवा वर्तणुकीचा पैलू आहे. समाजातील व्यक्तीच्या स्थानानुसार जेव्हा ती व्यक्ती वर्तणूक करते तेव्हा त्यास 'भूमिका' असे म्हटले जाते. त्यामुळे दर्जा आणि भूमिका एकमेकांना पूरक असतात. दर्जा आणि भूमिका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

#### व्याख्या

***(१) राल्फ लिंटन :*** "सामाजिक स्थानाचा गतिशील पैलू म्हणजे भूमिका होय."

***(२) एलि चिनॉय :*** "व्यक्तीच्या सामाजिक स्थानानुसार जी वर्तनप्रणाली अपेक्षित असते त्याला भूमिका म्हणतात."

*(३)ऑक्सफर्ड डिक्शनरी :* "एखाद्या विशिष्ट परिस्थितीमध्ये व्यक्तीकडून अपेक्षित असलेले वर्तन म्हणजे त्या व्यक्तीची भूमिका होय."

**भूमिकेशी संबंधित संकल्पना**

**(१)भूमिका वठवणे :** एखाद्या ठरावीक परिस्थितीमध्ये व्यक्ती जी भूमिका बजावते त्यास भूमिका वठवणे असे म्हणतात.

**(२)भूमिका संच :** विविध भूमिकांचा समुच्चय म्हणजे भूमिका संच होय. उदा., एखाद्या विद्यापीठातील प्राध्यापक हे शिकवणे, संशोधन, सल्लागार, प्रशासन,प्रकाशन, परीक्षक (Examining) इत्यादी भूमिका निभवत असतो.


**(३)भूमिका तणाव :** एखादी भूमिका निभावताना अपेक्षित वर्तनाची पूर्तता करताना येणाऱ्या अडचणींमुळे निर्माण होणारा ताण म्हणजे भूमिका तणाव होय.



भूमिका तणाव

**(४)भूमिका संघर्ष :** विशिष्ट परिस्थितीमध्ये व्यक्तीकडून अपेक्षित दोन किंवा अधिक भूमिकांच्या विसंगततेमुळे भूमिका संघर्ष निर्माण होतो. उदा., एखादी नोकरी करणाऱ्या स्त्रीला घरातील तिची भूमिकाही सांभाळावी लागते.

**(५)भूमिका निर्गमन : हेलेन रोज** यांच्या मते व्यक्तींच्या अस्मितेसाठी महत्त्वाची असणारी भूमिका जेव्हा व्यक्तीला सोडावी लागते किंवा त्या भूमिकेतून बाहेर पडून एक नवीन भूमिका किंवा ओळख आत्मसात करावी लागते तेव्हा या प्रक्रियेला भूमिका निर्गमन असे म्हणतात.




भूमिका निर्गमन

**उपक्रम – ३**

भूमिकेतील संघर्ष व तणाव समजून घेण्याकरता वर्गात भूमिकाभिनय (Role play) चे आयोजन करा.
उदा., कमवत्या स्त्रीला घरात व घराबाहेर विविध भूमिका कराव्या लागतात.

## ३.४.३ सामाजिक नियमने

कोणताही समाज किंवा सामाजिक समूह हा नियमनांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. नियमने ही मुख्यतः समाजातील लोकांच्या सामाजिक आंतरक्रिया सहज सोप्या व्हाव्यात यासाठी बनवलेली असतात. प्रत्येक ठिकाणी व्यक्तीचे आचरण कसे असावे यासाठी नियमने ही मार्गदर्शन करत असतात. ती सामान्यतः 'समूह वर्तणुकीचे मानक' असतात. नियमने हा शब्द लोकरूढी, लोकनीती, चालीरीती, कायदे, प्रथा-परंपरा इत्यादींसाठी वापरला जातो. नियमने समाजातील अनुचलनाशी संबंधित असतात. अनुचलनामुळे समाजामध्ये स्थिरता, शांतता आणि व्यवस्था निर्माण होते. मुळात समाज ही एक नियमनात्मक व्यवस्था आहे.

**व्याख्या**

*१. शेरीफ आणि शेरीफ :* "प्रमाणित सामान्यीकरणाशी संबंधित ज्या वर्तणुकीच्या पद्धती असतात त्यास सामाजिक नियमने असे म्हणतात."

२. ***हॅरी जॉन्सन :*** "नियमने म्हणजे अशा अमूर्त पद्धती ज्या वर्तणुकीवर मर्यादा प्रस्थापित करतात."

३. ***लाईट आणि केलर :*** "व्यक्ती त्यांच्या नातेसंबंधात एकमेकांशी वर्तणूक करताना ज्या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुकरण करतात त्यांना नियमने म्हणतात."

**नियमनाचे प्रकार**

१. **लोकरूढी :** ही संज्ञा १९०६ मध्ये **विल्यम सम्नर** यांनी वापरली. त्यांच्या मते समाजामध्ये रूढ असणाऱ्या वर्तनपद्धती म्हणजेच लोकरूढी होय. उदा., जेवणाच्या पद्धती जसे की फक्त हाताच्या बोटांचा वापर करून जेवणे, चॉपस्टीकचा उपयोग करून जेवणे, काटा चमचा आणि चमचा वापरून जेवणे, साडी परिधान करण्याच्या पद्धती.

२. **लोकनीती :** **विल्यम सम्नर** यांच्या मते समाजहिताच्या दृष्टीने समाजात दृढ झालेले व पूर्वापार चालत आलेले रीतीरिवाज म्हणजे लोकनीती होय. लोकनीतींच्या मार्फत व्यक्तींवर कडक निर्बंध लादले जातात. लोकनीती या लोकरूढींपेक्षा अधिक कडक असतात. उदा. विवाहपूर्व लैंगिक संबंधांवर निर्बंध असणे.

३. **कायदा :** कायदा हा समाजाचा महत्त्वाचा आणि आवश्यक घटक आहे. हा एक वैश्विक घटक आहे आणि सर्वांनी त्याचा स्वीकार करणे अनिवार्य आहे.

**कार्ल मॅनहाईम** यांनी कायद्याची व्याख्या देताना म्हटले आहे की, कायदा म्हणजे अशा नियमांची यादी की जे राज्याच्या न्यायालयाकडून ठरावीक परिस्थितीमध्ये लागू केले जातात.

गुंतागुंतीच्या समाजामध्ये कायदे अनिवार्य असतात.

**कायद्याचे दोन प्रकार आहेत.**

**(अ) पारंपरिक कायदा :** हे कायदे आदिवासी त्याचप्रमाणे ग्रामीण समाजामध्ये पाळले जातात हे लिखित स्वरूपाचे नसून मौखिकरित्या प्रसारित केले जातात.

**(ब) अधिनियमित कायदा:** हे कायदे लिखित स्वरूपात असतात. हे कायदे आधुनिक, गुंतागुंतीच्या आणि गतिशील समाजामध्ये महत्त्वाचे तसेच अनिवार्य असतात. त्या विशिष्ट समाजामध्ये सर्वांसाठीच ते लागू असतात. उदा., हिंदू विवाह कायदा – १९५५; घरगुती हिंसाचार कायदा – २००५.

**उपक्रम – ४**

आपल्या रोजच्या जीवनामध्ये दिसून येणाऱ्या लोकरूढी आणि लोकनीती यांची यादी बनवा.

या पाठात समाज, समुदाय, समूह, दर्जा, भूमिका, सामाजिक मूल्ये आणि नियमने अशा मूलभूत समाजशास्त्रीय संकल्पना आपण अभ्यासल्या. या मूलभूत संकल्पना स्पष्ट झाल्यामुळे आता पुढील पाठातील सामाजिक संस्थांच्या महत्त्वाचे आकलन होण्यात निश्चितच मदत होईल.

**सारांश**

- समाजशास्त्राचा नव्याने अभ्यास करणाऱ्यांसाठी समाजशास्त्राच्या पायाभूत संकल्पना समजून घेणे अगदी महत्त्वाचे आहे.
- ॲरिस्टॉटलच्या मते, 'माणूस हा सामाजिक प्राणी आहे.'
- समाज म्हणजे सामाजिक संबंधाची व्यवस्था आहे.
- समुदाय हे आकाराने लहान किंवा मोठे असतात.
- मॅकआयव्हर यांच्या मते, परिसर आणि समुदाय भावना हे समुदायाचे पायाभूत घटक आहेत.
- समुदाय भावनेमध्ये आपलेपणाची भावना, भूमिकेची भावना आणि अवलंबित्वाची भावना असते.
- सामाजिक समूह हे सामाजिक आंतरक्रियांमधून

निर्माण होत असतात.

- दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या सहभागावर सामाजिक समूहांची निर्मिती अवलंबून असते.
- सामाजिक समूहांचे विविध प्रकार आहेत.
- कुले यांनी प्राथमिक समूहाची संकल्पना मांडली आहे. प्राथमिक आणि दुय्यम असे समूहाचे वर्गीकरण केले जाते.
- सामाजिक परिस्थितीमध्ये किंवा व्यवस्थेमध्ये व्यक्तीच्या असलेल्या स्थानाला सामाजिक दर्जा म्हणतात.
- सामाजिक दर्जाचे अर्पित व अर्जित असे दोन प्रकार पडतात.
- दर्जाचा कार्यिक पैलू म्हणजे भूमिका.
- दर्जा आणि भूमिका हे दोन्ही एकमेकांशी परस्पर संबंधित आहेत.
- सामाजिक नियमने ही समूहाच्या वर्तणुकीच्या मानकाशी संबंधित असतात.
- नियमने हा शब्द लोकरूढी, लोकनीती आणि कायदे यांचे प्रतिनिधित्व करतो.

## स्वाध्याय

**प्र.१(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. समाज हा ............ यावर आधारित आहे.
(सहकार्य, स्पर्धा, संघर्ष)

२. गाव हे समुदायाचा ............ भाग आहे.
(ग्रामीण, शहर, महानगर)

३. कुटुंब हे ............ या गटाचे उदाहरण आहे.
(मोठा, प्राथमिक, औपचारिक)

४. सामाजिक दर्जा हा व्यक्तीच्या समाजातील ............ संबंधित असतो.
(कार्य, स्थान, उद्दिष्ट )

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) कुटुंब - ऐच्छिक समूह
(ii) जात - अनैच्छिक समूह
(iii) गाव - प्राथमिक समूह
(iv) कामाचे ठिकाण - दुय्यम समूह

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| भूमिका, लोकरूढी, समाज. |
|---|

१. वर्गात वेळेवर येणे हे विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे.

२. भारतात अनेक ठिकाणी हाताने जेवण्याची पद्धत आहे.

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. रोजच्या जीवनात अवलंबल्या जाणाऱ्या नियमांना <u>आदर्श नियमने</u> म्हणतात.

२. कुटुंब हे <u>ऐच्छिक</u> समूहाचे उदाहरणे आहे.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. आर्थिक जीवनातील अर्जित दर्जा

२. विद्यार्थी म्हणून भूमिका संघर्ष

**(ब) टीपा लिहा.**

१. समाजाची वैशिष्ट्ये

२. प्राथमिक गटाची वैशिष्ट्ये

३. नियमनांचे प्रकार

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. प्राथमिक गट आणि दुय्यम गट

२. अनैच्छिक गट आणि ऐच्छिक गट

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. संदर्भ गट


२. भूमिका संघर्ष

**प्र.५ खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. समाज कधीच बदलत नाही.

२. समुदायामध्ये राहणाऱ्या व्यक्तींमध्ये एकत्रित जीवन जगण्याची जाणीव असते.

**प्र.६(अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**(ब) आपले मत नोंदवा.**

१. लोकरूढी, लोकनीती आणि कायदे यांचा एकमेकांशी कसा संघर्ष होतो ते सांगा.

२. सामाजिक जीवनात भूमिका संघर्ष अटळ आहे असे तुम्हाला वाटते का?

**प्र.७ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५० शब्द)**

तुम्ही सदस्य असलेले कोणतेही दोन दुय्यम समूह ओळखा. तुम्ही सांगितलेल्या समूहांचा संदर्भ घेऊन समूहाची चार वैशिष्ट्ये सांगा.

**उपक्रम**

तुमच्या महाविद्यालयातील/शाळेतील एक आणि तुम्ही राहता त्या परिसरातील एक असे दोन समूह निवडा आणि त्या दोन्हींमध्ये खालील मुद्द्यांच्या आधारे तुलना करा.

१) समूहाचा आकार

२) समूहाच्या सभासदत्वाविषयीचे नियम

३) समूहाची बांधणी

***

# ४. सामाजिक संस्था

४.१ सामाजिक संस्था: व्याख्या आणि वैशिष्ट्ये
४.२ कुटुंब
४.३ विवाह
४.४ अर्थव्यवस्था आणि काम
४.५ शिक्षण

## प्रस्तावना

व्यक्ती आणि समाज यांतील सहसंबंध समजून घेणे हा समाजशास्त्राचा महत्त्वाचा हेतू आहे. कॉम्त, डरखाईम, मार्क्स आणि वेबर यांसारख्या समाजशास्त्रातील प्रमुख विचारवंतांच्या लिखाणातून मानवप्राण्याचे समाजशील स्वरूप अधोरेखित होते. व्यक्तींचे एकमेकांबरोबर असणारे सहसंबंध आणि आपले सामाजिक अस्तित्व हा मानवी समाजाचा मूलभूत पैलू आहे. समाज आणि व्यक्ती हे अविभाज्य घटक आहेत. व्यक्तींमधील आंतरक्रिया व आंतरसंबंधांतूनच समाज घडत असतो, तर दुसरीकडे व्यक्ती ज्या विविध भूमिका पार पाडत असतात, जो दर्जा धारण करतात, ज्या मूल्यांचा पाठपुरावा करत असतात व ज्या नियमनांच्या चौकटीत वावरत असतात त्या सर्वांतून व्यक्तींमध्ये समाजाचे अस्तित्व असतेच.

व्यक्ती आणि समाज यांमधील सहसंबंध स्पष्ट करण्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक संस्था ही मूलभूत संकल्पना वापरली आहे. सामाजिक संस्था हा मानवी समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म, राज्य, प्रसारमाध्यमे, कायदा आणि अर्थव्यवस्था अशा विविध सामाजिक संस्थांमधून समाज बनलेला आहे.

या सामाजिक संस्थांचे सदस्य म्हणूनच व्यक्ती–व्यक्तींमधील आंतरक्रिया घडत असतात. कुटुंब आणि नातेसंबंधांच्या जाळ्यांमधून पुनरुत्पादन व समाजीकरणांचे कार्य कसे होते; वस्तू व सेवांच्या उत्पादन आणि वितरणाचे काम बाजारपेठ आणि अर्थव्यवस्था कसे पार पाडते; तसेच सामाजिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी कायदा व राजकीय व्यवस्थेतून कशी पार पाडली जाते अशा सोप्या उदाहरणांतून सामाजिक संस्था ही संकल्पना समजावून घेण्याचा प्रयत्न या पाठातून आपण करणार आहोत. थोडक्यात, व्यापक सामाजिक जीवनाच्या दृष्टीने व्यक्तींच्या वर्तनात समन्वय राखण्याचे कार्य सामाजिक संस्था करतात.

## ४.१ सामाजिक संस्था : व्याख्या आणि वैशिष्ट्ये

### ४.१.१ व्याख्या

*(१) हॉर्टन आणि हंट :* "समाजाच्या मूलभूत गरजा ज्या नियम आणि प्रक्रियांच्या मार्फत भागवल्या जातात अशा सहसंबंधांच्या संघटित व्यवस्थेला सामाजिक संस्था असे म्हणता येईल."

*(२) इ. एस्. बोगार्डस :* "समाजामध्ये व्यक्तींच्या गरजा भागवणाऱ्या सुनिश्चित स्वरूपाच्या प्रक्रियांची संरचना म्हणजे सामाजिक संस्था होय."

*(३) एच. ई. बार्नेस :* "मानवी गरजा भागवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बहुविध क्रिया-प्रक्रियांना संघटित, मार्गदर्शित व कार्यन्वित करणाऱ्या सामाजिक संरचना व यंत्रणा म्हणजे सामाजिक संस्था होय."

### ४.१.२ सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये

(i) सामाजिक संस्था म्हणजे सुस्पष्ट, स्थिर स्वरूपाच्या वर्तन पद्धतींची व्यवस्था होय.

(ii) व्यक्तींच्या सामूहिक क्रियांवर सामाजिक संस्था

अवलंबून असतात.

(iii) सामाजिक संस्थांच्या माध्यमातून एका स्थिर नियमनात्मक संरचनेची म्हणजेच नियम व नियंत्रकांची व्यवस्था कार्यरत असते.

(iv) स्थिर वर्तन पद्धती आणि नियंत्रणात्मक संरचनेच्या माध्यमातून सामाजिक संस्था व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवत असतात तसेच व्यक्तींचे वर्तन सुकर करत असतात.

(v) व्यक्तींच्या प्राथमिक गरजा भागवण्यासाठी सामाजिक संस्था निर्माण होतात.

समाजशास्त्रात सामाजिक संस्थांचा विचार 'प्रकार्यवादी' व 'संघर्षवादी' अशा दोन प्रमुख दृष्टिकोनांनुसार केला जातो.

**प्रकार्यवादी दृष्टिकोन** मानवी सामाजिक जीवन सुकर करण्यामध्ये सामाजिक संस्था विविध प्रकारची भूमिका पार पाडत असतात. समाजाच्या विशिष्ट स्वरूपाच्या गरजा भागवत असतात. प्रकार्यवादी दृष्टिकोनानुसार सामाजिक संस्था म्हणजे दर्जा व भूमिकांचे गुंतागुंतीचे जाळे असते, तसेच समाजाच्या विविधांगी गरजा लक्षात घेऊन निर्माण झालेली मूल्ये, श्रद्धा आणि सामाजिक नियमानांची व्यवस्था असते. या दृष्टिकोनानुसार सामाजिक संस्था त्यांची स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी एकमेकांवर अवलंबून असतात. तसेच बदलत्या गरजांनुसार बदलती कार्ये करतात आणि/किंवा एकाच वेळी विविध स्वरूपाची कार्ये पार पाडतात.

**संघर्षवादी दृष्टिकोन** समाजात सर्व व्यक्ती एकसमान पातळीवर नसतात. संधी आणि सुविधांचे वितरण असमान स्वरूपाचे असते. ते बऱ्याचदा समाजातील प्रभावी गटांच्या सोईचे असते. या दृष्टिकोनानुसार सामाजिक संस्था नेहमीच सामाजिक विभाजन आणि असमानता टिकवून ठेवण्यात योगदान देत असतात. समाजातील वर्चस्ववादी समूहांचे हितसंबंध जोपासण्याचे काम करत असतात.

## ४.२ कुटुंब

कुटुंब हा मानवी समाजाचा अत्यंत महत्त्वाचा प्राथमिक घटक आहे. कुटुंबाला मानवी समाजाची आधारशीला मानले जाते. कुटुंब ही समाजातील सर्वांत सूक्ष्म (लहान) स्वरूपाची संस्था आहे. कुटुंबाशिवाय समाजाची कल्पना करणे कठीण आहे. व्यक्ती आणि संपूर्ण समाज अशा दोन्ही स्तरांवर कुटुंब महत्त्वाचे आहे. म्हणूनच सर्वसामान्यतः कुटुंब ही एक सार्वत्रिक तसेच मानवी समाजातील अविभाज्य सामाजिक संस्था मानली जाते. कुटुंबात राहणाऱ्या व्यक्तींसाठी एक सामाजिक रचना म्हणून कुटुंब विविध स्वरूपाची भूमिका पार पाडत असते. कुटुंबात आर्थिक गरजा भागवल्या जातात, मुलांना समाजाचा सदस्य म्हणून वाढवण्याची जबाबदारी पार पाडली जाते, भावनिक आधार दिला जातो. यादृष्टीने प्रेम, जिव्हाळा व प्रोत्साहन देणारी आदर्श रचना म्हणून कुटुंबाकडे पाहता येईल.

कधीकधी असेही दिसून येते की, कुटुंबातील सर्वच सदस्यांच्या गरजा तितक्याच प्रकर्षाने भागवल्या जात नाहीत. कुटुंबात वेदना व हिंसेचा अनुभवही येऊ शकतो. अलीकडील काळात विकसित झालेल्या दृष्टिकोनांनी कुटुंबाच्या सार्वत्रिकतेला व अपरिहार्यतेला आव्हान दिलेले दिसते. या नवीन संशोधनातून असे दिसून येते की, कुटुंबाची रचना समाजागणिक बदलते, या रचनेत वैविध्य आहे. तसेच आज कुटुंबाची परंपरागत कार्ये व स्वरूप प्रकर्षाने बदलत आहे.

### ४.२.१ व्याख्या

*(१) मॅक आयव्हर :* "लैंगिक संबंधावर आधारित मुलांचे संगोपन व पालनपोषण करणारा सुस्पष्ट व स्थिर स्वरूपाचा समूह म्हणजे कुटुंब होय."

***(२)बर्जेस व लॉक :*** "विवाह, रक्तसंबंध अथवा दत्तक विधानाच्या संबंधातून एकमेकांशी बांधल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे कुटुंब होय. कुटुंब म्हणजे एकाच घरात रहाणाऱ्या, आई-वडील, पती-पत्नी, मुलगा-मुलगी, भाऊ-बहीण अशा नात्यांनी एकमेकांबरोबर बांधल्या गेलेल्या व त्यातून एक समान संस्कृती निर्माण करणाऱ्या व्यक्तींचा समूह."

***(३)वेबस्टर डिक्शनरी :*** "रक्तसंबंध किंवा विवाह संबंधांतून एकमेकांशी जोडल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे कुटुंब होय."

थोडक्यात, कुटुंब म्हणजे रक्तसंबंध, विवाहसंबंध अथवा दत्तक प्रक्रियेसारख्या सामाजिक संबंधातून निर्माण झालेली व मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी वाहणारी प्रमुख सामाजिक संस्था होय.

**किबुत्झ पद्धती : कुटुंब ही खरंच सार्वत्रिक संस्था आहे?**

किबुत्झ पद्धती दुसऱ्या महायुद्धानंतर इस्त्राईलमध्ये निर्माण झालेली कुटुंब पद्धती आहे. कुटुंबाच्या सार्वत्रिक स्वरूपाला किबुत्झ पद्धती हा एक प्रकारे अपवादच आहे. सामूहिक जीवन, सामूहिक मालमत्ता व मुलांचे सामूहिक पालनपोषण अशा तत्त्वांवर ही पद्धती आधारित आहे. विभक्त कुटुंबाचे आर्थिक सहकार्य आणि एकत्र निवास ही ठळक वैशिष्ट्ये किबुत्झमध्ये आढळत नाहीत. जोडप्यांनी केलेल्या कामाचा मोबदला त्यांच्यापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण समूहाच्या उपयोगाचा असतो. तसेच जोडप्यांना जरी एकलैंगिक नातेसंबंध ठेवण्याची मुभा असली तरी मुलांचे संगोपन ही संपूर्ण समूहाची जबाबदारी असते. या प्रकारची सामूहिक जीवनपद्धती इस्त्राईली समाजाची ओळख जरी नसली तरी एक पर्यायी पद्धती म्हणून ओळखली जाण्याइतकी निश्चित प्रस्थापित आहे.

## ४.२.२ कुटुंबाची कार्ये

अभिजात प्रकार्यवादी दृष्टीकोनानुसार समाजासाठी काही अविभाज्य कार्ये पार पाडणारा समाजाचा घटक म्हणजे कुटुंब. कुटुंबाची ही मूलभूत कार्ये थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येतील:

**(१)सामाजीकरण :** कुटुंब हा सामाजिकीकरणाचा मूलभूत घटक आहे. टॅलकॉट पार्सन्स यांच्या मते, मुलांचे प्राथमिक सामाजिकीकरण करण्याची मूलभूत गरज कुटुंबातून भागवली जाते. समाजातील सामाजिक मूल्य आणि नियमनांप्रमाणे मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवणे या महत्त्वाच्या गोष्टीचा यात समावेश होतो. सामाजिकीकरणाच्या निरंतर प्रक्रियेत कुटुंबाची भूमिका फार महत्त्वाची आहे. मुलं जितकं आपल्या पालकांकडून शिकतात, तितकेच पालकंही आपल्या मुलांकडून व मुलांना वाढवण्याच्या प्रक्रियेतून शिकत असतात. (पाचव्या पाठात कुटुंबाच्या सामाजिकीकरणाचा मुख्य घटक म्हणून असलेली भूमिका विस्तृत दिलेली आहे.)

**(२)लैंगिक वर्तनाचे नियंत्रण :** मरडॉक यांच्या मते, कुटुंबाच्या माध्यमातून व्यक्तींना लैंगिक इच्छा आणि आकांक्षा व्यक्त करण्याचे तसेच लैंगिक समाधानाचे साधन मिळते. याचबरोबर, विवाहबाह्य लैंगिक संबंधांवर अंकुश लावून व त्यासंदर्भातील नियम तयार करून समाजात नियंत्रण व स्थिरता आणण्याची जबाबदारी कुटुंबातून पार पाडली जाते. प्रत्येक संस्कृतीत नातेसंबंधांची व्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीनेच लैंगिक वर्तनावर नियंत्रण ठेवले जाते. याच दृष्टीने अगदी जवळच्या नातलगांमधील लैंगिक संबंधांना मनाई असते. नियमांच्या या चौकटीत कोणते आप्त-नातेवाईक येतात हे संस्कृतीनुसार बदलू शकते. पण कुटुंब आणि

नातेसंबंधाच्या व्यवस्थेतून लैंगिक व प्रजननाच्या प्रक्रियेवर निश्चित स्वरूपाचे नियंत्रण असते.

**(३) भावनिक आधार :** कुटुंबात सदस्यांना शारीरिक संरक्षण, भौतिक मदत आणि भावनिक आधार दिला जातो. कुटुंबातील नाती खूप प्राथमिक व जवळच्या संबंधावर आधारित असल्यामुळे 'बाहेरच्या निष्ठुर जगात जगण्याचे बळ देणारा स्वर्ग' असे कुटुंबाचे वर्णन केले जाऊ शकते. कुटुंबात व्यक्तीला वात्सल्य, सहकार्य, स्वीकृती व आधार या गोष्टी मिळत असतात. पार्सन्सने म्हटल्याप्रमाणे यातून प्रौढ सदस्यांच्या व्यक्तिमत्त्वालाही स्थिरता प्राप्त होते. आधुनिक जगातील वाढत्या ताण-तणावांना यशस्वीरीत्या सामोरे जाण्याच्या दृष्टीने कुटुंबात मिळणारा भावनिक आधार महत्त्वाचा आहे.

**(४) आर्थिक स्थैर्य :** प्रत्यक्ष आर्थिक उत्पादनाचे काम आता कुटुंबातून फारसे होत नसल्यामुळे एक आर्थिक केंद्र म्हणून कुटुंबांचे महत्त्व थोडे कमी झाले आहे. जुन्या काळाप्रमाणे आधुनिक काळात कुटुंबाचे सदस्य उत्पादनाचे काम एकत्रितपणे करत नाहीत. पण तरीही कुटुंबात सदस्यांना एकप्रकारे आर्थिक स्थैर्य निश्चित मिळत असते. कारण कुटुंबात आर्थिक आणि भौतिक साधने पुरवली जातात, मालमत्ता निर्माण व जतन केली जाते.

**(५) सामाजिक ओळख :** कुटुंबामुळे सदस्यांना एक सामाजिक ओळख प्राप्त होते. वंश, वांशिकता, धर्म, जात आणि सामाजिक वर्गावर आधारित असणारा अर्पित दर्जा व्यक्तीला विशिष्ट कुटुंबात त्याच्या होणाऱ्या जन्मामुळे मिळतो. पालकांकडून मुलांना सामाजिक वारसा मिळत असतो. म्हणूनच व्यक्तीचे समाजातील स्थान निश्चित करण्यात कुटुंब महत्त्वाची भूमिका पार पाडत असते.

वरील सर्व कार्यांचा सर्वंकष विचार केला तर, कुटुंबाला समाजाचा कणा का मानले जाते ते लक्षात येईल.

### ४.२.३ कुटुंबाचे प्रकार

संरचनेच्या आधारे कुटुंबाचे दोन ढोबळ प्रकार पडतात.

**(अ) संयुक्त कुटुंब :** एकाच छताखाली वास्तव्य करणाऱ्या व सामाईक स्वयंपाकघर वापरणाऱ्या दोन किंवा दोनपेक्षा जास्त पिढ्यांच्या कुटूंबाला 'संयुक्त कुटुंब' असे म्हटले जाते. भारतातील ग्रामीण समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संयुक्त कुटुंबपद्धती होय. संयुक्त कुटुंबाला कधीकधी विस्तारित कुटुंब असेही म्हटले जाते.

**(ब) विभक्त कुटुंब :** पालक आणि मुले अशा फक्त दोन पिढ्यांचे कुटुंब म्हणजे विभक्त कुटुंब. विभक्त कुटुंबे बहुतांशी शहरी भागात दिसून येतात.



विभक्त व संयुक्त कुटुंब

कुटुंबांतर्गत अधिकाराच्या आधारे कुटुंबाचे मातृसत्ताक व पितृसत्ताक असे दोन ढोबळ प्रकार पडतात.

- **मातृसत्ताक कुटुंब**
- **पितृसत्ताक कुटुंब**

| अ.क्र. | मातृसत्ताक कुटुंब | पितृसत्ताक कुटुंब |
|---|---|---|
| १. | **मातृसत्ताक** कुटुंबात ज्येष्ठ स्त्री/आईकडे अधिकाराची सूत्रे असतात. तीच कुटुंब प्रमुख असते. | **पितृसत्ताक** पद्धतीत घरातील ज्येष्ठ पुरूषाला कुटुंब प्रमुख मानले जाते आणि अधिकारांची सूत्रे त्याच्याच हातात असतात. |
| २. | मातृसत्ताक कुटुंब **मातृवंशीय** पद्धतीचे असते. म्हणजे कौटुंबिक वारसा मातृकुलाकडून येतो. | पितृसत्ताक कुटुंब हे **पितृवंशीय** असते. म्हणजे वारसा हा प्रामुख्याने पित्याच्या वंशाकडून येतो. |
| ३. | विवाहानंतर वर हा वधुच्या घरी रहायला येत असल्यामुळे मातृसत्ताक पद्धतीत कुटुंब **मातृगृहीय** असते. | पितृसत्ताक कुटुंब **पितृगृहीय** असते, म्हणजेच विवाहानंतर नवपरिणित जोडपे वराच्या घरी रहायला जाते. |
| ४. | **आईकडचे आडनाव** धारण करण्याची पद्धत असते. | पितृसत्ताक पद्धतीत **वडिलांकडचेच आडनाव** पिढ्यान् – पिढ्या पुढे चालत रहाते. |
| ५. | उत्तर-पूर्व भारतातील गारो व खासी आदिवासी समूह तसेच दक्षिण भारतातील नायर समुदायात मातृसत्ताक कुटुंब पद्धती आहे. | भारतात तसेच जगातील बहुतेक भागात सर्वांत प्रचलित कुटुंब पद्धती पितृसत्ताक आहे. |

## ४.२.४ एकविसाव्या शतकातील कुटुंब

प्रत्येक मानवी समाजाची आधारशीला असलेल्या कुटुंबपद्धतीमध्ये आज खूप मोठे बदल होत आहेत. अनेक नवीन प्रकार निर्माण होत आहेत. पालकत्व, रोजगार आणि विश्रांती अशा विविध प्रकारच्या दैनंदिन क्रिया-प्रक्रियांचे केंद्र म्हणजे कुटुंब असते. समाजात जेव्हा व जसजसे परिवर्तन होते त्याप्रमाणे कुटुंबालाही नवीन संरचना व प्रक्रियांशी जुळवून घ्यावे लागते. आधुनिक समाजाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे घटस्फोटाचे वेगाने वाढत जाणारे प्रमाण होय. लग्न करण्याचे सर्वसाधारण वयदेखील वाढत आहे. तसेच अविवाहित रहाणाऱ्या व्यक्तींचे प्रमाणदेखील वाढत आहे. स्त्री शिक्षणाचा प्रसार व स्त्रियांचा रोजगारातील वाढता सहभाग यामुळे कुटुंबपद्धतीत बदल होत आहे. बालसंगोपनाच्या बदलत्या गरजा तसेच स्त्री-पुरुष दोघेही काम करत असल्यामुळे निर्माण झालेल्या नवीन गरजांना सामोरे जाण्याचे आव्हान कुटुंबांपुढे आहे. या सर्व बदलांचा परिणाम कुटुंब संस्थेवर निश्चित होत आहे. हे बदल ठळकपणे जरी पाश्चिमात्य देशांत दिसून येत असले आणि भारतासारख्या देशात अगदी प्रचलित होताना दिसत नसले तरी आज कुटुंब म्हणून जे नवीन नातेसंबंध उदयाला येत आहेत त्यांची चर्चा होणे आवश्यक आहे.

### एकल पालक कुटुंब :

बहुतांश एकल पालक असणाऱ्या कुटुंबांची प्रमुख आई/स्त्री असते. घटस्फोट, विभक्त होणे, मृत्यू किंवा अजाणतेपणी घेतलेल्या निर्णयामुळे एकच पालक असणारी कुटुंब निर्माण होतात. एकल पालक कुटुंबाची एक सर्वसमावेशक व्याख्या करणे अवघड आहे. कारण भौतिक परिस्थिती किंवा सामाजिक अडथळे यांसारख्या घटकांमध्ये बरेच वैविध्य दिसून येते. पण एकल कुटुंबांमध्ये वाढणाऱ्या मुलांसाठी एका पालकाचा अभाव हा कठीण अनुभव असतो व त्यांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते, असे काही संशोधनातून दिसते.

### एकत्रित रहाणे/सहवास :

सहवास याचा अर्थ एखाद्या जोडप्याने

विवाहाशिवाय एकत्रित एकाच घरात रहाणे. अशा एकत्रित रहाण्याची परिणती लग्नात होऊ शकते अथवा नाही. सध्याच्या युवा पिढीत, विशेषतः युरोपच्या अनेक भागांत व भारताच्याही काही शहरी भागांत लग्नाशिवाय एकत्रित रहाण्याला पसंती दिली जात आहे. समलैंगिक जोडप्यांच्या बाबतीत हे जास्त करून दिसून येते.

**सावत्र पालकत्व :**

मृत्यू, घटस्फोट, कुटुंबांचे विभक्तीकरण अशा अनेक कारणांमुळे सावत्र पालक असणारे कौटुंबिक नातेसंबंध निर्माण होत आहेत. पुनर्विवाह किंवा एकत्रित रहाण्यामुळे नवीन कुटूंब उदयाला येते. या कुटुंबात पूर्वीच्या संबंधातील मुले आणि नवीन संबंधांतील मुले अशा दोन्हींचा समावेश असू शकतो. घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या वाढत्या प्रमाणामुळे सावत्र पालकत्वाच्या नवीन कौटुंबिक रचनेचा प्रसार होत आहे. अशा कुटुंबात वाढणाऱ्या मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.



कुटुंब : समानतेच्या दिशेने

बदलत्या कौटुंबिक नातेसंबंध व रचनांची चर्चा करताना आपण लक्षात घेतले पाहिजे की, हे बदल प्रत्येक देश व समाजासाठी एकसारखे नाहीत. तितकेच महत्त्वाचे म्हणजे नवीन बदल जरी होत असले तरी पूर्वीच्या कौटुंबिक संस्थेचा व रचनेचा पूर्णपणे ऱ्हास झालेला आहे असे अजिबात नाही.

## ४.३ विवाह



विवाह

विवाह या सामाजिक संस्थेतून कुटुंबाचा पाया घातला जातो. विवाह म्हणजे समाजमान्य लैंगिक व पुनरुत्पादनाच्या संबंधांची रचना होय. विवाह ही एक सार्वत्रिक प्रथा मानली जाते.

### ४.३.१ व्याख्या

*(१) हॉर्टन आणि हंट :* "दोन किंवा अधिक व्यक्तींनी एकत्रित येऊन कुटुंब स्थापन करण्यासाठी समाजाने मान्यता दिलेली रचना म्हणजे विवाह होय."

*(२) रॉबर्ट लोवी :* "समाजमान्य जोडीदारांमध्ये बऱ्याच अंशी कायमस्वरूपी असणाऱ्या सामाजिक बंधाला विवाह असे म्हणता येईल".

*(३) वेबस्टर डिक्शनरी :* "विवाह म्हणजे व्यक्तिगत नाते निर्माण करण्यासाठी दोन व्यक्तींनी जोडीदार म्हणून एकत्र येण्याला मिळालेली कायदेशीर व सामाजिक मान्यतेची प्रणाली होय." (ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात व काही विशिष्ट कायदेशीर अखत्यारित फक्त एक स्त्री व एक पुरुष यांचे जोडीदार म्हणून एकत्र येणे.)

**विवाहाच्या विविध व्याख्यांमधून खालील सामाईक मुद्दे पुढे येतात :**

(i) लैंगिक गरजांची पूर्ती होण्यासाठी निर्माण झालेला

समाजमान्य संबंध म्हणून विवाहाकडे बघितले जाते.

(ii) विवाहाचा मुख्य सामाईक हेतू प्रजनन किंवा मुले जन्माला घालणे हा आहे.

(iii) जोडीदाराची समाजमान्यता यातून भिन्नलैंगिक संबंधांचे तत्व अधोरेखित होते. विवाहाचा प्रमुख हेतू जर प्रजनन मानला असेल तर स्त्री व पुरुषांमधील संबंधच इथे अपेक्षित आहे हे स्पष्ट होते. आज विवाहाची संकल्पना बरीच विस्तृत झाली आहे. समलिंगी संबंधाचाही त्यात अंतःर्भाव होत आहे. समलिंगी विवाह म्हणजे समलिंगी व्यक्तींकडे शारीरिक, भावनिक व लैंगिकदृष्ट्या आकर्षित होणाऱ्या दोन स्त्री किंवा दोन पुरुष म्हणजेच समलिंगी स्त्री अथवा पुरुषांचा विवाह.



### ४.३.२ विवाहाचे प्रकार

कुटुंबाप्रमाणेच जवळपास सर्व मानवी समाजात या ना त्या स्वरूपात विवाह ही संस्था दिसून येते. ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर असे दिसून येते की वेगवेगळ्या समाजांमध्ये विवाहाच्या भिन्न स्वरूपाच्या प्रथा व प्रणाली आहेत. विवाहाचे हे विविध प्रकार मुख्यतः जोडीदारांची संख्या तसेच कोण कोणाशी विवाह करू शकतो/शकत नाही. यासंबंधी असणाऱ्या नियमांच्या आधारे दिसून येतात.

**जोडीदारांच्या संख्येच्या आधारे विवाहाचे दोन प्रमुख प्रकार दिसतात.**

**(१)एक विवाह पद्धती :** एक विवाह पद्धती म्हणजे एका वेळी एकाच व्यक्तीशी/जोडीदाराशी होणारा विवाह. या प्रकारात पुरुषाला एका वेळी एकच पत्नी असू शकते किंवा स्त्रीला एकाच वेळी एकच पती असू शकतो. आपल्यातील बहुतांश जणांसाठी एक विवाह हा विवाहाचा सर्वांत परिचित असा प्रकार आहे. आपल्या भोवतालच्या समाजाकडे नजर टाकली की असे दिसून येते की एकविवाह ही सर्वांत मान्यता पावलेली व लोकप्रिय पद्धत आहे. एकदा विवाह केल्यानंतर व्यक्ती शेवटपर्यंत त्याच जोडीदाराबरोबर रहाते. कुटुंबाच्या बहुतांश समाजशास्त्रीय व्याख्यांमध्ये देखील एकविवाह संबंधात असणाऱ्या दोन प्रौढ व्यक्तींमधील कौटुंबिक संबंधच अधोरेखित केलेले दिसतात. अनेक समाजांत एकविवाह पद्धतीला संरक्षण देणारे कायदेही केलेले दिसतात.

**(२)बहुविवाह पद्धती :** यात एकाच वेळी एकापेक्षा जास्ती जोडीदारांबरोबर विवाह केला जातो. बहुविवाह पद्धतीत दोन वेगवेगळे प्रकार आढळतात.

(i) **बहुपती विवाह** : यात एकाच वेळी एका स्त्रीचा विवाह एकापेक्षा अधिक पुरुषांबरोबर होतो. ही पद्धत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढण्याचा एक मार्ग म्हणून सुरू झालेली असू शकते. अति दारिद्र्य व कंगालपणामुळे एका पुरुषाला पत्नी व मुलांचे पालनपोषण कठीण झाल्यामुळे एकापेक्षा अधिक पुरुषांकडे ती जबाबदारी जाते. अति दारिद्र्यात जगणाऱ्या समूहावर आपली लोकसंख्या मर्यादित ठेवायचा दबावही असतो. अशा परिस्थितीत बहुपती विवाह पद्धती सोईस्कर ठरू शकते.

(ii) **बहुपत्नी विवाह** : यात एक पुरुष एकावेळी

एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करतो. ही प्रथा म्हणजे बलवान पुरुषांसाठी पुनरुत्पादनाच्या साधनावर नियंत्रण ठेवण्याचे व समूहातील नातेसंबंधही स्वतःच्या फायद्यासाठी नियंत्रित ठेवण्याचेच एक साधन आहे.

काही समाजांत व्यक्तींना आपला जोडीदार स्वतः निवडण्याचे स्वातंत्र्य असते. लग्न कधी आणि कोणाबरोबर करायचे हे ठरवण्यात कुटुंब फारशी महत्त्वाची भूमिका बजावत नाही. दुसरीकडे काही समाजात विवाहासंबंधी काटेकोर नियम असतात. कोणी कोणाशी लग्न करायचे किंवा करायचे नाही यासंबंधीचे नियम कडक असतात. त्यामुळे व्यक्तीचे निवडीचे स्वातंत्र्य मर्यादित होते. जोडीदाराच्या निवडीच्या संदर्भातील निर्णय मुख्यत्वे पालक/नातेवाईक घेतात. कोणाचा विवाह कोणाशी होऊ शकतो/शकत नाही या संदर्भात असणाऱ्या नियमांच्या अनुषंगाने विवाहाचे दोन प्रकार दिसतात.

**(i) अंतर्गत विवाह :** यात स्वतःच्या विशिष्ट सांस्कृतिक समूहातील व्यक्तींशी केला जाणारा विवाहच संमत असतो. (उदा., जात, पंथ, आदिवासी जमाती)

**(ii) बहिर्गत विवाह :** यात स्वतःच्या समूहाच्या बाहेरील व्यक्तीशी विवाहाला पसंती असते. उदा. गोत्राबाहेरील विवाह.

**अनुलोम व प्रतिलोम विवाह :** विवाह हा सामान्यतः समान दर्जा असणाऱ्या दोन व्यक्तींचा होतो. वर आणि वधूच्या सामाजिक दर्जावरून अनुलोम आणि प्रतिलोम असे विवाहाचे दोन प्रकार सांगता येतील. म्हणजेच त्या दोघांचा सामाजिक स्तर काय आहे आणि विवाहामुळे तो उंचावणार अथवा खालावणार आहे यावरून विवाहाचे हे दोन प्रकार ठरतात.

अनुलोम विवाह प्रकारात वरच्या जातीतील पुरुषाचा विवाह खालच्या जातीतील स्त्रीबरोबर होतो. या विवाहामुळे त्या स्त्रीचा सामाजिक दर्जा उंचावतो. याविरुद्ध, जेव्हा निम्न स्तरातील पुरुष उच्च स्तरातील स्त्रीबरोबर विवाह करतो तेव्हा हा प्रतिलोम विवाह मानला जातो. या विवाहामुळे कनिष्ठ स्तरातील पुरुषाला वरिष्ठ सामाजिक स्तरामध्ये प्रवेश मिळतो.

**उपक्रम – १**

प्रतिलोम विवाहाला समाजातून मोठ्या प्रमाणात विरोध का होतो याची वृत्तपत्र, बातम्या, चित्रपट इत्यादींच्या साहाय्याने चर्चा करा.

१९८० च्या दशकापासून समलिंगी तसेच लिंग परिवर्तन करून घेतलेल्या व्यक्तींमधील संबंधांची व त्यांच्यातील विवाहाची बरीच चर्चा होत आहे. 'रक्तसंबंधांवर आधारित' कुटुंबाच्या पारंपरिक चौकटीपेक्षा हा 'जाणीवपूर्वक निवड करून निर्माण केलेला' कुटुंब संबंधाचा प्रकार आहे. १९८९ मध्ये समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता देणारा डेन्मार्क हा जगातील पहिला देश ठरला. औपचारिक, कायदेशीर मान्यता म्हणजे समलिंगी जोडप्यांना सामाजिक मान्यता देण्याचा प्रयत्न तसेच आरोग्य सेवा, वारसा हक्क, मालमत्तेचे अधिकार अशा क्षेत्रांत असे संबंध लक्षात घेऊन या लोकांना सेवा पुरवल्या जाव्यात या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत.

**उपक्रम – २**

वर्गात छोटे गट पाडून वृत्तपत्रे, मासिके व इंटरनेटवरील विवाहविषयक जाहिराती बघा. तुम्हांला काय वाटले त्याची एकमेकांबरोबर चर्चा करा. भारतात आजही अंतर्गत विवाहपद्धती लागू पडते असे तुम्हांला वाटते का?

## कुटुंब, नातेसंबंध आणि विवाह

कुटुंब म्हणजे प्रत्यक्ष नातेसंबंधांनी जोडल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह होय. व्यक्तींमधील हे

नातेसंबंध विवाहातून किंवा मग रक्तसंबंधाच्या सूत्रामधून जोडले जात असतात. विवाह म्हणजे केवळ दोन प्रौढ व्यक्तींमधील समाजमान्य लैंगिक संबंध एवढाच मर्यादित नसून त्यातून अनेक व्यक्ती एकमेकांशी जोडल्या जातात.

ज्या कुटुंबात व्यक्तीचा जन्म होतो ते त्याचे प्राथमिक कुटुंब असते. तर ज्या कुटुंबात विवाह होतो ते सातत्याचे कुटुंब असते. रक्तसंबंधाने बांधलेले नातेवाईक रक्तसंबंधी म्हणून तर विवाहातून जुळलेले आप्त सगेसोयरे म्हणून ओळखले जातात. आजच्या झपाट्याने बदलत्या युगात देखील, व्यक्तींमध्ये प्राथमिक स्वरूपाचे बंध निर्माण करणाऱ्या व टिकवणाऱ्या संस्था म्हणून कुटुंब, आप्तसंबंध व विवाह संस्थेकडे बघितले जाते.

**हे तुम्हांला माहीत हवे**

भारतीय दंडविधानाच्या कलम ३७७ नुसार समलैंगिक संबंध हा गुन्हा ठरवला होता. १८६१ मध्ये ब्रिटिशांनी हे कलम लागू केले. या कलमानुसार समलैंगिकता हा 'अस्वाभाविक गुन्हा' मानण्यात आला व त्यासाठी जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली. मात्र, ६ सप्टेंबर २०१८ च्या निर्णयात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ३७७ कलमातील शिक्षेची तरतूद रद्द केली. प्रौढ व्यक्तींमधील खाजगीत संमतीने होणाऱ्या समलिंगी संबंधांना न्यायालयाने मान्यता दिली आहे. या प्रकारची लैंगिक इच्छादेखील नैसर्गिक असू शकते आणि व्यक्तींचे त्यावर काही नियंत्रण नसते, त्यामुळे या वर्तनाला गुन्हा मानता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

(टाईम्स ऑफ इंडिया, ४ ऑक्टोबर २०१८)

## ४.४ अर्थव्यवस्था आणि काम

वस्तू आणि सेवांचे उत्पादन, वितरण आणि ग्रहण करण्याच्या प्रमुख सामाजिक व्यवस्थेला 'अर्थव्यवस्था' असे म्हटले जाते. प्रत्येक समाजाला स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी काही भौतिक गरजांची पूर्ती करणे आवश्यक असते. समाजातील सर्व सदस्यांच्या मूलभूत गरजा नीट भागवल्या जाणे गरजेचे असते. आजच्या समाजातील बहुतेक प्रौढ व्यक्तींचा वेळ उदरनिर्वाहाची सोय करण्यातच जातो. त्यामुळे उत्पादन व्यवस्थेबरोबरच एक सक्षम वितरण व्यवस्था खूप आवश्यक आहे. तसेच, समाजातील आर्थिक व्यवस्थेवर अंकुश ठेवणारी एक नियमनात्मक व्यवस्थादेखील महत्त्वाची आहे.

समाजव्यवस्थेतील कुटुंब, धर्म आणि राजकीय व्यवस्थेशी अर्थव्यवस्था जोडलेली असते. आजच्या काळात तर आंतरराष्ट्रीय पातळीवर अर्थव्यवस्था एकमेकींशी तसेच इतर सामाजिक व्यवस्थांशी पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात जोडलेल्या आहेत.

### ४.४.१ बदलत्या अर्थव्यवस्था

बदलत्या भौतिक गरजांनुसार मानवी समाजाने नवनवीन बदल अंगीकारले आणि याच बदलत्या अवस्थांमधून मानवी समाज विकसित होत गेला आहे. बदलते तंत्रज्ञान, संसाधनांचे संघटन, भौतिक वस्तूंच्या बदलत्या गरजा व त्यानुसार बदलते उत्पादन वितरण या सर्व घटकांचा मानवी विकासात महत्त्वाचा सहभाग आहे. आधुनिक जगाचे सर्वांत लक्षवेधक वैशिष्ट्य म्हणजे तंत्रज्ञानाचा अतिशय वाढत्या प्रमाणावर होणारा वापर आणि त्याचबरोबर भांडवलवादी अर्थव्यवस्थेचा झालेला प्रसार होय.

काम आणि अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप जाणून घेताना या संक्रमणातील तीन प्रमुख अवस्था लक्षात येतातः

**(१) कृषक क्रांती :**

शिकार करून आणि अन्न गोळा करून

जगणाऱ्या समूहापासून आणि मग पशुपालन अवस्थेनंतर शेतीच्या शोधामुळे मानवी समाजाने एका नवीन प्रगत अवस्थेत प्रवेश केला. कृषिप्रधान अवस्थेत प्राण्यांचा वापर करून नांगरणीसारख्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणावर जमिनीचा वापर शेतीसाठी करून घेणे शक्य झाले. त्यामुळे समाजाची उत्पादकता वाढली. शेती जसजशी प्रगत झाली तसतसे अन्नधान्याचे उत्पादन वाढले, तसेच हस्तव्यवसाय, पशुपालन, अवजारांची निर्मिती अशी विशेषीकरणावर आधारित नवीन क्षेत्रेही विकसित झाली. शेतीला लागणारे तंत्रज्ञान, श्रमविभाजन, कायमस्वरूपी वसतिस्थाने आणि प्रगत व्यापार यांतून अर्थव्यवस्था विस्तारली.

### (२) औद्योगिक क्रांती :

साधारण अठराव्या शतकाच्या मध्यावर प्रथम इंग्लंडमध्ये व नंतर युरोप व अमेरिकेत औद्योगिक क्रांती झाली. या क्रांतीमुळे सामाजिक व आर्थिक जीवन आमूलाग्र बदलले. औद्योगिकीकरणामुळे चार ठळक आर्थिक बदल घडून आले.

(i) **उर्जेचे नवीन प्रकार** : १७६५ मध्ये जेम्स वॅट यांनी वाफेच्या इंजिनाचा महत्त्वाचा शोध लावला. या शोधामुळे प्राणी व माणसांच्या शारीरिक शक्तीचा उत्पादनातील सहभाग लक्षणीयरीत्या घटला. जैविक शक्तीपेक्षा १०० पटीने अधिक शक्तिशाली असणाऱ्या या नवीन उर्जेमुळे मोठमोठाली यंत्रसामग्री सहज व जास्त कार्यक्षमरीत्या काम करू लागली.

(ii) **कारखान्यांमध्ये कामाचे केंद्रीकरण** : यंत्रसामग्रीच्या वापरामुळे कारखान्यांची निर्मिती झाली व उत्पादनाचे काम एका छताखाली होऊ लागले. उत्पादनाचे क्षेत्र घरापासून वेगळे झाले. कामाचे ठिकाण नावाचे एक नवीन औपचारिक क्षेत्र निर्माण झाले. लोक आता कामासाठी घराबाहेर पडू लागले. उत्पादनाचे एक नवीन औपचारिक, सार्वजनिक, आर्थिक क्षेत्र ठळकपणे विकसित झाले.

(iii) **मोठ्या प्रमाणावर उत्पादन** : औद्योगिक अर्थव्यवसस्थेत उत्पादनाचे क्षेत्र खूप मोठ्या प्रमाणावर विस्तारले. कच्च्या मालापासून विविध प्रकारच्या तयार वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या या क्षेत्रात अधिकाधिक रोजगार निर्माण होऊ लागला. उदा., कारखान्यांमध्ये घाऊक प्रमाणावर लाकडापासून फर्निचर आणि लोकरीपासून कापड बनवले जाऊ लागले.

(iv) **श्रमविभाजन** : औद्योगिकीकरणापूर्वी एक कारागीर सुरुवातीपासून शेवटपर्यंत एखादी वस्तू एकटा बनवत असे. कारखाना पद्धतीमुळे मानवी कौशल्यांचे महत्त्व कमी झाले. यंत्रांनी फक्त मानवी कौशल्यांची जागा घेतली इतकेच नव्हे तर या पद्धतीत फक्त विशेष कौशल्यांवर आधारित श्रम विभाजनही विकसित झाले. त्यामुळे कारखान्यात काम करणारा कामगार एकाच प्रकारचे काम पुन्हा पुन्हा करतो. त्यामुळे एकीकडे कारखान्यांमुळे एकंदर उत्पादन जरी वाढले आणि कामगारांची उत्पादकता जरी वाढली तरी दुसरीकडे कामगारांच्या कौशल्यांच्या पातळीत निश्चित घसरण झाली.

औद्योगिकीकरणामुळे झालेले बदल फक्त उत्पादन पद्धतीपुरते सीमित नव्हते. हळूहळू संपूर्ण समाजात व्यापक संक्रमण झाले. अगणित नवनवीन वस्तू आणि सेवांमुळे जीवनमानाचा स्तर हळूहळू उंचावत गेला. पण दुसरीकडे औद्योगिक व्यवस्था मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणुकीवर आधारित असल्यामुळे समाजातील आर्थिक दरीही रुंदावत गेली. औद्योगिक तंत्रज्ञान व

उत्पादनाचे फायदे सर्वांपर्यंत समान पद्धतीने पोचले नाहीत. एकीकडे काही कारखानदारांकडे अफाट संपत्ती गोळा होत असताना बहुसंख्य सर्वसामान्य श्रमिक मात्र दारिद्र्याच्या खाईत ढकलले जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून श्रमशक्ती संघटित होऊ लागली. पाश्चिमात्य देशांतील सरकारांनी कामगार हिताचे कायदे करावेत यासाठीचा दबाव वाढला. बालकामगार प्रथा बंद करणे, मजुरीचा दर वाढवणे, कामाची परिस्थिती सुधारणे, आरोग्यसेवा, शिक्षण अशा संधी पुरवणे व राजकीय हक्क ओळखणे असे बदल शासनाला करावे लागले.

### (३) माहितीवर आधारित क्रांती :

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत उत्पादनाचे स्वरूप पुन्हा बदलायला सुरुवात झाली होती. स्वयंचलित यंत्रांच्या वापरामुळे उत्पादनातील मानवी श्रमाचे महत्त्व कमी व्हायला लागले होते. जनसंपर्क कार्य, बँका, प्रसारमाध्यमे, विक्री जाहिरात क्षेत्र अशा सेवांवर आधारित क्षेत्रांमध्ये कामगार व व्यावसायिकांचा सहभाग वाढला. या समग्र परिवर्तनाला अधिक चालना देणारा घटक म्हणजे तंत्रज्ञानावर आधारित ही तिसरी क्रांती होय. संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे युरोप, अमेरिका व आशिया खंडांतील बऱ्याचशा औद्योगिक देशात कामाचे स्वरूप आमूलाग्र बदलले. त्यात तीन प्रकारचे बदल दिसून आले.

**(अ) प्रत्यक्ष वस्तूंकडून कल्पनांच्या निर्मितीकडे :** माहिती युगाच्या अवतरणापूर्वी विविध प्रकारच्या वस्तू व साहित्याच्या उत्पादनावर अर्थव्यवस्था आधारित होती. आज सेवा क्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध सेवांची निर्मिती तसेच नवनवीन कल्पना व प्रतिकांच्या निर्मितीचे क्षेत्र वेगाने वाढत आहे. संगणक तज्ज्ञ, लेखक, वित्तीय सल्लागार, वास्तुविशारद, जाहिरात तज्ज्ञ अशा असंख्य व्यावसायिकांबरोबरच दुकानदार व दुकानात काम करणारे मदतनीस, सफाई सेवा पुरवणारे, सुरक्षा सेवा पुरवणारे अशा विविध सेवा देणाऱ्या लोकांना आजच्या माहिती युगातील अर्थव्यवस्थेत महत्त्व आले आहे.

**(ब) यांत्रिक कौशल्यांकडून साक्षरता कौशल्यांकडे** : माहितीवर आधारित क्रांतीमुळे संपर्क क्षमता, लेखन, सादरीकरण, संगणकाचा वापर अशा साक्षरतेवर आधारित कौशल्यांना वाढती मागणी आली आहे. ज्यांच्याकडे या नवीन प्रकारच्या क्षमता आहेत अशा व्यक्तींना आज नवनवीन संधी उपलब्ध आहेत.

**(क) कुठेही बसून काम करण्याची शक्यता :** औद्योगिकीकरणाच्या काळात उत्पादनाचे काम कारखान्यांमध्ये एका छताखाली संघटित झाले. आज संगणक तंत्रज्ञानामुळे कामाचे विकेंद्रीकरण शक्य होत आहे. लॅपटॉप, मोबाइल आणि प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे आज घरी बसून काम करता येणे शक्य झाले आहे व कुठल्याही जागेचे रूपांतर 'कल्पित ऑफिस' मध्ये सहज होऊ शकते.

> **उपक्रम – ३**
>
> चार्ली चॅप्लिनचा 'मॉडर्न टाईम्स' हा सिनेमा बघा. मानवी श्रमावर यांत्रिकीकरणाच्या होणाऱ्या परिणामांची चर्चा करा.

## ४.४.२ कामाचे बदलते स्वरूप

प्रगत औद्योगिकीकरणामुळे आज कृषी क्षेत्रात असलेल्या लोकांचे प्रमाण खूप कमी होत आहे. उच्च विकसित देशात शेतीचे काम तंत्रज्ञान व यंत्राच्या साहाय्याने होते. भारतासारख्या देशात अजूनही शेतीवर अवलंबून असणाऱ्या व ग्रामीण

स्वरूपाच्या व्यवसायात असणाऱ्या लोकांची संख्या बरीच मोठी आहे. अर्थात, भारतात सेवा क्षेत्रही झपाट्याने विस्तारत आहे.

प्रचंड वाढते आर्थिक परस्परावलंबित्व हे आधुनिक समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आज भांडवल, श्रम, कच्चा माल आणि तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीतूनच जागतिक अर्थव्यवस्था कार्यरत आहे. आपण सगळेच आपल्याला लागणाऱ्या वस्तू आणि सेवांसाठी जगभरात पसरलेल्या असंख्य कामगारांवर अवलंबून आहोत. औद्योगिक व्यवस्थेत एक जागतिक उत्पादनाची साखळी निर्माण होत आहे. उदा., एका देशात कच्च्या मालावर प्रक्रिया होते. कारण त्या देशात कच्चा माल स्वस्तात उपलब्ध आहे. पण प्रत्यक्ष वस्तूंचे उत्पादन मात्र ज्या देशात श्रमाचे मूल्य कमी आहे अशा देशात होते. प्रत्यक्ष त्या वस्तूचा खप एखाद्या तिसऱ्याच देशात केला जाणे हेदेखील शक्य आहे. कोकाकोला, कोलगेट, पामोलिव्ह, जनरल मोटर्स आणि अशाच अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या जगभर पसरलेल्या अर्थव्यवस्थेचा गाडा चालवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

**हे तुम्हांला माहीत आहे का?**

**बार्बी खरंच कुठली आहे?**

उत्पादनाच्या जागतिक साखळीचे उत्तम उदाहरण म्हणजे जगप्रसिद्ध बाहुली बार्बी. जपानमध्ये आर्थिक मंदीच्या काळात १९५९ मध्ये पहिली बार्बी बनवली गेली. जपान जसा विकसित झाला व तिथल्या मजुरीचे दर जसे उंचावत गेले तशी बार्बी आशियातील इतर देशांत बनू लागली.

बार्बीचे आयुष्य सौदी अरेबियात सुरू होते. जिथे तिच्या प्लॅस्टिकच्या शरीरासाठी आवश्यक असणारे इथिलिन बनते. तैवानमधील फॉर्मोसा प्लॅस्टिक या कंपनीत इथिलिनपासून तिचा प्लॅस्टिक पी.व्ही.सी.चा ढाचा बनतो. हे पुढे चीन, मलेशिया व इंडोनेशियातील कारखान्यांकडे पाठवले जातात. जिथे बार्बीचे शरीर आकाराला येते.

बार्बीचे नायलॉनचे केस जपानमध्ये बनतात, तर तिचे कपडे चीनमध्ये तयार होतात. मग ही बार्बी खरोखर कुठली म्हणायची?

बार्बीचे डिझाईन अमेरिकेत केले जाते, तिथेच विक्री आणि खपाची धोरणे बनतात आणि तिथेच सर्वाधिक नफाही मिळतो. पण बार्बीशी संबंधित फक्त थोड्याच गोष्टी अमेरिकेत बनतात ती म्हणजे बार्बीला नीट ठेवायला वापरली जाणारी खोकी व तिला सुशोभित करायला लागणारे काही रंग व तेल.

Source : Anthony Giddens : Sociology, Polity, 2008

उत्पादन केंद्रीय 'असेंब्ली लाइन' पद्धतीने होत होते. कामगार एका जागेवर फिरत्या यांत्रिक पट्ट्यासमोर उभे राहून काम करत आणि त्यांच्या कामावर काटेकोर देखरेख व नियंत्रण असे. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत काम पूर्णपणे विकेंद्रित झाले आहे. कंपन्या आणि देशांमधील वाढत्या स्पर्धेमुळे उत्पादनात लवचीकता असणे ही काळाची गरज बनली आहे. याचा अर्थ असा की, उत्पादनातील विविध प्रकारची कामे जगाच्या वेगवेगळ्या देशांमधून करून घेणारी

## ४.५ शिक्षण

व्यक्तींमधील क्षमतांचा विकास व या क्षमता प्रत्यक्ष कार्यान्वित करणे म्हणजे शिक्षण असा या संज्ञेचा शाब्दिक अर्थ आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत केवळ जगण्यासाठी नव्हे तर जास्त अर्थपूर्ण आयुष्य जगण्यासाठी ज्ञान व कौशल्यांची प्राप्ती करणे अपेक्षित आहे. ठळकपणे बघायचे तर औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने आयुष्यभर चालणारी

शिकण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण. यादृष्टीने पाहता अप्रगत समाजात शिक्षण हा सामाजीकरणाचा व संस्कृती-हस्तांतरणाच्या व्यापक प्रक्रियेचाच एक भाग होता. मूलभूत सांस्कृतिक हस्तांतरणाचे व प्रसाराचे - योग्य वर्तन पद्धती, मूल्य आणि नियमने, भाषा तसेच मूलभूत उपयुक्त कौशल्ये पुढच्या पिढीपर्यंत पोचवण्याचे काम कुटुंब व निकटच्या समूहांतूनच होत होते. औद्योगिकीपूर्व समाजात घर हेच उत्पादनाचे केंद्र होते आणि लोकांची दिनचर्या घर आणि परिसराशीच बांधलेली असल्यामुळे शिक्षणासाठी वेगळी अशी व्यवस्था असावी अशी निकड नव्हती.

पण जसजसे औद्योगीकरण झाले आणि वाढले तसतसे साक्षर आणि सुशिक्षित व्यक्तींसाठीची मागणी वाढली. यातून शिक्षण व्यवस्थेची गरज निर्माण झाली. आधुनिक समाजात गुंतागुंतीची श्रम विभाजन व्यवस्था आहे, काम आणि घर अशी वेगवेगळी क्षेत्रे आहेत त्यामुळेच काही विशिष्ट कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे झाले आहे. अशा बदलत्या व्यवस्थेत एका औपचारिक व सुस्पष्ट शिक्षण व्यवस्थेची गरज आहे.

आधुनिक समाजात खालील मूलभूत उद्‌दिष्टांच्या पूर्तीसाठी विशेष शिक्षण व्यवस्था कार्यरत आहे.

- ज्ञान आणि कल्पनांची निर्मिती आणि प्रसार करणे.
- समाजाच्या कल्याणासाठी उपलब्ध ज्ञानाचा वापर करून कौशल्यांचा विकास करणे.

शिक्षण ही म्हणूनच एक व्यापक, बहुआयामी प्रक्रिया आहे. यात व्यक्तीच्या मनोज्ञ ग्रहणाच्या कक्षा रुंदावण्याबरोबरच उपलब्ध ज्ञानाचा वापर करणे तसेच चिकित्सा करून या ज्ञानात नवीन भर टाकण्याच्या क्षमतेचा विकास होणे याचाही अंतर्भाव आहे.

### ४.५.१ शिक्षणाचे प्रकार

**(१)औपचारिक शिक्षण :** काही विशिष्ट उद्‌दिष्टांच्या पूर्तीसाठी औपचारिक शिक्षण नियोजन केले जाते. म्हणूनच यात प्रत्यक्ष पाठ आणि शिक्षणाचा अंतर्भाव होतो. विशिष्ट उद्‌दिष्ट समोर असल्यामुळे औपचारिक शिक्षणाला विशिष्ट कालमर्यादा असते. एक सुस्पष्ट व काटेकोरपणे तयार केलेला अभ्यासक्रम असतो. हा अभ्यासक्रम बनवताना समाजाच्या गरजांचा विचार केलेला असतो.

**(२)सहज शिक्षण :** सहज शिक्षणाच्या प्रक्रियेत कुठल्याही संघटित व्यवस्थेशिवाय व्यक्तींचे शिक्षण होते. मूल्यसंवर्धन, क्षमता विकास, सकारात्मक दृष्टिकोनाची निर्मिती आणि ज्ञानवृद्धीचे कार्य अतिशय सहज व नैसर्गिकरित्या पार पाडले जाते. सहज शिक्षणात, पालक आणि ज्येष्ठांकडून तरुण पिढीला परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाचा समावेश होतो. सहज शिक्षणासाठी ठरावीक अभ्यासक्रम किंवा वेळापत्रक किंवा मुद्दाम नेमून दिलेली यंत्रणा नसते. यादृष्टीने सहज शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. रोजच्या जीवनात काम/व्यवसाय, प्रवास, प्रसारमाध्यमे अशा विविध क्षेत्रांतून आपण सतत नवीन अनुभव घेत असतो व शिकत असतो.

**(३)अनौपचारिक शिक्षण :** अनौपचारिक शिक्षण औपचारिक व्यवस्थेच्या कक्षेत येत नाही. तरीही ते अगदी पूर्णपणे सहज आणि असंरचित नसते. औपचारिक शिक्षण व्यवस्थेच्या चाकोरीबाहेरचे सर्व प्रकारचे शैक्षणिक उपक्रम अनौपचारिक शिक्षणात मोडतात. एका छोट्या, एकजिनसी स्वरूपाच्या गटाच्या विशिष्ट शैक्षणिक गरजांना समोर ठेवूनच अनौपचारिक शिक्षण राबवले जाते.

मुद्दाम जाणीवपूर्वक निर्मिती केल्यामुळे व राबवले गेल्यामुळे अभ्यासक्रम आणि मूल्यमापनाच्या बाबतीत अनौपचारिक शिक्षणाच्या आराखड्यात लवचीकता असावी लागते.

### ४.५.२ शिक्षणाचे महत्त्व

समाजशास्त्रज्ञांसाठी शिक्षण हा एक महत्त्वाचा विषय का आहे? एमील डरखाईम व टॅलकॉट पार्सन्स यांसारख्या समाजशास्त्रातील प्रमुख विचारवंतांनी व्यक्ती आणि समाज या दोहोंसाठी असणाऱ्या शिक्षणाच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भर दिला आहे.

शिक्षण व्यवस्थेची काही कार्ये खालीलप्रमाणे निर्देशित करता येतील :

(i) वैविध्यपूर्ण कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमीतून आलेल्या मुलांना शालेय शिक्षणातून समाजातील समान वैचारिक नीतिमूल्यांची ओळख होते. यातूनच खूप वेगवेगळ्या असणाऱ्या व्यक्तींना एकत्र बांधण्याचे काम होत असते.

(ii) शिक्षणातून मुलांना स्वयंशिस्तीचे धडे मिळतात. समाज सुरळितपणे चालण्यासाठी आवश्यक असणारे सामाजिक नियम मुले शिकतात व अंगी बाणवतात.

(iii) अत्यंत गुंतागुंतीच्या असणाऱ्या आधुनिक अर्थव्यवस्थेला लागणारी कौशल्ये शिक्षण व्यवस्थेमार्फत शिकवली जातात. उदा., तांत्रिक/व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी तांत्रिक प्रशिक्षण संस्थांची निर्मिती केली जाते. आजच्या काळात रोजगारासाठी विशिष्ट ज्ञान व कौशल्यांची पातळी असणे आवश्यक आहे. त्यामुळे एक मूलभूत बुद्धि बैठक तयार करण्याबरोबरच या गरजेचीही पूर्ती उच्च शिक्षण व्यवस्थेला करावी लागते. उच्च शिक्षणातून ठरावीक दर्जाचे ज्ञान व कौशल्ये विद्यार्थ्यांना दिली जातात.

(iv) मुलांमध्ये यशसिद्धीचे मूल्य जोपासण्याचे कामही शाळा करत असतात. शाळेत काही मूलभूत सार्वत्रिक मूल्यमापनाच्या कसोटीवर मुलांचे मूल्यमापन केले जाते. शाळांच्या औपचारिक नियमांच्या मापदंडानुसार मुलांच्या वर्तनाचेही मूल्यमापन होते. परीक्षेतील त्यांच्या कामगिरीवर त्यांच्या यशाचे मोजमाप केले जाते. बाहेरील समाजाप्रमाणेच शाळांमध्येही बौद्धिक क्षमतेवर आधारित व्यवस्था असते. म्हणजे ज्यांच्यात जितक्या क्षमता आणि कौशल्ये आहेत त्याप्रमाणेच त्यांना पारितोषिक/उचित प्रतिफळ मिळते.

### ४.५.३ शिक्षण आणि सामाजिक विभाजन

ज्या समाजशास्त्रज्ञांनी समाजाकडे विभाजित व विषम स्वरूपात बघितले आहे, त्यांच्यासाठी शिक्षण व्यवस्था, सर्व पातळ्यांवर सामाजिक विषमता टिकवून ठेवण्याचेच साधन आहे. बॉवेल्स व जिंटीस (२००२) यांच्या मते, बाहेरच्या आर्थिक जगात जी विषमता आहे तिला पूरक अशीच शाळांमधील व्यवस्था असते. बोर्द्यू (१९८६) ने शिक्षण व अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे. उच्च वर्गाचे आर्थिक वर्चस्व टिकवण्यात महत्त्वाचे योगदान देण्याबद्दल त्यांनी शिक्षण व्यवस्थेवर टीका केली आहे. या विचारवंतांच्या मते, शाळांमधील व्यवस्थाच अशी असते की, निम्न स्वरूपाच्या रोजगारात/व्यवसायात जाऊ शकतील असे मानले गेलेल्या मुलांकडून काही विशिष्ट वर्तन अपेक्षित असते. त्यांनी नियमांचे व शिस्तीचे काटेकोर पालन करावे असे अपेक्षित असते. त्यांना तुलनेने सोप्या सरावावर आधारित गोष्टी करायला दिल्या जातात. दुसरीकडे जी मुले उच्च स्तर वा श्रेणीतील व्यवसायांमध्ये जातील असे गृहीत धरलेले असते अशा मुलांमध्ये स्वतंत्र विचार व काम करण्याची क्षमता निर्माण होईल याची काळजी घेतली जाते. मुलांची सामाजिक

पार्श्वभूमी लक्षात घेऊन एक सर्वसाधारण अभ्यासक्रम तयार करण्याचा कल असतो. आपल्या सामाजिक-आर्थिक कुवतीनुसार आपण शाळेची निवड करत असतो आणि म्हणूनच आपल्याला वेगवेगळ्या प्रकारच्या संधी व विशेष अधिकार प्राप्त होत असतात.

अनेक अभ्यासांतून असेही दिसून आले आहे की, शिक्षण व्यवस्थेतून लिंगभावात्मक विषमताही टिकवून ठेवली जाते. गेल्या काही दशकांत शिक्षणातील 'लिंग भावात्मक दरी' कमी होत असली तरी लिंगभेद समान शैक्षणिक संधी पुरवण्यातील मोठा अडथळा आहे. मुलींपेक्षा मुलांच्या शिक्षणाला दिले जाणारे प्राधान्य किंवा मुलींमध्ये असणारे शालेय गळतीचे उच्च प्रमाण किंवा मुलींसाठी काही विशिष्ट 'सोपे' विषय निवडीसाठी ठेवणे या सर्वांतून आजही शिक्षणातील लिंगाधारित विषमता स्पष्ट होते.

**उपक्रम – ४**

शाळेत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये लिंगाधारित भेद दिसतो का ते शोधा व चर्चा करा. उदा., मुलींना रांगोळी काढण्याचे किंवा पाहुण्यांचे स्वागत करण्याचे काम दिले जाते, तर मुलांना फर्निचर हलवण्याचे किंवा बैठक व्यवस्थेत मदत करण्याचे काम दिले जाते.

**परिक्षण करा**

'मेरिटोक्रसी मिथ' (२००४) या पुस्तकात स्टीफन मॅकनमी यांनी आपल्याला समाज खूप न्याय्य पद्धतीने चालतो या भ्रमाविषयी सावध केले आहे. समाजात प्रत्येकाला आपल्या गुणवत्तेनुसार व पात्रतेनुसार मिळते असा एक दावा केला जातो. पण त्यांच्या मते, वारसा हक्क, सामाजिक व सांस्कृतिक भांडवल तसेच सामाजिक विषमता असे अनेक घटक व्यक्तिगत गुणवत्तेला मारक ठरतात. पात्रता असूनही व्यक्तीला त्याप्रमाणे स्थान मिळेलच असे नाही.

**खालील तक्त्याकडे पहा!**

**साक्षरतेचे प्रमाण (टक्केवारी)**

| जनगणना वर्ष | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३ | २७.२ | ०८.९ |
| १९६१ | २८.३ | ४०.४ | १५.४ |
| १९७१ | ३४.५ | ४६.० | २२.० |
| १९८१ | ४३.६ | ५६.४ | २९.८ |
| १९९१ | ५२.२ | ६४.१ | ३९.३ |
| २००१ | ६४.८ | ७५.३ | ५३.७ |
| २०११ | ७३.० | ८०.९ | ६४.६ |

**१९५१-१९७१: ५ आणि वरील वयोगट**
**१९८१-२०११: ७ आणि वरील वयोगट**
(Data Source: Office of the Registrar General & Census Commissioner, India)

**उपक्रम – ५**

लोकप्रिय आणि यशस्वी व्यक्तींची माहिती गोळा करून नोंद वही तयार करा. शिक्षणाच्या आधारे समाजात यश व स्थान प्राप्त करता येते का हे जाणून घ्या.

समाज आपली घडी सुव्यवस्थित राखण्यासाठी विविध उपव्यवस्थांची निर्मिती कशी करत असतो हे या पाठात आपण पाहिले. या प्रत्येक संस्थेचे समाजासाठी काय स्वरूपाचे योगदान आहे ते समजून घेण्यास या पाठातून मदत होईल.

## सारांश

- सुस्पष्ट, स्थिर वर्तन आकृतिबंधांच्या व्यवस्थेला सामाजिक संस्था असे म्हटले जाते.
- सामाजिक संस्था हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म, राज्य, प्रसारमाध्यमे, कायदा, अर्थव्यवस्था अशा विविध सामाजिक संस्थांनीच समाज बनलेला आहे. या संस्थांचे सदस्य म्हणूनच व्यक्ती एकमेकांबरोबर वागत असतात.
- कुटुंब हा मानवी समाजाचा सर्वांत प्राथमिक घटक आहे. सामाजीकरण, लैंगिक वर्तनाचे नियंत्रण, भौतिक व भावनिक सुरक्षितता तसेच व्यक्तीची सामाजिक ओळख निर्माण करणे अशी काही अत्यंत मूलभूत स्वरूपाची कार्ये कुटुंब संस्था पार पाडत असते.
- एक सामाजिक संस्था म्हणून कुटुंबात आज खूप बदल होत आहेत आणि अनेक नवीन स्वरूपाचे कौटुंबिक संबंध निर्माण होत आहेत.
- कौटुंबिक नातेसंबंधांची सुरुवात विवाह या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून होते. लैंगिक संबंधांना व प्रजननाला समाजात मान्यता प्राप्त करून देणारी व्यवस्था म्हणजे विवाह संस्था होय.
- कुटुंबाप्रमाणेच जवळपास सर्व समाजांत कुठल्या ना कुठल्या स्वरूपात विवाह संस्था आढळते. ऐतिहासिक दृष्टीने पहाता, विविध समाजांत विवाहाचे वैविध्यपूर्ण प्रकार अस्तित्वात असलेले आढळतात. जोडीदारांची संख्या तसेच कोणी कोणाशी विवाह करावा यासंबंधीच्या नियमांना अनुसरून विवाहाचे विविध प्रकार दिसून येतात.
- वस्तू आणि सेवांचे उत्पादन, वितरण आणि ग्रहण करण्याची मूलभूत व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय. समाजाचे अस्तित्व कायम टिकवण्यासाठी काही मूलभूत भौतिक गरजांची पूर्ती होणे आवश्यक आहे, जी अर्थव्यवस्थेतून होते.
- कृषक क्रांती, औद्योगिक क्रांती आणि माहिती तंत्रज्ञानातील क्रांती या तीन ठळक संक्रमण अवस्थांच्या माध्यमातून काम आणि अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप समजू शकते.
- वाढत्या औद्योगिकिकरणामुळे शेतीवर आधारित लोकसंख्येचे प्रमाण घटत आहे. उच्च विकसित देशांमध्ये शेतीचे यांत्रिकीकरण झाले आहे आणि तिथे शेतीसाठी मुख्यतः यंत्रे आणि विकसित तंत्रज्ञान वापरले जाते. भारतासारख्या देशात आजही शेती आणि ग्रामीण उद्योगधंद्यांवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण लक्षणीय आहे.
- आधुनिक समाजाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे आर्थिक परस्परावलंबनाचे वाढते प्रमाण. आज भांडवल, श्रम, कच्चा माल व तंत्रज्ञानाच्या जागतिक पातळीवरील देवाणघेवाणीतून जागतिक अर्थव्यवस्था काम करते.
- आधुनिक समाजात विचार व ज्ञाननिर्मिती तसेच आवश्यक कौशल्ये विकसित करण्याची महत्त्वाची उद्दिष्टे डोळ्यांपुढे ठेवून शिक्षण संस्था विकसित झाली आहे.

## स्वाध्याय

**प्र.१(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. आपल्या गटाअंतर्गत विवाह करण्याच्या नियमानुसार केलेल्या विवाहाला ............. म्हणतात.
(अंतर्गत विवाह, बहिर्गत विवाह, बहुपती विवाह)

२. दोन किंवा दोनापेक्षा जास्त पिढ्यांच्या कुटुंबाला ............. असे म्हटले जाते.
(विभक्त कुटुंब, संयुक्त कुटुंब, एकल पालक कुटुंब)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) शाळा – दूर शिक्षण
(ii) समवयस्क समूह – सहज शिक्षण

(iii) आरोग्य सेवा प्रशिक्षण – अनौपचारिक शिक्षण

(iv) कुटुंब – सहज शिक्षण

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| समलैंगिक, मातृगृहीय, भिन्न लिंग लैंगिकता |
|---|

१. विवाहानंतर वर/पती हा वधू/पत्नी च्या घरी रहायला जाणे.

२. समान लिंग असणाऱ्या व्यक्तींचा विवाह.

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. 'अ' व्यक्तीने 'ब' व्यक्तीसोबत विवाह केला. त्यानंतर त्यातील स्त्रीने तिच्या जोडीदारापासून घटस्फोट घेऊन 'क' व्यक्तीशी विवाह केला. हे <u>बहुपती विवाहाचे</u> उदाहरण आहे.

२. <u>कृषक</u> समाजात मोठ्या प्रमाणात उत्पादन व कारखाना पद्धती आढळून येते.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. विवाहानंतरचे निवासस्थान

२. अनौपचारिक शैक्षणिक कार्यक्रम

**(ब) टीपा लिहा.**

१. कुटुंबांतर्गत अधिकाराच्या आधारे कुटुंबाचे प्रकार

२. अर्थव्यवस्थेच्या अवस्था

३. शिक्षणाचे महत्त्व

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. मातृसत्ताक कुटुंब व पितृसत्ताक कुटुंब

२. कृषी क्रांती व औद्योगिक क्रांती

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. एकत्र राहणे/सहवास

२. औपचारिक शिक्षण

**प्र.५ खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. आधुनिक समाजात पालकांच्या भूमिकेत बदल होत आहेत.

२. भारत औद्योगिक क्रांतीच्या संक्रमण अवस्थेत आहे.

**प्र.६ आपले मत नोंदवा.**

१. प्रेम विवाहाबद्दल तुमचे विचार काय आहे? तुम्ही प्रेमविवाहाचे समर्थन करता काय? स्पष्ट करा.

२. माहितीच्या क्रांतीचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव/परिणाम झाला आहे?

**प्र.७ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५० शब्द)**

१. सद्यपरिस्थितीमध्ये कुटुंबाची भूमिका बदलली आहे. तुमच्या स्वतःच्या उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.

**उपक्रम**

तुमच्या स्मरणशक्तीचा वापर करून तुमचा लहानपणापासूनचा प्रवास आठवून तुम्ही व्यक्ती म्हणून घडताना तुमची आवड, आव्हाने, यश-अपयश पडताळण्याचा प्रयत्न करा व यामध्ये कुटुंब, शाळा, धर्म यांचा तुमच्यावर कसा प्रभाव पडला ह्याची नोंद घ्या.

***

# ५ संस्कृती

५.१ संस्कृती : व्याख्या आणि प्रकार
५.२ संस्कृतीचे वर्गीकरण
५.३ संस्कृतीचे घटक
५.४ संस्कृतीची वैशिष्ट्ये
५.५ संस्कृतीचे महत्त्व
५.६ स्वसमूह श्रेष्ठतावाद (Ethnocentrism)
५.७ संस्कृतीचे संकरण

## प्रस्तावना

संस्कृतीची संकल्पना ही गुंतागुंतीची आणि अस्पष्ट अशी आहे. संस्कृती हा शब्द अनेकदा वेगवेगळ्या स्वरूपामध्ये समाजशास्त्रज्ञाकडून आणि दैनंदिन जीवनामध्ये वापरला जातो. एखाद्या विशिष्ट समाजाचा जीवन जगण्याचा मार्ग अथवा पद्धती म्हणजे संस्कृती अशी व्याख्या सर्वसाधारणपणे केली जाते. समाजातील संस्कृती ही शिकून संपादित केली जाते. तिचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे केले जाते. संस्कृतीच्या अस्तित्वामुळे मानव प्राणी हा इतर मानवतेर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरत असतो.

संस्कृती ही संज्ञा सर्वांत प्रथम एडवर्ड टायलर यांनी १८७१ मध्ये वापरली. संस्कृती हा शब्द लॅटीन भाषेतील 'कल्चुरा '(cultura) या शब्दापासून घेण्यात आलेला आहे. 'कल्चुरा '(cultura) चा अर्थ 'वाढवणे', 'रुजवणे' असा होतो. आपण दैनंदिन जीवनामध्ये संभाषण करताना संस्कृतीचा उल्लेख उच्च स्तर किंवा उच्च अभिरूची या अर्थाने करतो. उदा., कला, संगीत, तत्त्वज्ञान अर्थात समाजशास्त्रज्ञ संस्कृतीचा विचार० करताना व्यक्तींच्या व्यक्तिगत उच्च अभिरुचीच्या आधारे न घेता समाजामधील सहभागी असणाऱ्या सर्व सदस्यांच्या जीवनपद्धतीचा विचार केला जातो.

संस्कृती ही संज्ञा म्हणजे विविध समाजांमध्ये किंवा गटांमध्ये सदस्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती होय. यामध्ये सामान्यपणे पोशाखाचे प्रकार, खानपानविषयक व्यवहार, भाषा, वर्तन पद्धती आणि शिष्टाचार, कामाचे प्रकार, धार्मिक प्रथा, मनोरंजक कला, कला प्रदर्शन, साहित्य, खेळ, वैज्ञानिक दृष्टिकोन, लिंगभाव अभिव्यक्ति इत्यादींचा समावेश होतो. संस्कृती ही प्रवाही असते. पिढ्यान्-पिढ्या, काही घटक समाविष्ट केले जातात, काही कायमचे काढून टाकले जातात, काहींची व्याप्ती वाढते, काहींची वर्गवारी पुन्हा केली जाते आणि सुधारणा केली जाते. यामुळे संस्कृती ही गतिशील बनते.

**उपक्रम – १**

संस्कृती ही समाजानुसार बदलत असते. प्रत्येक समाज किंवा वर्ग यांना वेगवेगळी संस्कृती आहे. सदरील संस्कृती काही वेळा एकमेकांवर प्रभाव पाडते आणि काही वेळा एकाकी असते. याची उदाहरणे शोधा.

## ५.१ संस्कृती: व्याख्या आणि प्रकार

### ५.१.१ व्याख्या

१. ***एडवर्ड टायलर :*** "संस्कृती ही अशी जटिल समग्रता आहे की, ज्यामध्ये ज्ञान, श्रद्धा, कला, नीतिमत्ता, कायदा, रितीरिवाज आणि समाजाचा एक सदस्य म्हणून मानवाने संपादन केलेल्या इतर क्षमता व सवयी यांचा समावेश होतो.

२. ***ऑक्सफर्ड डिक्शनरी :*** "विशिष्ट लोकांचे किंवा समाजाचे विचार, रितिरिवाज आणि सामाजिक वर्तणूक म्हणजे संस्कृती होय."

३. ***ब्रॉनिस्लॉ मॉलिनॉस्की :*** "ज्यांच्याद्वारे मनुष्य

त्याची उद्दिष्ट्ये साध्य करतो अशी मानवनिर्मित साधने आणि माध्यमे म्हणजे संस्कृती होय.

वरील व्याख्यांवरून, हे स्पष्ट होते की, संस्कृती ही संज्ञा विशिष्ट अर्थासाठी वापरली जाते व ती दैनंदिन वापरामध्ये वेगवेगळी असते. थोडक्यात, संस्कृती ही –

i. विचार करण्याची एक पद्धत, भावना, श्रद्धा
ii. एकूण लोकांचे जीवन जगण्याचा मार्ग
iii. संपादित वर्तन
iv. प्रत्येकाला त्याच्या वर्गाचा सदस्य म्हणून मिळालेला सामाजिक वारसा
v. वर्तनाचे प्रमाणीकरण करण्याचे तंत्र होय.

### ५.१.२ संस्कृतीचे प्रकार

संस्कृती ही दोन प्रकारांमध्ये विभागलेली आहे

* **भौतिक आणि अभौतिक संस्कृती**

**१. भौतिक संस्कृती :** भौतिक संस्कृती ही वस्तुनिष्ठ मानवनिर्मित गोष्टीनी बनलेली असते. मानवाने निर्माण केलेल्या ठोस आणि मूर्त वस्तूंचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये होतो. यामध्ये पोशाख, दागिने, संगणक, विमान, टेलीव्हिजन, मिसाईल, इतर गोष्टींचा समावेश होतो. भौतिक संस्कृती ही जीवनाचा दर्जा वाढवण्यासाठी गरजेची असते.





भौतिक संस्कृतीची उदाहरणे

**२. अभौतिक संस्कृती :** अभौतिक संस्कृती ही मानवाने घडवलेल्या विचार, कल्पना याच्याशी संबंधित आहे. अभौतिक संस्कृतीमध्ये अमूर्त आणि अप्रकट गोष्टींचा समावेश होतो. उदाहरणार्थ, नियम, प्रमाणके, मूल्ये, प्रतीके, ज्ञान, श्रद्धा, इत्यादी.

अभौतिक संस्कृती मनोज्ञ आणि प्रमाणात्मकता या दोनमध्ये विभागली गेली आहे. मनोज्ञ संस्कृतीमध्ये आपल्या आसपासच्या घटना समजून घेणे आणि त्याचा अर्थ लावणे याचा समावेश होतो. उदा., कल्पना, ज्ञान, श्रद्धा इत्यादी. तर प्रमाणात्मकतेच्या पैलूमध्ये चालीरीती, रितिरिवाज, परंपरा आणि कायदे यांचा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक वर्तनाला मार्गदर्शन करणारी मूल्ये व नियम यांचा समावेश होतो.

संस्कृतीचे भौतिक संदर्भ खूप वेगाने बदलत असतात. आधुनिक बनण्याच्या प्रक्रियेमध्ये नवीन जगण्याच्या पद्धतींचा स्वीकार करणे समाजामधील सदस्यांना त्यामानाने सोपे असते. नवीन फॅशन, नवीन तंत्रज्ञान हे स्वीकारणे सोईस्कर असते. दुसऱ्या बाजूला, अभौतिक संस्कृती ती अमूर्त स्वरूपामध्ये असल्यामुळे बदलणे आणि तिचा स्वीकार करणे हे अतिशय अवघड असते. ज्ञान, कल्पना, श्रद्धा ह्या समाजामध्ये शतकानुशतके रुजलेल्या असतात. त्यांच्यामधील बदल, तो समाज किंवा समाजाचा

विशिष्ट भाग स्वीकारत नाही. अभौतिक संस्कृतीचे पैलू बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये विरोध केला गेला जातो.

**सांस्कृतिक गतिमंदता :** जेव्हा भौतिक संस्कृती अभौतिक संस्कृतीपेक्षा वेगाने बदलते तेव्हा कालांतराने या दोन्हींमध्ये दरी निर्माण होते. यालाच सांस्कृतिक गतिमंदता असे म्हणतात.

**उपक्रम – २**

तुमच्या सभोवताली होणाऱ्या सांस्कृतिक बदलांचे निरीक्षण करून सांस्कृतिक गतिमंदतेची उदाहरणे ओळखून त्याची यादी करा.

## ५.२ संस्कृतीचे वर्गीकरण

१. **उच्च संस्कृती :** उच्च संस्कृतीचा अर्थ उच्च दर्जाच्या सांस्कृतिक निर्मितीशी संबंधित आहे. मानव निर्मितीचे हे उच्च दर्जाचे प्रतीक समजले जाते. अनेकांच्या मते, इतर संस्कृतीच्या प्रकारांपेक्षा उच्च संस्कृती यातील कलात्मक मूल्यामुळे श्रेष्ठ किंवा उच्च समजली जाते. उदा., युरोपियन देशातील मोझार्ट, बीथोवेन यांचे संगीत किंवा भारतातील भीमसेन जोशी, हरिप्रसाद चौरसिया, रवि शंकर यांचे संगीत होय किंवा शेक्सपिअर यांचे साहित्य.

२. **लोकसंस्कृती :** ही सर्वसामान्य लोकांशी संबंधित व प्रामुख्याने औद्योगिक पूर्व समाजातील संस्कृती होय. ही संस्कृती अस्सल/अधिप्रमाणित समजली जाते. स्त्रिनाती यांच्या मते, या संस्कृतीकडे कला म्हणून बघितले गेले नसले तरी त्याचे वेगळेपण मान्य करून त्याचा आदर केला जातो. लोक संगीत, लोककथा ही लोकसंस्कृतीची उदाहरणे होत. ही लोकसंस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केली जाते. पंजाबमधील भांगडा, महाराष्ट्रातील लावणी किंवा उत्तर प्रदेशमधील नौटंकी ही याची उदाहरणे होत.

३. **जन संस्कृती :** लोकसंस्कृती ही औद्योगिक पूर्व काळाचे वैशिष्ट्य आहे. जनसंस्कृती हे औद्योगिक समाजाचे वैशिष्ट्य आहे. जनसंस्कृती ही प्रसारमाध्यमांच्या आधारे उदयास येते. उदा., लोकप्रिय सिनेमा, दूरचित्रवाणीवरील लोकप्रिय मालिका, पॉप संगीत.


४. **लोकप्रिय संस्कृती :** लोकप्रिय संस्कृतीमध्ये मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य लोकांना प्रिय असणाऱ्या सांस्कृतिक घटकांचा समावेश होतो. अर्थात यामध्ये त्या सांस्कृतिक घटकासंबंधी विशेष कौशल्य असल्याचा दावा केला जात नाही. उदा., स्टारवॉर्स, टायटॅनिक, हॅरी पॉटर कांदबरी, चांदोबा, छोटा भीम इत्यादी.

५. **उपसंस्कृती :** उपसंस्कृती म्हणजे असे गट की ज्यामध्ये एकमेकांबरोबर अनेक गोष्टी समान असतात. पण हे गट इतर गटांपासून वेगळे काढता येतात. उदा., विविध धार्मिक गट किंवा वांशिक गट किंवा युवा गट यांची संस्कृती.

## ५.३ संस्कृतीचे घटक

१. **प्रतीके :** प्रत्येक संस्कृतीमध्ये अनेक प्रतीके असतात. ही प्रतिके विशिष्ट गोष्टीचे निर्देशक असतात आणि बहुतांशी वेळेला ही प्रतीके काही भावना व प्रतिक्रियांना उद्युक्त करतात. समान संस्कृती असणाऱ्या व्यक्ती एखाद्या वस्तूला किंवा हावभावाला, आवाजाला किंवा एखाद्या प्रतिमेला विशिष्ट असा अर्थ लावतात.उदा., सध्या मोबाइलच्या जगतात स्वतःला व्यक्त करण्यासाठी किंवा आपल्या भावना पोहोचवण्यासाठी emojis/smiley याचा उपयोग केला जातो. याच्यामार्फतच बहुतांशी वेळेस संदेश पाठवले जातात. त्याचप्रमाणे संपूर्ण देशाचे राष्ट्रीय प्रतीक म्हणून आपल्याला भारतीय राष्ट्रध्वजाकडे बघता येते.

आणखी एक उदाहरण घ्यायचे झाले तर आपल्या दैनंदिन जीवनात रस्त्यावरील सिग्नल हे वाहतूक नियंत्रित करण्यासाठी वापरलेली प्रतीकेच आहेत. काही प्रतीके भौतिक स्वरूपाची असतात. एका विशिष्ट संस्कृतीतील लोक समान प्रतीके वापरत असल्याने व्यक्तीमधील व गटातील आंतरक्रिया सोप्या होतात.



प्रतीके

**२. भाषा :** शब्दाला समुच्चय किंवा समान अर्थ असणारे विचार म्हणजे भाषा होय. एका विशिष्ट समाजामध्ये विशिष्ट परिस्थितीत समान भाषा वापरली जाते. भाषेमध्ये विविध आवाजांचे प्रकार, शब्द, वाक्यरचना असतात व या सगळ्यांना समान असा अर्थ असतो. भाषा हे प्रामुख्याने संपर्काचे माध्यम असते. तसेच एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संदेश पोहोचवण्याचे काम भाषा करते. वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये वेगवेगळी भाषा वापरलेली असते. थोडक्यात, भाषा ही विविध गुंतागुंतीच्या क्रिया एकमेकांपर्यंत पोहोचवण्याचे माध्यम आहे. भाषेच्या माध्यमातूनच संस्कृतीची वृद्धी होत असते. प्राण्यांना विशिष्ट भाषा नसल्यामुळे त्यांची संस्कृती देखील विकसित होत नाही. थोडक्यात, भाषा ही संस्कृतीचा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे.

**हे तुम्हांला माहीत आहे का?**

उत्तर तुर्कस्तानातील काळ्या समुद्राजवळील गावकऱ्यांनी जोपासलेल्या पक्ष्यांच्या भाषेची गोष्ट – तुर्कस्तानामधील काळ्या समुदाच्या किनाऱ्यावर एका दुर्गम डोंगराळ खेड्यामध्ये आजही गावकरी पक्ष्यांच्या शिट्टीच्या आवाजाच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधतात. त्याला ते पक्ष्यांची भाषा असे संबोधतात. केवळ एकमेकांना शुभेच्छा देण्यापुरती ही भाषा न वापरता अनेक महत्त्वाचे व्यवहार व निरोप देण्यासाठी ही भाषा वापरली जाते. या गावाचे नाव 'कुस्कोय' असून या गावातील शेतकरी चहा, मळा, बीट व इतर धान्य पिकवतात.

या गोष्टीसाठी पुढील लिंकला भेट द्या.

Weblink: https://www.youtube.com/watch?v=mQmF7kbOrmE

**३. ज्ञान :** ज्ञान हा संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहे. ज्ञानाच्या साहाय्याने व्यक्ती आपल्या आसपासच्या परिस्थितीशी जुळवून घेतात. ज्ञान दोन प्रकारचे असते. प्रत्यक्ष ज्ञान जे कोणाच्याही मध्यस्थीशिवाय मिळणारे असते. याउलट अप्रत्यक्ष ज्ञान हे एखाद्या मध्यस्थाद्वारे मिळत असते.

आपल्या दैनंदिन जीवनात विविध अनुभवांच्या मार्फत आपण व्यावहारिक ज्ञानदेखील मिळवत असतो. हे ज्ञानाचे सर्व प्रकार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. एखादी पिढी त्या त्या सामाजिक परिस्थितीनुसार ज्ञानाची निर्मिती करते व ते ज्ञान पुढच्या पिढीकडे सोपवते. पुढची पिढी बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार त्या ज्ञानात भर घालून किंवा बदल करून त्या पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करते. अशा पद्धतीने प्रत्येक संस्कृतीतील ज्ञानाची वृद्धी होते.

४. **मूल्य आणि श्रद्धा :** मूल्य आणि श्रद्धा हे संस्कृतीचे आणखी दोन महत्त्वाचे घटक आहेत. प्रत्येक समाजानुसार त्यातील संस्कृती बदलत जाते. तसेच त्याची मूल्येही बदलत जातात. काय योग्य किंवा अयोग्य, काय चांगले किंवा वाईट इत्यादीबाबत एखाद्या समाजाच्या सदस्यांनी निश्चित केलेल्या सामूहिक संकल्पना म्हणजे मूल्ये होय. काही मूल्ये हे आपल्याला आनुवंशिकतेने/परंपरेने मिळतात. थोडक्यात, विशिष्ट सांस्कृतिक मूल्याचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होत असते. थोडक्यात, मूल्ये ही समाजातील सदस्यांनी निश्चित केलेले काही मापदंड असतात. प्रत्येक समाजाची स्वतःचीही मूल्ये असतात तसेच काही मूल्ये सार्वत्रिक असतात.

लोकांनी सत्य म्हणून स्वीकारलेली कल्पना किंवा विधाने म्हणजे श्रद्धा होय. मूल्ये आणि श्रद्धा हे दोन्हीही आपल्या नैतिक विश्वाचा भाग असतात. संस्कृतीचे सदस्य हे दोन्हीही घटक कुटुंबाकडून, शिक्षण व्यवस्थेतून किंवा धार्मिक संस्थांकडून शिकत असतात.

५. **नियमने :** नियमने म्हणजे एखाद्या समाजातील सदस्यांनी कशा प्रकारे वर्तन करावे या विषयीचे नियम होत. काही नियम आपण काय करू नये याविषयीचे मार्गदर्शन करतात, तर काही नियम समाजात वावरत असताना कशा प्रकारे वागावे हे सांगतात. बहुतांशी नियम हे सर्वांना समान लागू पडतात. तर काहीच नियम विशिष्ट संस्कृतीला धरून असतात.

सामाजिक नियमनांचे दोन भागांत वर्गीकरण करता येते:

१. लोकरिती २. लोकनीती.

लोकरिती या त्यामानाने सौम्य असतात व सौम्यपणे समाजातील व्यक्तींवर लादल्या जातात. याउलट लोकनीती या जास्त कठोरपणे पाळल्या जातात. खाण्याच्या वेळा, खाण्याच्या वेळी पाळले जाणारे शिष्टाचार, भोजन बनवण्याच्या पद्धती, बोलण्याच्या पद्धती आणि दैनंदिन व्यवहारातील शिष्टाचार इत्यादी लोकरिती या रूढीपरंपरागत आलेल्या वर्तन पद्धती होय. थोडक्यात एखाद्या समूहाच्या दैनंदिन व्यवहारातील रूढीपरंपरागत आलेल्या, रोजच्या जीवनात अंगवळणी पडलेल्या सवयी म्हणजे लोकरिती होय. तर लोकनीती या अधिक गंभीर पण अनौपचारिक रितीने पाळण्यात आलेल्या वर्तन पद्धती होय. उदाहरणार्थ, विवाहाचे नियम असणाऱ्या लोकनीतीचे उल्लंघन केल्याने सामाजिक व्यवस्थेला गंभीर धोका पोहोचू शकतो. लोकरिती व लोकनीती हे संस्कृतीचे मूलभूत आधार आहेत. यांच्यामुळेच विशिष्ट संस्कृतीचे आकलन होण्यास मदत होते. हे इतर कुठल्याही कायदेशीर नियमापेक्षा देखील महत्त्वाचे मानले जातात.

## ५.४ संस्कृतीची वैशिष्ट्ये

१. **संस्कृती शिकावी लागते :** संस्कृती ही जैविक वारशातून मिळत नाही तर ती सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारे प्रत्येक सदस्य शिकत असतो. सांस्कृतिक गोष्टी शिकण्याची प्रक्रिया ही प्रतीकात्मक आंतरक्रियेतून घडत असते. म्हणजे प्रतीके, हावभाव यांतून संस्कृती शिकली जाते. ती आपल्याला आनुवंशिकतेतून मिळत नाही तर समाजात वावरत असताना आलेल्या अनुभवांतून शिकली जाते. प्रत्येक संस्कृतीचे सदस्य इतरांबरोबरच्या देवाण-घेवाणीतून काही आदर्श वर्तन पद्धती शिकत असतात व त्यातूनच त्यांचे जीवन घडत असते. भावी पिढी ही आदर्श वर्तन पद्धती शिकतात व यातूनच भावी पिढीमध्ये संस्कृती अंगीकारली जाते.

२. **संस्कृती ही अमूर्त असते :** संस्कृती ही समाजातील व्यक्तीच्या विचारातून किंवा त्यांच्या

सवयीतून दिसते. काही प्रमाणात त्यांच्या आचरणातून दिसते. थोडक्यात, आपण संस्कृती बघू शकत नाही, तर ती व्यक्तीच्या वर्तनातूनच अनुभवली जाते. या वर्तन पद्धतीमध्ये काही विशिष्ट रचना दिसते. त्याला आपण संस्कृती म्हणतो.

३. **संस्कृती ही सामूहिक असते :** संस्कृती ही मानवनिर्मित असली तर ती कोणा एका व्यक्तीच्या मालकीची नसते. एखादी संस्कृती तेथील भौगोलिक परिस्थितीतून, त्या समाजाच्या भूतकाळातून, तेथील लोकांच्या श्रद्धा आणि मूल्यांमधून तसेच त्यांच्या समृद्ध वारशातून जन्माला आलेली असते. त्या समाजाचा भाग म्हणून सर्वच व्यक्ती त्या संस्कृतीचा भाग बनतात. त्यांची भाषा व शिष्टाचार समान असतात आणि म्हणूनच संस्कृती सामूहिक असून वैयक्तिक नाही असे म्हटले जाते.

४. **संस्कृती ही मानवनिर्मित असते :** संस्कृती ही मानवाच्या सामाजिक आंतरक्रियेमधून निर्माण होते. ती आपोआपच उदयास येत नाही. त्यामुळेच संस्कृतीचे अस्तित्व त्या समाजाच्या अस्तित्वावर अवलंबून असते. ती नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे.

५. **संस्कृती आदर्शात्मक असते :** प्रत्येक संस्कृतीमध्ये विचार व नियमने असतात. हे विचार आणि नियमने नेहमीच आदर्श स्वरूपाची असतात. समाजातील आदर्श वर्तन पद्धती व नियम तसेच बौद्धिक, कलात्मक आणि विविध सामाजिक आदर्शांची एकत्रित बांधणी म्हणजे संस्कृती होय. अशा प्रकारच्या आदर्श संस्कृतीलाच प्रोत्साहन दिले जाते.

६. **संस्कृती ही हस्तांतरित केली जाते :** पालक, शिक्षक, धर्मगुरू, जनसंपर्काची साधने आणि समाजातील इतर सदस्य आदर्श अशा वर्तन पद्धती एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करत असतात. अर्थात, काही वेळेस ही क्रमवारी उलटी होताना दिसते. सध्याच्या तांत्रिक विकासाच्या काळात अनेकदा आधीची पिढी नवीन पिढीकडून नवीन तंत्रज्ञान शिकताना दिसते. त्याचबरोबर काही वेळेस संस्कृतीचे हस्तांतरण समस्तरीय पिढीकडे होताना दिसते. उदा., अनेकदा आपल्या समवयस्काकडून पेहरावाच्या पद्धती, राजकीय विचार इत्यादींच्या देवाण-घेवाणीतून संस्कृतीचे हस्तांतरण होते. बहुतांशी वेळेस हे हस्तांतरण कळत नकळत होत असते.

७. **संस्कृतीमध्ये सतत परिवर्तन होत असते :** संस्कृतीमध्ये सतत बदल घडत असतात. बदलत्या काळानुसार काही श्रद्धा, परंपरा, रूढी, मागे टाकल्या जातात व नवीन पद्धती अंगीकारल्या जातात. भाषा व शिष्टाचार यांत बदल होताना दिसतात. उदा., व्हॉटस् ॲप वरून संदेश द्यायला लागल्यापासून इंग्रजी भाषेमध्ये खूप बदल होताना दिसतात. तसेच मोबाइलच्या वापरामुळे पूर्वापार चालत आलेल्या संवादासंबंधीच्या शिष्टाचारात बदल होताना दिसतात. आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर स्थलांतर आणि जागतिकीकरणाचा देखील संस्कृतीवर परिणाम होताना दिसतो. जेव्हा जगभरातील व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्याचा एकमेकांच्या संस्कृतीवर परिणाम होऊन नवीन बहू संस्कृती निर्माण होते. त्याचबरोबर आधुनिक शिक्षण व ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्यामुळे व्यक्तींचा दृष्टिकोन अधिक व्यापक होतो. जुन्या चालीरिती व परंपराचा ताठरपणा कमी होऊन त्यात बदल घडून येतात.

जरी संस्कृतीमध्ये सतत परिवर्तन होत असले तरी परिवर्तनाची गती प्रत्येक संस्कृतीसाठी वेगवेगळी असते.

८. **समाजपरत्वे संस्कृती बदलते :** प्रत्येक समाजाची स्वतःची अशी संस्कृती असते. त्यातील मूल्ये,

परंपरा, रूढी, विचारप्रणाली, धर्म, श्रद्‌धा, पद्‌धती एका संस्कृतीसाठी समान असल्या तरी इतर संस्कृतीपेक्षा वेगळ्या असतात. खानपान, बोलण्याच्या पद्‌धती, शिष्टाचार, स्वागतपद्‌धती पोशाखाच्या पद्‌धती या त्या त्या सामाजिक परिस्थितीतून बदलत असतात.

९. **संस्कृती ही एकात्मक असते :** संस्कृतीचे विविध घटक हे परस्परपूरक, परस्पर संबंधित व एकात्मक स्वरूपाचे असतात. उदा., एखाद्या समाजातील मूल्य व्यवस्था ही त्या समाजातील नैतिकता, धर्म, रूढी, परंपरा, श्रद्‌धा इत्यादी सांस्कृतिक पैलूंशी घनिष्ठपणे जोडलेल्या असतात.

१०. **भाषा ही संस्कृतीचे प्रमुख वाहक आहे :** आपण केवळ वर्तमानातच नाही तर भूत व भविष्यकाळातही वावरत असतो. भूतकाळात शिकलेल्या गोष्टी पुढे आणण्यासाठी भाषा मदत करते. प्रत्येक संस्कृतीची विशिष्ट अशी भाषा असते व त्या संस्कृतीतील सर्व सदस्यांना ती भाषा अवगत असते. इतर अनेक मार्गांनी संस्कृतीचे हस्तांतरण होत असले तरी भाषा हे एक प्रमुख माध्यम आहे की ज्यांच्यामार्फत संस्कृतीचे हस्तांतरण मोठ्या प्रमाणावर होत असते.

## ५.५ संस्कृतीचे महत्त्व

संस्कृती ही कोणत्याही जिवंत समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बहुतांशी वेळेस ते आपल्या पौराणिक कथांमधून, चित्र, शिल्प, संगीत अशा अनेक कला प्रकारांमधून व्यक्त केले जाते. ते आपण ज्या पद्‌धतीने आपला इतिहास साजरा करतो किंवा इतिहासाचे ज्या पद्‌धतीने स्मरण करतो किंवा ज्या पद्‌धतीने आपल्या भविष्यकाळाचा विचार करतो त्यातून देखील व्यक्त होत असते. याचबरोबर संस्कृतीचे काही सामाजिक आणि आर्थिक फायदेदेखील आहेत.

### संस्कृतीचे वैयक्तिक आणि सामाजिक फायदे

१. **मूलभूत फायदा :** संस्कृतीचा सदस्य म्हणून व्यक्तींना अनेक फायदे मिळतात. संस्कृतीमुळे भावनिकदृष्ट्या आणि बौद्‌धिकदृष्ट्या सक्षम होण्यास अनुभव मिळतात. व्यक्तीमधील सर्जनशीलता व्यक्त होण्यासाठी संस्कृती मदत करते. तसेच व्यक्तींची अस्मिता निर्माण करण्यामध्ये देखील मदत करते. यामुळेच आपण आपल्या संस्कृतीकडे आकर्षित होतो आणि त्याचा सदस्य म्हणून त्यात सहभागी होतो.

२. **भविष्यात उपयोगी येणारी नवीन कौशल्ये आणि नवीन गोष्टी शिकण्याच्या संधी :** लहान मुले व युवक एखाद्या विशिष्ट संस्कृतीचे सभासद म्हणून नवीन कौशल्ये शिकतात. याचबरोबर त्यांची अस्मिता आणि संवेदनक्षमता देखील संस्कृतीच्या माध्यमातून विकसित होत असते. यातून शिकण्याची क्षमता वाढताना दिसते. आपण संस्कृती आणि शैक्षणिक क्षमता आणि शैक्षणिक विकास यांमध्ये परस्परसंबंध लावू शकतो. ज्या संस्कृतीमध्ये नवनवीन कौशल्ये आणि शिक्षणाला प्राधान्य दिलेले असते त्या समाजामध्ये आपल्याला सदस्यांची शैक्षणिक पातळी आणि व्यावसायिक क्षमता जास्त आहे असे दिसते. समृद्‌ध सांस्कृतिक वारसा असणाऱ्या समाजामध्ये अधिक विस्तृत स्वरूपाच्या शैक्षणिक संधी उपलब्ध असतात.

३. **सामाजिक स्वास्थ्य आणि हित :** समृद्‌ध संस्कृती असलेल्या समाजातील सदस्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य समृद्‌ध असते, असे अनेक ठिकाणी दिसून आले आहे. सध्याच्या विविध संशोधनांच्या निष्कर्षानुसार वेगवेगळ्या संगीत, नाटक यांसारख्या सांस्कृतिक कलांमध्ये भाग घेतल्याने समाजातील सभासदांचे मानसिक/ शारीरिक स्वास्थ्य चांगले राहते. अशा कलांमुळे व्यक्तीचा एकटेपणा कमी होतो. तसेच या कला आपली ओळख निर्माण करण्यात व्यक्तींना मदत

करतात आणि या कलांच्या मार्फत इतर समाजामधील संस्कृतीची देखील ओळख व्यक्तींना होते.

४. **सामाजिक एकात्मकता आणि एकरूपता :** संस्कृतीचे फायदे केवळ व्यक्तिगत नसून त्याचे फायदे संपूर्ण समाजाला देखील होतात. संस्कृतीतूनच सांस्कृतिक भांडवलाची निर्मिती होते व त्यातून समाज एकत्र बांधला जातो. जत्रा, सण-समारंभ यांसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून त्या संस्कृतीतील सदस्य एकत्र येतात व समाजात एकात्मता निर्माण होते. यातूनच पुढे सामाजिक समावेशकता, समुदायाचे सक्षमीकरण आणि सहिष्णुता वाढीस लागते. थोडक्यात समाजातील चैतन्य टिकवून ठेवण्यासाठी संस्कृती आवश्यक असते. अनेकदा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मार्फत तयार झालेली सामाजिक संपर्काची जाळी आर्थिक व्यवहारांमध्ये देखील उपयोगी पडतात. एखाद्या समाजातील वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारशातून सभासदांना समृद्ध भूतकाळाचे आकलन होते व त्यातून त्यांच्यामध्ये गौरवाची भावना निर्माण होते. यातूनच सभासदांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते.

**हे जाणून घ्या.**

पर्यटन क्षेत्राच्या वाढीमध्ये संस्कृतीचे योगदान महत्त्वपूर्ण असते. पर्यटन क्षेत्राचा विकास झाला की नवीन व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतात. तसेच पायाभूत सुविधांचा विकास होतो. विविध प्रदेशांमध्ये दरवर्षी साजरे केले जाणारे सण तसेच तेथील संग्रहालये, कलादालने, ऐतिहासिक वास्तू याचे पर्यटकांना प्रचंड आकर्षण असते. बऱ्याचदा सांस्कृतिक वारशाविषयी जाहिरात करून सांस्कृतिक पर्यटन वाढवले जाते. उदा., ताजमहाल, चारमिनार, कुतुबमिनार, लालकिल्ला, काशीविश्वेश्वर, कन्याकुमारी, वेगवेगळे गड अशी ठिकाणे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहेत. उदा., राजस्थानमधील वेगवेगळे महाल, संगीत, राजपुत योद्ध्यांचा इतिहास हे सर्व राजस्थानमधील सांस्कृतिक पर्यटन वाढीस लागण्यास कारणीभूत झालेले दिसते.

## ५.६ स्वसमूह श्रेष्ठतावाद/स्वसंस्कृती श्रेष्ठतावाद

स्वसमूह श्रेष्ठतावाद म्हणजे इतरांच्या संस्कृतीपेक्षा आपली स्वतःची संस्कृती अधिक श्रेष्ठ आहे असा समज होय. यामध्ये स्वतःच्या दृष्टिकोनातून इतर संस्कृतींचे मूल्यमापन केले जाते. १९०६ मध्ये विलियम ग्रॅहम समनर यांनी पहिल्यांदा स्वसमूह श्रेष्ठतावाद ही संकल्पना मांडली. एखाद्या विशिष्ट संस्कृतीमधील सदस्यांची जीवनशैली आणि संस्कृती ही इतरांपेक्षा श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ती म्हणजे स्वसमूह श्रेष्ठतावाद होय. यामध्ये केवळ स्व संस्कृतीलाच महत्त्व दिले जाते व आपल्या संस्कृतीच्या संदर्भातच इतर संस्कृतींचे मूल्यमापन केले जाते. स्वतःची संस्कृती प्रमाणित मानल्याने इतर संस्कृतींचे मूळ संस्कृतीपासून विचलन झाले आहे. यांसारखे गैरसमजदेखील स्वसमूहश्रेष्ठतावादामुळे होतात. असे असले तरी स्वसमूह श्रेष्ठतावाद प्रत्येक संस्कृतीचे वैशिष्ट्य बनले आहे. असे अनेक समाजशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

काही सामाजिक शास्त्रज्ञांच्या मते, स्वसमूह श्रेष्ठतावादामुळे दुसऱ्या संस्कृती समजून घेण्यामध्ये पूर्वग्रह निर्माण होऊ शकतात. संघर्षवादी विचारवंतांच्या मते, स्वसमूह श्रेष्ठतावादामुळे समाजामध्ये व्यक्तींना समान संधी नाकारल्या जातात. तरी याउलट, कार्यवादी विचारवंतांच्या मते, स्वसमूह श्रेष्ठतावाद सामाजिक एकात्मतेसाठी पूरक ठरतो. उदा., दुसऱ्या संस्कृतीला कमी लेखण्याच्या नादात स्वतःच्या संस्कृतीविषयीचा अभिमान त्या त्या संस्कृतीच्या सदस्यांमध्ये वाढीस लागतो.

थोडक्यात, स्वसमूह श्रेष्ठतावाद सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजू असतात. आपल्यापेक्षा अधिक श्रेष्ठ संस्कृतीमधून आपल्याला जे ज्ञान मिळू शकते ते स्वसमूह श्रेष्ठतावादाच्या भावनेतून मिळत नाही. तसेच व्यक्ती उद्धट होण्याची शक्यता असते. या त्याच्या नकारात्मक बाजू आहेत.

तर आपल्या संस्कृतीविषयी अभिमान असणे यातून एक प्रकारचा आत्मविश्वास आणि दिलासा मिळतो. तसेच गट एकत्र बांधलेला राहतो, या त्याच्या सकारात्मक बाजू आहेत.

## ५.७ संस्कृतीचे संकरीकरण

एखाद्या संस्कृतीमधील एका भागातील पद्धतींचे दुसऱ्या संस्कृतीमधील एखाद्या भागाशी सरमिसळ होते त्याला सांस्कृतिक संकरण असे म्हणतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये विविध सांस्कृतिक परंपरांचे मिश्रण झाल्याने नवीन सांस्कृतिक आचार आणि वर्तनपद्धती उदयास येतात. आपली संस्कृती पूर्णच न नाकारता इतर संस्कृतीमधून आपल्या आवडीनुसार आणि सोईनुसार काही घटक निवडून आपल्या संस्कृतीत त्याची बेमालूम सरमिसळ करणे शक्य होते व यातूनच एक पूर्णतः वेगळी, नवीन आणि वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती उदयास येते. यालाच संस्कृतीचे संकरीकरण असे म्हणतात. ही संकरीकरणाची प्रक्रिया सार्वत्रिक असून जागतिकीकरणामुळे हे अधिक जलद गतीने होताना दिसते. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये मानवी समुहांमध्ये विविधता निर्माण होताना दिसते. जागतिक पातळीवर होणारे स्थलांतर, माहिती तंत्रज्ञान, जागतिक आर्थिक उलाढाल, वाढता आचार-विचारांचा विनिमय यातून वेगवेगळे समाज मोठ्या प्रमाणावर एकमेकांवर अवलंबून असतात व यातूनच संस्कृतीचे संकरण होते. यातून नवीन रोमांचक सांस्कृतिक अनुभवनिर्मिती होते. खानपान, भाषा, लग्नपद्धती, वेषभूषा या सगळ्यामध्ये संकरित संस्कृती दिसते. उदा., इटालियन पिझ्झावर तंदूर पनीरचे मिश्रण हे सांस्कृतिक संकरीकरणाचेच एक उदाहरण आहे. व्हॅलेंटाईन साजरा करणे, भाषेची सरमिसळ, फ्यूजन संगीत ही सांस्कृतिक संकरीकरणाची आणखी काही उदाहरणे आहेत.

सांस्कृतिक संकरीकरण समजून घेण्यासाठी 'ग्लोकलायझेशन' ही संकल्पना समजून घेतली पाहिजे. यामध्ये जागतिक पातळीवरील प्रक्रियांचे स्थानिक पातळीवरील प्रक्रियांबरोबर मिश्रण होते. जागतिक पातळीवर असणाऱ्या पद्धतींना स्थानिक पद्धतींची जोड दिली जाते. उदा., जागतिक पातळीवरील खाण्याची ठिकाणे जेव्हा इतर देशांमध्ये व्यवसायानिमित्ताने स्थिरावतात तेव्हा त्या त्या देशातील स्थानिक आवडी-निवडीनुसार बदल केले जातात. तरच त्यांना नवीन देशात स्थिरावायला मदत होते. उदा., मॅकडोनाल्डच्या बर्गर मेनूमध्ये स्थानिक आवडी-निवडीनुसार केलेले बदल, चायनीज पदार्थांचे भारतीयीकरण होणे इत्यादी.

### हे तुम्हांला माहीत आहे का?

**ग्लोकलायझेशन**

ग्लोकलायझेशन ही संकल्पना इंग्रजीमधील ग्लोबलायझेशन आणि लोकलायझेशन या दोन संकल्पना मिळून तयार झाली आहे. जागतिक पातळीवर उत्पादित केलेल्या वस्तू व सेवा जेव्हा जगभर स्थलांतरित होतात तेव्हा त्या त्या स्थानिक संस्कृतीमुळे त्यामध्ये बदल केले जातात. त्या प्रक्रियेला उद्देशून ग्लोकलायझेशन ही संकल्पना वापरली जाते. ही संकल्पना १९८० मध्ये प्रामुख्याने वापरली गेली. १९८० च्या हार्वर्ड बिझीनेस रिव्ह्यूमध्ये ही संकल्पना पहिल्यांदा रोलँड रॉबर्टसन या समाजशास्त्रज्ञाने मांडली. यामध्ये एखाद्या प्रक्रियेचे सार्वत्रिकीकरण आणि स्थानिकीकरण या दोन्हींची एकाच वेळेस सांगड घातली जाते.



बर्गर



संकरित रूपातील बार्बी

संस्कृती ही सर्वसमावेशक आहे. आपण जो विचार करतो, मत बनवतो आणि आचरण करतो त्या सर्वांवर संस्कृतीचा प्रभाव असतो. तुम्हांला आता समाजाचे सदस्य म्हणून आपल्या जगण्यावर प्रभाव टाकणारे संस्कृतीचे विविध पैलू माहीत झाले असतील. सांस्कृतिक वैविध्याचे आणि संक्रमणाचे महत्त्व ओळखून त्याबरोबर येणाऱ्या सांस्कृतिक आव्हानांचे आकलनही तुम्हांला नक्की झाले असेल.

**उपक्रम – ३**

तुमच्या भोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण करा आणि खाद्यपदार्थ, खेळणी, धार्मिक प्रथा, सण-समारंभ अशा विविध क्षेत्रांत दिसणाऱ्या संकरीकरणाच्या उदाहरणांची यादी करा.

## सारांश

- संस्कृती ही संकल्पना समाजशास्त्रात आणि दैनंदिन जीवनात विविध अर्थांनी वापरली जाते.
- जीवन जगण्याचा मार्ग आणि सामाजीकरणाच्या मार्फत शिकलेली जीवनपद्धती असा संस्कृतीचा सर्वमान्य अर्थ होय.
- प्रमाणित वर्तन पद्धती अंगीकरणाचा संस्कृती हे प्रमुख माध्यम आहे.
- संस्कृतीचे दोन प्रकारांत विभाजन होते. भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती.
- भौतिक संस्कृतीमध्ये मानवनिर्मित ठोस/भरीव आणि मूर्त गोष्टींचा समावेश होतो.
- अभौतिक संस्कृतीमध्ये मानवनिर्मित विचारधारा तसेच इतर अमूर्त आणि अप्रकट गोष्टींचा समावेश होतो.
- संस्कृती ही प्रतीके, चिन्हे, मूल्य, श्रद्धा, प्रमाणके, भाषा व ज्ञान यांनी बनलेली असते.
- संस्कृती ही नैसर्गिक नसून ती सामाजीकरणाच्या प्रक्रियेमार्फत त्या त्या संस्कृतीच्या सदस्यांना शिकवली जाते. म्हणून संस्कृती मानवनिर्मित आहे.
- संस्कृती ही आदर्श स्वरूप असून त्या त्या समाजातील आदर्श पद्धती व प्रमाणकांची गोळाबेरीज असते.
- संस्कृती ही गतिशील असते. संस्कृतीमध्ये सतत बदल होत असतात. बदलत्या काळानुसार त्या त्या समाजातील श्रद्धा, परंपरा, रूढी बदलत जातात. काही मागे पडतात, भाषेमध्ये तसेच शिष्टाचारात बदल होतात आणि त्यामुळे संस्कृतीमध्ये देखील बदल होतात.
- प्रत्येक समाजाला स्वतःची अशी एक संस्कृती असते व वर्तन पद्धती असते. त्या त्या संस्कृतीमधील सदस्यांसाठी ती समान असली तरी संस्कृतीनुसार ही वर्तनपद्धती बदलत जाते.

- भाषा ही कोणत्याही संस्कृतीची प्रमुख वाहक असते.
- संस्कृतीचे सभासद म्हणून व्यक्तींना त्याचे अनेक फायदे होत असतात. तसेच समाजात देखील सामाजिक एकात्मता आणि एकरूपता वाढते.
- प्रत्येक संस्कृतीमध्ये स्वसमूह श्रेष्ठतावाद दिसतो. आपलीच संस्कृती श्रेष्ठ अशी भावना म्हणजे स्वसमूह श्रेष्ठतावाद होय.
- जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये विविध संस्कृतींमधील काही भाग सोईनुसार आणि आवडीनुसार एकत्र जोडले जातात व एक नवीन संस्कृती उदयास येते. यालाच सांस्कृतिक संकरीकरण असे म्हणतात.

## स्वाध्याय

**प्र.१(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. संस्कृती ही ............ असते.
(नैसर्गिक, वैयक्तिक, अनुकूलनीय)

२. भौतिक संस्कृती ............ असते.
(मूर्त, वस्तुनिष्ठ, अमूर्त)

३. बॉलिवूड संगीत ........... चे उदाहरण आहे.
(उच्च संस्कृती, लोकप्रिय संस्कृती, लोक संस्कृती)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) भीमसेन जोशी यांचे गायन – उच्च संस्कृती
(ii) शेक्सपिअरचे साहित्य – लोक संस्कृती
(iii) हॅरी पॉटर कादंबरी – लोकप्रिय संस्कृती
(iv) धार्मिक गट – उपसंस्कृती

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| भौतिक संस्कृती, लोक संस्कृती, लोकप्रिय संस्कृती |
|---|

१. गायन कला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणे.

२. आजच्या काळात मोबाईलचा वापर.

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणे हे भौतिक संस्कृतीचे उदाहरण आहे.

२. ई-व्यापार हे लोकप्रिय संस्कृतीचे उदाहरण आहे.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. सांस्कृतिक संकरण

२. स्वसंस्कृती श्रेष्ठतावाद

**(ब) टीपा लिहा.**

१. संस्कृतीची वैशिष्ट्ये

२. संस्कृतीचे सामाजिक फायदे

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. भौतिक संस्कृती आणि अभौतिक संस्कृती


२. लोकरिती आणि लोकनीती

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. उपसंस्कृती

२. लोकसंस्कृती

**प्र.५(अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**



**(ब) आपले मत नोंदवा.**

१. आजच्या काळात शास्त्रीय संगीत शिकण्याचा प्रयत्न खूप कमी लोक करतात.

२. अंधश्रद्धेचा त्याग करणे सोपे नाही/सहज शक्य होत नाही.

**उपक्रम**

वर्गातील प्रत्येकी ५/७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचे गट करून कोणत्याही एका भारतीय राज्यातील संस्कृतीचे सादरीकरण (PPT मार्फत) करा. यामध्ये भाषा, वेशभूषा, नृत्य, संगीत, कथा, खानपान पद्धती, साहित्य यासारख्या सर्व घटकांचा समावेश करा.

***

# ६ सामाजीकरण

६.१ सामाजीकरण : अर्थ आणि व्याख्या
६.२ सामाजीकरणाची प्रक्रिया
६.३ सामाजीकरणाची साधने
६.४ पुनर्सामाजीकरण

## प्रस्तावना

प्रामाणिक लाकूडतोड्याच्या गोष्टीमध्ये त्याला देवदूताकडून त्याच्या लोखंडी कुऱ्हाडीबरोबरच सोन्याची आणि चांदीचीही कुऱ्हाड प्रामाणिकपणाचे बक्षीस म्हणून मिळते. या गोष्टीमधून मुलांना प्रामाणिकपणाचे महत्त्व प्रभावीपणे समजते. अशा दंतकथा अणि गोष्टींमधून मुलांना मोठ्यांकडून खूप काही शिकायला मिळत असे. सध्याच्या काळात त्याची जागा ॲनिमेटेड फिल्म्स किंवा रंगीबेरंगी आकर्षक पुस्तकांनी घेतली आहे. माध्यमांचे स्वरूप जरी बदलले तरी या गोष्टी पिढ्यान्‌पिढ्या हस्तांतरित होत राहिल्या.

प्रत्येक समाजात या गोष्टींचा हेतू हा लहान मुलांना चूक/बरोबर, मान्य/अमान्य, योग्य/अयोग्य याबाबतची जाणीव करून देणे हाच असतो. मुलांना स्व ची जाणीव होणे किंवा कौशल्य आत्मसात करण्याची जी प्रक्रिया असते त्याला सामाजीकरण असे म्हटले जाते.

सामाजीकरणाचा अर्थ व प्रक्रिया समजून घेणे हा या पाठाचा उद्देश आहे. या पाठात व्यक्तीचे सक्षम, कृतीशील, सामाजिक व्यक्तीमध्ये रूपांतरण कसे होते ते समजून घेऊ या.

## ६.१ सामाजीकरण: अर्थ आणि व्याख्या

### ६.१.१ सामाजीकरणाचा अर्थ

मानवी वर्तनाचा अर्थ हा जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून लावला जावा की, सांस्कृतिक, सामाजिक दृष्टिकोनातून हा समाजशास्त्रीय चर्चेचा विषय ठरतो. आनुवंशिकशास्त्र किंवा जीवशास्त्र असे मानते की, व्यक्ती जन्माला येताना त्यांच्यात काही कौशल्ये किंवा जन्मजात प्रवृत्ती या आनुवंशिकतेने येतात. सहज वृत्ती किंवा उपजत वृत्ती या मानवी वर्तन ठरवण्यात महत्त्वाच्या असतात. या दृष्टिकोनानुसार माणूस काही उपजत प्रवृत्ती घेऊन जन्माला येतो असे मानले जाते. प्रत्यक्षात मात्र सामाजीकरणाची प्रक्रिया मानवी जीवनातील संगोपनाची भूमिका अधोरेखित करते. जीवनात व्यक्तीला येणाऱ्या विविध सामाजिक अनुभवांतून ती सामाजिक होत जाते. या प्रक्रियेला 'सामाजीकरण' असे म्हणतात.

**आनुवंशिकशास्त्र :** आनुवंशिकशास्त्र म्हणजे गुणसूत्रे व आनुवंशिकतेचा अभ्यास होय. पालकांकडून आपल्या मुलांकडे आनुवंशिकतेतून आलेल्या वर्तन पद्‌धतींचा अभ्यास आनुवंशिकशास्त्रामध्ये केला जातो.

### ६.१.२ व्याख्या

१) ***वॉलेस आणि वॉलेस :*** "व्यक्तीमध्ये समाजमान्य मूल्ये आणि वर्तन पद्‌धती रुजवण्याच्या आणि व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि स्वः चा विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेला सामाजीकरण असे म्हणतात."

२) ***हॉर्टन आणि हंट :*** "सामाजीकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्यात व्यक्ती समाजाच्या मापदंडानुसार स्वतःला घडवते. समाजाच्या परंपरा अंगीकारून सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेते."

३) ***हॉब्ज आणि ब्लॅंक :*** "एका जीवशास्त्रीय प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करणे म्हणजे सामाजीकरण होय."

वरील व्याख्यांवरून सामाजीकरण म्हणजे –

i. **एखाद्या संस्कृतीत सर्वमान्य असलेल्या वर्तन पद्धती शिकण्याची प्रक्रिया :** लहान मुलांना समाजातील जबाबदार घटक होण्यासाठी समाजातील भूमिका, मूल्ये, नियमने यांचे ज्ञान होणे आवश्यक असते. सामाजीकरणातून व्यक्ती आपल्या वडीलधाऱ्यांचे विचार, सांस्कृतिक मूल्ये आणि सामाजिक कार्यपद्धती अंगीकारते. यामुळे सामाजीकरण हे समाजातील विविध पिढ्यांना एकमेकांशी बांधून ठेवते.

ii. **जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत चालणारी प्रक्रिया आहे :** अपत्यजन्म हा पती–पत्नीसाठी एक खास अनुभव असतो. वृद्धांना आजी किंवा आजोबा या वेगळ्या नात्यातून पुढच्या पिढीशी जोडले जात असते.

iii. **व्यक्ती समाजाचा सदस्य बनते :** प्रत्येक समाजाची स्वतंत्र अशी जगण्याची एक सामुदायिक जीवनपद्धती, संस्कृती असते. ही सामुदायिक जीवनपद्धती शिकण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजीकरण होय.

समाजापासून दुरावलेल्या मुलांच्या काही घटनांमधून हे स्पष्ट होते की, सामाजीकरण ही एक शिकण्याची प्रक्रिया आहे.

तुमच्यापैकी अनेकांनी ज्याला कोल्ह्याने वाढवले त्या मोगलीची गोष्ट आनंद घेत ऐकली असेल किंवा १९२० मध्ये घडलेली सत्य घटनाही माहिती असेल. मिदनापूर मध्ये दोन लहान मुली कोल्ह्याच्या गुहेत सापडल्या. त्या कोल्ह्यांप्रमाणे ओरडत होत्या, कच्चे मांस खात होत्या, दोन पायांवर सरळ चालत नव्हत्या व अनेक मानवी कौशल्यांपासून अनभिज्ञ होत्या.

मूलभूत सामाजिक आणि शारीरिक विकासासाठी मानवी संपर्क आवश्यक असतो असे जेनीसारख्या घटना आणि गोष्टींमधून आपल्या लक्षात येते. उदा., सामान्य कौशल्ये जसे सरळ उभे राहणे, चालणे, भाषा वापरणे जे सर्वसामान्य मुलांकडून अपेक्षित असते. तेही जेनीला जमत नव्हते. अशा उदाहरणांमधून सामाजीकरणाचे महत्त्व स्पष्ट होते.

**हे तुम्हांला माहीत आहे का?**

एक जेनी नावाच्या मुलीचे उदाहरण आपल्याला सामाजीकरणाचे महत्त्व पटवून देते. १९७० मध्ये कॉलिफोर्निया मध्ये एक १३ वर्षाची असामाजिक परिस्थितीतील मुलगी आढळली. ती एका खोलीत बंद होती. पालकांनी जन्मापासून कोणाशीही तिचा संपर्क येऊ दिलेला नव्हता. ती कुपोषित, दुर्लक्षित, प्रेमाला भुकेली, खेळणी किंवा समवयस्कांपासून दूर अशा अवस्थेत होती. ती जेव्हा सापडली तेव्हा सरळ उभी पण राहू शकत नव्हती, बोलू शकत नव्हती ती फक्त रडू शकत होती.

विविध गोष्टी करण्याचे विविध मार्ग प्रत्येक संस्कृतीत विकसित होत असतात. त्यामुळे सामाजीकरणाचे महत्त्व अजूनच वाढते. जर मानवी वर्तन हे केवळ उपजत प्रवृत्तींवर आधारित असते तर विविध समाजांमधील मानवी वर्तनातील फरक खूप कमी प्रमाणात दिसला असता. तसेच वेगवेगळ्या ठिकाणांचे आणि वेगवेगळ्या काळांतले मानवी वर्तन साधारणपणे सारखेच दिसले असते. सांस्कृतिक भिन्नतेपेक्षाही मानवाची विचार प्रक्रिया आणि वर्तन हे व्यापक संस्कृतीवर अवलंबून असते. ती संस्कृती माणसाला वारशाने मिळत असते व ती तो जगत असतो. आजच्या बहुविध अशा समाजात सामाजीकरणाची प्रक्रिया समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण त्यातून हे स्पष्ट होते की, प्रत्येक व्यक्तीची जीवनपद्धती ही अनेक गोष्टींतून तिने स्वतः आत्मसात केलेली आहे.

## ६.२ सामाजीकरणाची प्रक्रिया

मानवी वर्तन आणि कौशल्ये ही शिकावी आणि शिकवावी लागतात. ही शिकण्याची प्रक्रिया जिला सामाजीकरण म्हटले जाते. ती व्यक्तीचा एक व्यक्तिगत स्व ते सामाजिक स्व हा प्रवास घडवून आणते. सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून व्यक्ती वर्तनाचे नियम शिकून समाजाची एक जबाबदार घटक बनते.



जॉर्ज हर्बट मीड

**जॉर्ज हर्बट मीड :** यांनी सामाजिक "स्व" बांधणीची प्रक्रिया सविस्तर स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, 'स्व' ची निर्मिती ही जन्मतः नसते. जन्मानंतर इतरांशी होणाऱ्या आंतरक्रिया आणि संपर्कातून 'स्व' ची निर्मिती होते व त्यातूनच एक सामाजिक मनुष्य निर्माण होतो.

मीडच्या मते 'स्व' ची निर्मिती ही तीन महत्त्वाच्या अवस्थांमधून होते.

**(१)अनुकरण :** या अवस्थेत मुले मोठ्यांच्या वर्तनाचे फक्त अनुकरण करत असतात. एखादे लहान मूल त्याच्या आईला त्याच्या खेळातल्या गाडीतून ऑफिसला सोडू शकते किंवा त्याच्या पालकांना हातात झाडू किंवा नुसती काठी घेऊन फरशी साफ करायला मदत करू शकते.

**(२)प्ले स्टेज :** काही वेळा लहान मुले खेळताना आई, बाबा, शिक्षक, पोस्टमन, पोलिस बनतात. या अवस्थेत प्रतिसाद निश्चित नसतात. लहान मूल त्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या भूमिकांमध्ये स्वतःला बसवून त्या समजावून घेण्याचा प्रयत्न करत असते. प्रथम मूल स्वतः व इतरांमध्ये फरक करू शकत नाही. पण जसजसे ते इतर व्यक्तींच्या संपर्कात येऊ लागते तसतसे त्याला स्वतःच्या 'मी' पणाची जाणीव होते. Significant Others ही संकल्पना मीड ने अशा इतर व्यक्तींसाठी वापरली ज्या 'स्व' च्या विकासात महत्त्वाच्या असतात. त्या व्यक्तीच्या विचारांवर प्रभाव पाडतात. त्यांची मते व्यक्तीसाठी महत्त्वाची असतात. अशा व्यक्ती म्हणजे पालक, भावंडे, मित्र किंवा शिक्षक यांच्यापैकी कोणीही असू शकते.

**(३)गेम स्टेज :** मूल जसे मोठे होत जाते व त्याचा 'स्व' विकसित होत जातो. तसे ते इतरांच्या अपेक्षांप्रमाणे वर्तन करायला शिकते. इतरांचा प्रभाव व विविध परिस्थिती जाणून ते वर्तन करू लागते. विविध हेतूंसाठी विविध व्यक्तींच्या आंतरक्रिया ते जाणून घेऊ लागते. प्रत्येक भूमिकेला प्रत्येक परिस्थितीत काही नियम अपेक्षा यानुसारच वर्तन करावे लागते हे त्यांना समजते. उदा., एखाद्या उपाहारगृहात सर्व कामे सुरळीत पार पाडण्यासाठी अनेकांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. हे त्याला समजू लागते. (कोणीतरी तुम्हांला बसवते, दुसरे कोणीतरी ऑर्डर घेते, कोणीतरी जेवण बनवते, कोणीतरी जेवणानंतर टेबल स्वच्छ करते.) त्यानंतर इतरांना अपेक्षित असलेली भूमिका स्वीकारण्याची क्षमता विकसित होऊ लागते. थोडक्यात इतरांसोबतच्या आपल्या प्रतिकात्मक आंतरक्रियांमधूनच 'स्व' ची निर्मिती होत असते.

या दृष्टीने स्व-जाणीव निर्माण होण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजीकरण होय. सामाजिक नियम आणि पद्धतीप्रमाणे वर्तन शिकण्याची प्रक्रिया होय. शेकोटीने हाताला चटका बसतो, तेव्हाचे आपले वर्तन लक्षात घ्या. वेदनेला दिला जाणारा प्रतिसाद ही सहज प्रवृत्ती असते. पण त्यानंतर होणारे वर्तन हे तुम्ही समाजात कोण आहात यावर ठरते. (स्त्री/

पुरुष, लहान/मोठे) किंवा कुठे आहात (घरात/बाहेर) यावर ठरते.

सामाजीकरण ही शिकण्याची प्रक्रिया असली आणि लहान वयात ती जास्त महत्त्वाची असली तरी ती संपूर्ण आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. लहान वयात होणाऱ्या शिक्षणाला प्राथमिक सामाजीकरण असे म्हणतात. मूल समाजातील मूल्ये, प्रमाणके, नियमने यांच्या संपर्कात येते. ही सर्व मूल्ये, नियमने, प्रमाणके, दृष्टिकोन शिकून समाजातील विविध समूहांचा सदस्य बनण्याची (कुटुंब, नातेवाईक, समवयस्क इ. त्यानंतर शाळा, व्यावसायिक गट) ही प्रक्रिया आयुष्यभर चालते. नंतर आयुष्यभर चालणाऱ्या प्रक्रियेला दुय्यम सामाजीकरण म्हटले जाते.

## ६.३ सामाजीकरणाची साधने/माध्यमे

लहान मूल हे वेगवेगळ्या सामाजिक समूहांत आणि आंतरक्रियांमध्ये सहभागी होऊन हळूहळू समाजाचा सदस्य बनते. अगदी नवजात अर्भकही या प्रक्रियेचा कुटुंबाचा एक भाग बनते. परंतु सामाजीकरणाचे कुटुंब हे एकमेव माध्यम नाही. विविध सामाजिक समूह आणि सामाजिक संदर्भ ही सामाजीकरणाची साधने असू शकतात.

### ६.३.१ कुटुंब :

प्राथमिक सामाजीकरण हे अगदी लहान वयात होते. या अवस्थेत कुटुंब हे सामाजीकरणाचे मुख्य साधन असते. यात मूल, भाषा आणि मूलभूत वर्तन पद्धती शिकते. मूलभूत मूल्ये, वर्तन पद्धती आणि भविष्यातील शिक्षणासाठी आवश्यक असणारे दृष्टिकोन कुटुंबात शिकायला मिळतात. कुटुंबात विविध भूमिका समजतात. काही जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांचे ज्ञान मुलाला पालक आणि इतर कुटुंबीयांकडून होते. हे प्रामुख्यांनी अनौपचारिक स्वरूपाचे शिक्षण असते. प्रामुख्याने ते सकारात्मक आणि नकारात्मक स्वरूपाचे असते. सकारात्मक आणि नकारात्मक मान्यता देऊन मान्य आणि अमान्य वर्तन पद्धती मुलांमध्ये रुजवल्या जातात. सकारात्मक मान्यतेमध्ये शारीरिक हावभाव (उदा., हसणे) शाब्दिक मान्यता (चांगला मुलगा/मुलगी), भौतिक पारितोषिक (वस्तुरूपी) आणि नकारात्मक मान्यतेमध्ये नकारात्मक प्रतिसादापासून ते शारीरिक शिक्षेपर्यंत विविध गोष्टींचा समावेश होतो. मान्य वर्तन पद्धती मुलांमध्ये विकसित करण्याचे महत्वाचे कार्य कुटुंब करत असते.

कुटुंबात होणारे सामाजीकरण हे खूप वेगवेगळ्या प्रकारे होत असते. कारण कुटूंबाचा एकच असा सार्वत्रिक प्रकार नसतो. संयुक्त कुटूंबात होणारे सामाजीकरण हे विभक्त कुटुंबांतील सामाजीकरणापेक्षा वेगळे असते. विभक्त कुटुंबांत फक्त पालक हे सामाजीकरणाचे हस्तक असतात, तर संयुक्त कुटुंबांत आजी-आजोबा, काका-काकू, भावंडे हेदेखील महत्त्वाची भूमिका बजावतात. काही मुले ही केवळ एक पालक असलेल्या कुटुंबांत वाढतात. तसेच विविध जाती, वर्ग आणि विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात सामाजीकरण वेगवेगळ्या पद्धतीने होत असते. विविध कुटुंबांतील सामाजीकरणाचा प्रभाव हा गरीब, वंचित कुटुंबांतील मूल आणि श्रीमंत, उच्चवर्णीय/जातीय कुटुंबांतील मूल यांच्याकडे बघून समजू शकते.

कुटुंबातील सामाजीकरण म्हणजे पालकांनी जे व जेवढे शिकवले आहे तेवढेच नाही तर मुले कधी कधी त्यालाही विरोध करू शकतात किंवा आपली वेगळी मते बनवू शकतात. आधुनिक समाजात जेव्हा विविध सामाजीकरणाची माध्यमे उपलब्ध असतात तेव्हा तर ही शक्यता खूपच वाढते.

### ६.३.२ समवयस्कांचा समूह

कुटुंबाप्रमाणेच समवयस्कांचा समूह हे देखील सामाजीकरणाचे माध्यम आहे. समवयस्कांचे समूह

म्हणजे साधारण समान वयाच्या मित्रमंडळींचे गट होत. (उदा., प्ले ग्रुप, किशोरवयीन मुलामुलींचे गट, ज्येष्ठ नागरिकांचे गट) हे गट सामाजीकरणासाठी महत्त्वाचे असतात. कारण समवयस्कांबरोबरच्या सामाजिक आंतरक्रियांचा खूप प्रभाव व्यक्तीच्या वर्तनावर पडतो. आपण कपडे कसे घालतो इथपासून ते आपल्याला काय आवडते आणि काय आवडत नाही इथपर्यंत. या गटात शाळा किंवा कुटुंबाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात समानतेचे तत्त्व आंतरक्रियांच्या बाबतीत दिसून येते.



**समवयस्कांचा समूह**

या गटातही अनौपचारिक स्वरूपाचे मान्यतेचे निकष असतात. एखाद्याचे दिसणे, पसंत करणे किंवा त्याने केलेल्या विनोदावर हसणे. एखाद्याला नापसंत करणे किंवा त्याचा सहवास नाकारणे असे होकारात्मक व नकारात्मक निकष दिसून येतात. भिन्न गटांत, विभिन्न परिस्थितीत समवयस्क गटातून वेगवेगळी मूल्ये शिकली जातात, परंतु मैत्रीसारखी सामाजिक मूल्ये मात्र आयुष्यभर सांभाळली जातात.

### ६.३.३ शाळा

शाळा व शिक्षण ही सामाजीकरणाची दुय्यम साधने आहेत. औपचारिक अभ्यासक्रम आणि विषय व कौशल्ये यांतून आपण शिकत असतो. रोजचा संपर्क असला तरीही इतर सदस्यांशी प्राथमिक स्वरूपाचे संबंध निर्माण होतीलच हे मात्र सांगता येत नाही. शालेय शिक्षणातून जी मूल्ये, नियमने शिकली जातात ती कुटूंबातील शिक्षणापेक्षा एक पायरी पुढची असतात. शाळेतून शिकल्या जाणाऱ्या मूल्य व भूमिकांची व्याप्ती अधिक असते. शाळेत ग्रेड, बक्षिसे, कौतुक, प्रोत्साहन देणे अशा सकारात्मक पद्धती व काही परिस्थितीत नकारात्मक पद्धतींचा अवलंब केला जातो. सांघिक भावना, स्पर्धात्मक गुण, शिस्त, अनुचलन या भावना रुजवून विद्यार्थ्याला पुढील जीवनासाठी तयार केले जाते.




**शाळा**

मुलांच्या शिक्षणावर परिणाम करणाऱ्या अप्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा विचारही समाजशास्त्रज्ञ करतात. अप्रत्यक्ष अभ्यासक्रम म्हणजे शाळेत जाण्याच्या दैनंदिन प्रक्रियेतून आपण अप्रत्यक्षरित्या जे शिकतो ते सर्वकाही. सत्ता व अधिकारापुढे नतमस्तक होण्यापासून एकूणच व्यवस्थेचा मान राखणे हे आपण शाळेत अप्रत्यक्षरित्या शिकतो. कोणतेही प्रश्न न विचारता आहे तसा व्यवस्थेचा स्वीकार करणे हे त्यातून सूचित केले जाते. उदा., जेव्हा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त काही उपक्रम घेतले जातात तेव्हा शाळा परिसर स्वच्छतेचे काम मुलांपेक्षा मुलींना दिले जाते. सध्याच्या काळात शाळांमध्ये अशा कामांत समानता आणण्याचे प्रयत्न होताना दिसतात.

### ६.३.४ प्रसार माध्यमे

आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे सामाजीकरणाचे माध्यम/साधन म्हणजे प्रसारमाध्यमे. प्रसारमाध्यमे हे आपल्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य भाग बनले आहे. एका वेळी खूप मोठ्या जनसमुदायासमोर तटस्थपणे एखादी गोष्ट मांडण्याचे

हे महत्त्वाचे साधन असते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडणारे संदेश, माहिती यांचे मोठ्या प्रमाणावर प्रसारण या माध्यमांद्वारे केले जाते. प्रसार माध्यमांमध्ये पारंपरिक छापील माध्यमे, उदा., वर्तमानपत्रे, मासिके इत्यादी तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमे, उदा. रेडिओ, दूरदर्शन, माहिती तंत्रज्ञानाने विकसित केलेली माध्यमे, समाज माध्यमे इत्यादी साधनांचा समावेश होतो. गेल्या काही दशकात एका विशिष्ट माध्यमातून लहान मुलांचे खूप वेगळ्या प्रकारे नाट्यमयरीतीने सामाजीकरण होत आहे, ते म्हणजे दूरदर्शन. काही अभ्यासांमधून असे स्पष्ट झाले आहे की, मुले शाळेपेक्षा जास्त वेळ दूरदर्शन बघण्यात घालवतात. दूरदर्शनचा प्रभाव मुलांवर खूप लहान वयापासून पडण्यास सुरुवात होते व त्याचा प्रभाव त्यांच्या बौद्धिक व सामाजिक विकासावर होतो.




प्रसार माध्यमे

सामाजीकरणाची साधने म्हणून प्रसारमाध्यमांच्या भूमिकेत आधुनिक तांत्रिक विकासाचा खूप परिणाम झाला आहे. तंत्रज्ञानातील बदलांमुळे प्रसारमाध्यमांचा विस्तार झाला आहे. प्रसारमाध्यमांच्या आणि सामाजिक माध्यमांच्या विविध प्रकारांमधून लोक त्यांचा खूप वेळ आभासी जगाच्या संपर्कात रहाण्यात घालवतात. पण त्याच वेळी कधी कधी कुटुंब, मित्र इत्यादी इतर सामाजीकरणाच्या साधनांपासून ते दुरावतात. दूरदर्शनवरील कार्यक्रम आणि सिनेमा हे आज व्यक्तीच्या जीवनावर मोठा प्रभाव पाडताना आपल्याला दिसतात, व्यक्ती दूरदर्शनवर काय बघतात, रेडिओवर काय ऐकतात आणि इंटरनेटवर (आंतरजाल) काय वाचतात, त्यावर अवलंबून असण्याचे त्यांचे प्रमाण आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाढले आहे. आज अधिकाधिक वेळ प्रसारमाध्यमांना दिला जातो व त्यातला कमाल वेळ हा करमणुकीसाठी वापरला जातो.

प्रसारमाध्यमांची झेप खूप मोठी असते व माहितीचे प्रसारण अधिक लोकशाही पद्धतीने करणे सहज शक्य असते. जी गावे रस्त्यांनी जोडलेली नाहीत अशा ठिकाणी electronic संपर्क होऊ शकतो. प्रसारमाध्यमांच्या अशा सुविधेमुळे माहितीचे प्रसारण, जनमत तयार करणे, मूल्य रुजवणे ही महत्त्वाची कार्ये पार पाडण्यात प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत; पण हिंसेच्या दृश्य प्रदर्शनातून लहान मुले व युवकांवर खूप गंभीर परिणामही होत आहे. यावर अजून संशोधन होण्याची गरज आहे. प्रसार माध्यमांचा विस्तार आणि त्यांचा आशय या गोष्टी सर्वात महत्त्वाच्या आहेत.

**हे बघूया!**

**वास्तवदर्शी कार्यक्रम (Reality shows) किती वास्तविक असतात?**

भारतीय दूरदर्शनवर 'रिॲलिटी शो' ची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यांच्या व्यापक परिणामांचा अभ्यास करणारे संशोधन अजूनही व्यापक स्वरूपात होत नाही. परंतु जे संशोधन झाले आहे त्यावरून हे स्पष्ट होते की, लहान मुलांवर या 'रिॲलिटी शो' चे खोल व दूरगामी परिणाम होत आहेत. हे कार्यक्रम 'दैवी गुणांचा शोध' घेतात. त्याचा आत्यंतिक परिणाम लहान मुले व पालकांवर होत असतो. 'बिग बॉस' सारखे कार्यक्रम किंवा 'रोडीज शो' सारख्या कार्यक्रमांमधून दादागिरी ही सामान्य आहे असे

दाखवले जाते. तसेच अत्यंत शिवराळ भाषाही वापरली जाते. प्रौढ प्रेक्षकांच्या लक्षात येते की, हे सर्व आधीपासूनच ठरलेले असते. पण मुलांची तेवढी परिपक्वता नसते. त्यामुळे खऱ्या आणि खोट्यातला फरक त्यांच्या लक्षात येत नाही व या कथित खऱ्याखोट्याची सरमिसळ होऊन त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होतो. काही वास्तव कार्यक्रमांमध्ये असेही दाखवले जाते की, हे स्पर्धक आपल्या जीवाची पर्वा न करता अत्यंत धोकादायक कृत्ये करत असतात. लहान मुले अनुकरणातून गोष्टी शिकत असतात. अनेकदा असे कार्यक्रम पाहून मुलेही धोकादायक कृत्ये करण्याचा प्रयत्न करतात. त्यातून त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

**उपक्रम – १**

'ब्ल्यू व्हेल' सारख्या online game च्या आव्हानांवर आणि त्यातल्या धोक्यांवर एक गटचर्चा आयोजित करा. मुले असे धोके पत्करायला का तयार होतात याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करा. यात पालकांचा दोष आहे का आणि कायद्याची भूमिका काय असावी याचाही विचार करा.

**उपक्रम – २**

दूरदर्शनवरच्या जाहिराती किंवा संदेश बघा आणि भ्रष्टाचार, मादक द्रव्यांचे सेवन, धुम्रपान व इतर महत्त्वाच्या प्रश्नांबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यात हे माध्यम किती प्रभावी ठरते आहे याचा विचार करा.

### ६.३.५ शेजारी

शेजाऱ्यांबरोबरचा संपर्क हे सामाजीकरणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. गाव, शहर किंवा उपनगरात भौगोलिकदृष्ट्या एकत्र रहाणारा समुदाय म्हणजे 'शेजारी' होय. एक सामाजिक समुदाय म्हणून शेजाऱ्यांच्यात समोरासमोरचे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होतात. कुटुंबापेक्षा मोठे असे ते स्थानिक, सामाजिक एकक असतात. या मोठ्या समुदायाचा कुटुंब हा एक भाग बनते. लहान मुले कुटुंबियांप्रमाणेच शेजाऱ्यांमध्ये रममाण होतात. शेजाऱ्यांमुळे कुटुंब या छोट्या घटकाच्या मर्यादेत न रहाता मुले मोठ्या प्रमाणावर संपर्क साधू लागतात. विस्तारीत सामाजिक संबंध निर्माण होऊ लागतात. फक्त स्वतःच्या पालकांऐवजी शेजारपाजारील इतर प्रौढ व्यक्तींचा प्रभावही लहान मुलांवर पडत असतो व त्यातून त्यांचे वर्तन, व्यक्तिमत्त्व आकार घेत असते. हे संबंध सांस्कृतिक समारंभ, खेळाच्या स्पर्धा, काही सामाजिक प्रश्न उदा., वाहतूक, पर्यावरण यातून निर्माण होत असतात व त्यातून लहान मुले खूप काही शिकत असतात.



**शेजारी**

### ६.३.६ कामाची जागा

सामाजीकरण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. प्रौढांचे सामाजीकरण या संकल्पनेतून ही प्रक्रिया स्पष्ट होते. प्रौढांच्या सामाजीकरणाचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे कामाची जागा होय. प्रौढ व्यक्ती आपल्या जीवनातील जास्तीत जास्त काळ या ठिकाणी व्यतीत करत असते. हे सामाजीकरण म्हणजे व्यक्ती नवीन कौशल्ये, ज्ञान आणि कामाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या वर्तन पद्धती सतत आत्मसात करत असते. विविध व्यक्तींच्या संपर्कातून, प्रशिक्षणातून, उद्बोधन आणि औपचारीक संपर्कातून व्यक्ती नवीन भूमिका

शिकत असते. कामाच्या ठिकाणी व्यक्ती वेगवेगळ्या वयोगटांतील व वेगवेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींना भेटत असते. कामाच्या ठिकाणच्या आंतरक्रिया व्यक्तीला विविध क्षेत्रांतील ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यास मदत करीत असतात. चूक किंवा बरोबर या विषयीची परिमाणे बदलायला मदत करीत असतात. स्व आणि इतर यांच्यातील फरक लक्षात आणून देत असतात.

## ६.४ पुनर्सामाजीकरण

सामाजीकरण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे माणूस सतत नवीन गोष्टी शिकू शकतो. ज्ञान, कौशल्ये आणि मूल्यांच्या संदर्भात आधुनिक जग हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे. या सर्वांशी जुळवून घेण्यासाठी माणसाला जशा नवीन गोष्टी सतत शिकत रहाव्या लागतात त्याप्रमाणेच काही गोष्टी सोडून द्याव्या किंवा विसरायलाही लागतात. जुनी मूल्ये, भूमिका, वर्तन पध्दती आणि नियमने काही वेळा सोडून देण्याच्या किंवा त्याग करण्याच्या प्रक्रियेलाच 'पुनर्सामाजीकरण' असे म्हणतात.

काही वेळेला मनुष्य अशा परिस्थितीत सापडतो की त्याला जुनी जीवनपद्धती, अनुभव यापासून फारकत घेऊन नवीन पूर्णतः वेगळी जीवनपद्धती स्वीकारावी लागते. आधीची विचारपद्धती, जीवनपद्धती पूर्णतः विसरावी लागते. नवीन जीवनपद्धती ही फक्त वेगळी नसते तर आधीच्या जीवनाशी विसंगत असते. त्यामुळे व्यक्तीला सामाजिक मूल्ये, श्रद्धा, विश्वास, नियमने यांच्याबाबत खूप जागरूक रहावे लागते. पुनर्सामाजीकरणाचा पाया म्हणजे आधी शिकलेले विसरणे आणि नवीन शिकणे.

पुनर्सामाजीकरणाच्या प्रक्रियेत पुनर्सामाजीकरण करणाऱ्या सामाजिक संस्थेची मूल्ये, दृष्टिकोन, कौशल्ये व्यक्तीला नव्याने शिकवली जातात व त्या नियमांप्रमाणे व्यक्तीला या सर्व गोष्टी त्या प्रमाणात शिकाव्या लागतात. आत्मसात कराव्या लागतात. तुरुंगवास हे पुनर्सामाजीकरणाचे समर्पक उदाहरण आहे. कैदी व्यक्तीला स्वतःचे पुनर्वसन करून समाजात पुन्हा परतायचे असतेच पण तुरूंगवासात व्यक्तीला तुरुंगातील नियमांप्रमाणे नवीन जीवन स्वीकारावे लागते. त्यासाठी स्वतःच्या वर्तनात बदल घडवून आणावे लागतात. पुनर्सामाजीकरणाची तीव्रता ते कोणत्या संस्थेत होत आहे यावर अवलंबून असते. उदा., व्यक्ती जेव्हा संपूर्ण वेगळे व्यावसायिक जीवन स्वीकारते तेव्हाचे पुनर्सामाजीकरण हे सोपे असते परंतु कैद्याचे तुरुंगातील पुनर्सामाजीकरण कठीण असते. याला संस्थात्मक/ संस्थागत पुनर्सामाजीकरण म्हणतात.



तुरुंग

**अर्व्हिंग गॉफमन** यांनी संस्थात्मक ही संज्ञा प्रथम वापरात आणली. जी पुनर्सामाजीकरणाशी संबंधित आहे. या प्रक्रियेत व्यक्तीला संपूर्ण समाजापासून दूर/ अलिप्त ठेवले जाते. येथे समाजापासून दूर, कायद्यांच्या कठोर बंधनात, बंदिस्त भिंतींमध्ये व्यक्तीला ठेवले जाते. उदा. तुरुंग, मानसिक आरोग्य सुविधा. या संस्थांचा मूलभूत हेतू हा व्यक्तीचे नवीन भूमिकेसाठी पूर्णतः पुनर्सामाजीकरण करणे हा असतो. अशा ठिकाणचे पुनर्सामाजीकरण हे अत्यंत तीव्र व कठीण असते. व्यक्तीची आधीची ओळख पूर्णपणे पुसून टाकून त्या संस्थेच्या नियमांच्या चौकटीत बसणारी पूर्णपणे नवीन भूमिका त्या व्यक्तीला स्वीकारावी लागते. आपले पूर्वीचे आयुष्य, वापरातल्या वस्तू उदा., कपडे, इतर वापरातल्या गोष्टी, ऐषोआराम हे सर्व सोडून चार भिंतींच्या आतले, जीवन स्वीकारावे लागते. त्यासाठी अत्यंत प्रखर इच्छाशक्ती आणि निर्धाराची आवश्यकता असते.

थोडक्यात पुनर्सामाजीकरण म्हणजे अत्यंत खडतर मार्गावरून स्वतःच्या भूमिकेची पुर्नउभारणी करणे व सामाजिक 'स्व' ची जाणीव निर्माण होण्याची प्रक्रिया होय. बहुतेक वेळा ही एक हेतुपूर्वक आणि तीव्र स्वरूपाच्या बदलाची प्रक्रिया असते. जर एखादी गोष्ट शिकून आत्मसात करता येते तर तीच गोष्ट प्रयत्न करून विसरताही येऊ शकते याच तत्त्वाला अनुसरून पुनर्सामाजीकरणाची प्रक्रिया शक्य असते.

**उपक्रम – ३**

पुनर्सामाजीकरणासाठी 'Total Institution' ची गरज असते का? असेल तर का? आणि नसेल तर का नाही यावर गटचर्चा आयोजित करा.

सामाजीकरणाच्या निरंतर चालणाऱ्या प्रक्रियेतून मानव प्राणी सुसंस्कृत, समाजशील कसा बनतो ते या पाठातून तुम्ही शिकलात. कुटुंब, शिक्षण, मित्र परिवार, प्रसारमाध्यमे यांचा आपल्या जीवनावर किती प्रभाव असतो ते आपण पाहिले. वेगवेगळ्या वातावरणाशी जुळवून घेताना आपल्याला पुनर्सामाजीकरणाचीही सतत गरज असते हे देखील तुम्हांला समजले असेल आणि आपण तसे केले नाही तर त्याचे काय परिणाम भोगावे लागतील याचीही जाणीव तुम्हाला नक्कीच होईल.

## सारांश

- सामाजीकरण ही एक प्रक्रिया असून त्यात व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसित होऊन ती समाजाची कार्यरत सदस्य बनते.
- मानवी वर्तनपद्धती शिकणे ही निरंतर प्रक्रिया असून सामाजीकरणातून आपण वर्तनाचे नियम शिकून सामाजिक समूहाचे कार्यरत सदस्य होतो.
- एका व्यक्तिगत 'स्व' ला सामाजिक ओळख देण्यासाठी सामाजिक आंतरक्रियांची गरज असते.
- समाजाच्या ज्या विविध समूहांमध्ये आणि सामाजिक संबंधांमध्ये सहभागी होऊन व्यक्ती समाजाची सदस्य बनते त्यांनाच सामाजीकरणाची साधने/माध्यमे असे म्हणतात.
- अगदी नवजात अर्भकाच्या सामाजीकरणाची प्रक्रिया जरी कुटुंबात सुरू होत असली तरी कुटुंब हे सामाजीकरणाचे एकमेव साधन नव्हे. विविध सामाजिक समूह आणि संस्थांना सामाजीकरणाची साधने मानले जाते. उदा.शाळा, समवयस्कांचा गट, प्रसारमाध्यमे आणि शेजार.
- कधी कधी व्यक्तीला नवीन गोष्टी शिकून व जुने सोडून देऊन नवीन परिस्थितीशी आणि पर्यावरणाशी जुळवून घ्यावे लागते. ही जुनी मूल्ये, वर्तनपद्धती, नियमने, भूमिका सोडून देऊन नवीन आत्मसात करण्याच्या प्रक्रियेला पुनर्सामाजीकरण असे म्हणतात.

## स्वाध्याय

**प्र.१(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ज्या प्रक्रियेतून व्यक्ती समाजातील नियमने शिकते तिला ............ म्हणतात.
(संमीलन, सामाजीकरण, सहकार्यता)

२. कुटुंब सामाजीकरणाचे ............ साधन आहे.
(प्राथमिक, दुय्यम, प्रादेशिक)

३. शाळा हे सामाजीकरणाचे .......... साधन आहे.
(प्राथमिक, दुय्यम, प्रादेशिक)

४. दूरचित्रवाणी हे ........ संपर्काचे माध्यम आहे.
(श्राव्य, दृक्, दृक्-श्राव्य)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) भाषा, मूलभूत वर्तन - कुटुंब
(ii) समवयस्कांचा समूह मैत्रीसारखी सामाजिक मूल्ये
(iii) शेजारी - संघभावना, शिस्त
(iv) प्रसार माध्यमे - जनमत तयार करणे

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| इंटरनेट, समवयस्कांचा समूह/गट, बाल्यावस्थेतील सामाजीकरण |

१. जीवनाच्या प्रारंभिक अवस्थेत घडून येते.
२. आजच्या काळातील जागतिक प्रभाव

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. रेडिओ हे संप्रेषणाचे दृक-श्राव्य माध्यम आहे.
२. समवयस्कांचे समूह हे सत्तावादी साधन आहे.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. कुटुंबातील सामाजीकरण
२. पुनर्सामाजीकरण

**(ब) टीपा लिहा.**

१. मीडच्या मते 'स्व'ची निर्मिती
२. सामाजीकरणाची साधने
३. पुनर्सामाजीकरण


**प्र.३ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. प्राथमिक सामाजीकरण
२. दुय्यम सामाजीकरण

**प्र.४ खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. सामाजीकरण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे.
२. जाहिरातींचा ग्राहकांच्या वर्तनावर परिणाम होतो.

**प्र.५ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**(ब) आपले मत नोंदवा.**

१. 'ब्रेकींग न्यूज' मुळे भीती/धास्ती पसरविणारी प्रतिक्रिया निर्माण होते. हे असे का घडते? यासंबंधी समर्पक उदाहरण देऊन स्पष्ट करा.
२. जरी त्यांच्या घरी ती भाषा वापरली जात नसली तरी अस्वीकारार्ह भाषेचा बालकांकडून अनेकदा वापर केला जातो, हे कशामुळे घडत असावे? स्पष्ट करा.

**प्र.६ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५० शब्द)**

१. तुम्ही इंटरनेटच्या युगातील पिढीचे प्रतिनिधित्व करत आहात. इंटरनेटमुळे होणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक परिणामाबद्दल चर्चा करा.

**उपक्रम**

तुमच्या वर्गातील किंवा तुमच्या कोणत्याही ५ समवयस्कांच्या मुलाखती घेऊन ते सर्वसाधारणतः फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट यासारख्या सामाजिक माध्यमांवर दिवसातला किती वेळ घालवतात, कोणत्या गोष्टी शिकतात, कोणत्या विषयांवर चर्चा करतात, त्याचा त्यांच्यावर काय परिणाम होतो हे शोधा. त्यावर १०० ते १५० शब्दांत अहवाल तयार करा.

***

# ७. सामाजिक स्तरीकरण

७.१ सामाजिक स्तरीकरण : व्याख्या आणि मूलभूत वैशिष्ट्ये
७.२ सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार
७.३ सामाजिक गतिशीलता

## प्रस्तावना

आपल्या सभोवतालच्या समाजामध्ये विभिन्नता असलेली दिसून येते. त्यामुळेच समाज हा वेगवेगळ्या स्तरांमध्ये किंवा वर्गांमध्ये विभागलेला दिसून येतो. बहुतांशी समाजामध्ये सामाजिक विभाजन आणि सामाजिक स्तरीकरण दिसून येते. प्रत्येक ठिकाणी समाज हा वेगवेगळ्या स्तरांत विभागला गेलेला दिसतो. परंपरागत चालत आलेल्या स्तरीकरणाच्या उतरंडीनुसार व्यक्ती किंवा वर्गाला उच्च किंवा कनिष्ठ स्थान मिळते यालाच 'स्तरीकरण' असे म्हणतात. समाजातील वर्गांमध्ये दिसून येणारी रचनात्मक असमानता ही सामाजिक स्तरीकरण दर्शवते. यालाच आपण समाजातील विविध वर्गांमधील रचनात्मक असमानता असेही म्हणू शकतो.

समाज व्यवस्थेमध्ये व्यक्तीला त्याच्या उतरंडीनुसार स्थान प्राप्त होते. या संकल्पनेला समाजशास्त्रज्ञ 'सामाजिक स्तरीकरण' असे म्हणतात.



सामाजिक विषमता

सामाजिक विभेदीकरण किंवा विभाजन आणि सामाजिक स्तरीकरण यांतील फरक जाणून घेणे महत्वाचे आहे. सामाजिक विभेदीकरण ही संज्ञा समाजामधील समांतर (horizontal) स्तरात असणाऱ्या वर्गाची विभागणी दर्शवते तर सामाजिक स्तरीकरण हे समाजातील ऊर्ध्व पद्धतीचे (vertical) विभाजन दर्शवते. स्तरीकरणाच्या व्यवस्थेमध्ये स्तरांची उच्च श्रेणी किंवा कनिष्ठ श्रेणी याप्रमाणे मांडणी केलेली दिसून येते.

सामाजिक विषमता ही संज्ञा सामाजीकरित्या निर्माण केलेल्या असमानतेविषयी वापरण्यात येते. सामाजिक स्तरीकरण हे सामाजिक विषमतेचा विशिष्ट भाग आहे. यामधून आपणांस समाजातील विशिष्ट वर्ग हे एकमेकांच्या अनुषंगाने कसे रचले गेले आहेत हे दिसून येते.

## ७.१ सामाजिक स्तरीकरण : व्याख्या आणि मूलभूत वैशिष्ट्ये

### ७.१.१ व्याख्या

१. ***ऑक्सफर्ड डिक्शनरी :*** "सामाजिक स्थान किंवा वर्ग यावर आधारित असणारी समाजाची विभागणी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय."

२. ***पास्कल गिसबर्ट :*** "श्रेष्ठ, कनिष्ठतेच्या तत्त्वावर समाजाची कायमस्वरूपी गटात केलेली विभागणी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय."

३. ***हॅरी जॉन्सन :*** "सामाजिक स्तरीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये विविध व्यक्तींना आणि समूहांना भिन्न-भिन्न स्तरांत श्रेणीबद्ध केले जाते. त्यामुळे एका स्तरामध्ये असणाऱ्या व्यक्ती किंवा समूह समान श्रेणी प्राप्त करतात."

### ७.१.२ सामाजिक स्तरीकरणाची मूलभूत वैशिष्ट्ये

१. **स्तरीकरण सामाजिक स्वरूपाचे असते :** सामाजिक स्तरीकरण हे व्यक्ती-व्यक्तींतील भिन्नतेचे स्वरूप नसून समाजाचे एक वैशिष्ट्य आहे. थोडक्यात, स्तरीकरण हे शारिरीक योग्यतेनुसार ठरवले जात नसून सामाजिक नीतीनियम, रीती किंवा परंपरेनुसार ठरवले जाते. याचबरोबर स्तरीकरण राजकीय, आर्थिक, धार्मिक अशा इतर संस्थांवरही अवलंबून असते.

२. **पिढ्यान्‌पिढ्या टिकून राहते :** सर्वच समाजामध्ये पालकांचा असलेला सामाजिक दर्जाच मुलांना प्राप्त होतो. अशाप्रकारे विषमतेची ही रचना पिढ्यानपिढ्या चालूच राहते.

३. **सार्वत्रिक परंतु बदलणारे असते:** आपणांस सर्वत्रच सामाजिक स्तरीकरण पहायला मिळते. याचबरोबर सामाजिक विषमतेच्या स्वरूपामध्ये वैविध्य दिसून येते. विषमता ही 'कोणत्या बाबतीत' आणि 'कशा स्वरूपाची' आहे हे समाजानुसार बदलत जाते.

४. **विषमता अंतर्भूत असते :** कोणतीही स्तरीकरणाची व्यवस्था ही काही ठरावीक व्यक्तींना जास्तीत-जास्त संधी उपलब्ध करून देते आणि त्याचे फक्त समर्थनच नाही तर हे कसे योग्य आहे याचा पाठपुरावा करते. समाजानुसार विषमतेचे स्वरूप व विश्लेषण बदलत जाते.

५. **व्यक्तींवर परिणाम होतो :** स्तरीकरण हे व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाच्या पैलूंवर परिणाम करते. समाजामध्ये असणाऱ्या उतरंडीमुळे व्यक्तीच्या समाजजीवनावर परिणाम होतो. समाजामध्ये असणाऱ्या विशिष्ट उतरंडीमुळे काही व्यक्तींना याचा चांगला अनुभव येतो तर काहींना वाईट अनुभव येतो. याचा परिणाम जीवनातील संधी आणि जीवनशैली या दोन गोष्टींवर झालेला दिसतो.

### ७.२ सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार

सामाजिक स्तरीकरणाचे दोन प्रकार असतात.

**(i) बंदिस्त स्तरीकरण :** ज्यामध्ये व्यक्ती किंवा समूहाला आपला सामाजिक स्तर बदलण्याचे स्वातंत्र्य नसते अशा स्तरीकरणाला बंदिस्त स्तरीकरण असे म्हणतात. जन्माने प्राप्त होणारा सामाजिक स्तर आयुष्यभर टिकून राहतो. म्हणजेच या व्यवस्थेत सामाजिक गतिशीलतेला वाव नसतो. व्यक्ती किंवा समूहाला एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाता येत नाही. भारतातील वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था हे बंदिस्त स्तरीकरणाचे उदाहरण आहे.

**(ii) मुक्त स्तरीकरण :** जेव्हा व्यक्ती किंवा समूहाला आपला सामाजिक स्तर बदलण्याचे स्वातंत्र्य असते त्याला मुक्त स्तरीकरण म्हणतात. म्हणजेच या प्रकारात सामाजिक गतिशीलतेला वाव असतो. व्यक्ती किंवा समूह एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाऊ शकते. आधुनिक औद्योगिक समाजातील वर्ग व्यवस्था (उदा., उच्च वर्ग, मध्यम वर्ग व कनिष्ठ वर्ग) हे मुक्त स्तरीकरणाचे उदाहरण आहे. उदाहरणार्थ, मुक्त स्तरीकरणाचे निकष प्रामुख्याने सत्ता, संपत्ती, बुद्‌धिमत्ता, कौशल्ये इत्यादी आहेत.

यापुढे आपण बंदिस्त आणि मुक्त स्तरीकरणाचे प्रकार म्हणून जातीव्यवस्था व वर्गव्यवस्थेचा विचार करणार आहोत.

### ७.२.१ जाती व्यवस्था

पारंपरिक भारतीय समाजामध्ये सामाजिक प्राधान्य क्रमानुसार वेगवेगळ्या जातीच्या उतरंडीची रचना दिसून येते. जातीव्यवस्थेमध्ये "पवित्र आणि अपवित्र" या संकल्पनेशी जातीचे असलेले स्थान

निगडित असते. व्यक्तीचे स्थान हे त्याच्या जन्मासोबतच या जातव्यवस्थेमध्ये जोडले जाते. म्हणून जात हे बंदिस्त सामाजिक स्तरीकरणाचे उदाहरण आहे. हे विशेषतः भारतीय उपखंडाचे वैशिष्ट्य आहे. 'Caste' हा शब्द 'casta' या मूळ स्पॅनिश शब्दापासून तयार झाला आहे. याचा अर्थ वंश किंवा वर्ण असा होतो. भारतात ज्यांना पूर्वापार 'जाती' असे संबोधले जात होते त्यांना पोर्तुगीजांनी सर्वप्रथम 'जात' (caste) असा शब्द वापरला.

जात हे स्तरीकरणातील बंदिस्त व्यवस्थेचे उदाहरण आहे. जातीव्यवस्था ही समकालीन समाजामध्ये बदलताना दिसत आहे. जाती व्यवस्थेच्या काही व्याख्या आणि वैशिष्ट्ये खाली दिलेल्या आहेत.

## व्याख्या

१. ***एच्. एच्. रिसले :*** "जात हा समान व वंशपरंपरागत चालत आलेले नाव धारण करणाऱ्या, वंशपरंपरागत चालत आलेला व्यवसाय व उद्योगधंदा करणाऱ्या कुटुंबाचा एकजिनसी समूह होय."

२. ***जॉर्ज ल्युंडबर्ग :*** "जात हा एक असा न बदलणारा वर्ग आहे ज्यामध्ये व्यक्ती जन्म घेतात आणि यातून बाहेर पडण्यासाठी त्यांना अतिशय खडतर परिस्थितीस सामोरे जावे लागते."

३. ***एस्. व्ही. केतकर :*** "जात हा असा गट आहे ज्याची दोन वैशिष्ट्ये सांगता येतील. (१) जात ही ज्या व्यक्ती या समूहात आहेत व ज्या जन्म घेणार आहेत त्यांच्यापुरतीच मर्यादित असते. (२) सामाजिक नियमानुसार या समूहाचे सदस्यत्व कोणत्याही बाहेरील व्यक्तीस देण्यासाठी संपूर्ण मनाई असते."

विख्यात समाजशास्त्रज्ञ आणि प्राच्यविद्या शास्त्रज्ञ जी.एस्.घुर्ये यांनी जातीच्या खालील नमूद केलेल्या मूलभूत वैशिष्ट्यांच्या आधारे जातीव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे.

## जातीची वैशिष्ट्ये

१. **समाजाचे खंडात्मक विभाजन :** समाजाची विभागणी वेगवेगळ्या जातींमध्ये झालेली आहे. जातीचे सदस्यत्व हे जन्मानेच प्राप्त होते. जात ही वंशपरंपरेने मिळते आणि त्यामुळे व्यक्तीचे स्थान हे जातीवर अवलंबून असते. व्यक्तीचा समाजातील दर्जा हा त्याने किती संपत्ती कमावली आहे यावर अवलंबून नसून ती व्यक्ती ज्या जातीत जन्मली आहे त्या जातीच्या दर्जावरून ठरते. व्यक्तीच्या व्यवसायावरून नव्हे तर त्याच्या जन्मावरून समाजातील त्याचे स्थान निश्चित होते. प्रत्येक जात म्हणजे एक विकसित सामाजिक समूह आहे. जातीचे सदस्यत्व जन्माने प्राप्त होते, त्यामुळे एका जातीतून दुसऱ्या जातीमध्ये गतिशीलता अशक्य आहे. प्रत्येक जातीचे स्वतःचे स्वतंत्र सामाजिक स्थान, व्यवसाय, नीतिमूल्य, नियमने आणि कायदे आहेत.

२. **श्रेणीरचना :** जातींची मांडणी श्रेणीबद्ध स्वरूपाची आहे. प्रा. घुर्ये यांच्या मतानुसार "पवित्र आणि अपवित्र" या संकल्पनेच्या आधारावर जातींची मांडणी झालेली दिसते. या व्यवस्थेत प्रत्येक जात ही दुसऱ्या जातीच्या अनुषंगाने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ स्थान धारण करत असते. ही श्रेणीरचना विभिन्न प्रदेशांनुसार बदलत जाते.

३. **खानपान आणि सामाजिक व्यवहारांवर निर्बंध :** वरील दोन वैशिष्ट्यांवरून दोन जातींमध्ये सामाजिक अंतर कसे पडते हे दिसून येते. पवित्रतेच्या व अपवित्रतेच्या

धारणांमुळे हे अंतर अधिक दृढ होण्यास मदत होते. प्रत्येक जात ही जातीतील प्रत्येक सदस्यावर खान-पान आणि सामाजिक व्यवहार या बाबतीत निर्बंध लादत असते.

४. **वेगवेगळे नागरी आणि धार्मिक हक्क व निर्बंध :** व्यक्तीव्यक्तींमध्ये श्रेष्ठत्व व कनिष्ठत्वाचे वर्गीकरण असमान पातळीवर झालेले दिसते. ज्यामध्ये उच्च जातीय लोक हे सर्व सत्तेचा किंवा सुविधांचा उपभोग घेतात, तर कनिष्ठ जातीतील लोक हे सत्ताहीन, वंचित व कष्टप्रद जीवन जगताना दिसतात.

५. **व्यवसाय निवडीवरील निर्बंध :** जाती व्यवस्थेमध्ये व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नसते. प्रत्येक जात किंवा उपजातींचा समूह हा विशिष्ट पारंपरिक व्यवसायाशी निगडित असतो. व्यवसाय हा वंशपरंपरागत असतो आणि जातीतील प्रत्येक व्यक्तीने त्याचा परंपरागत व्यवसायच केला पाहिजे अशी सक्ती असते.

६. **आंतर्विवाही समूह :** जाती या विविध उपजातींमध्ये विभाजित झाल्या आहेत. प्रत्येक उपजातीचे जाती अंतर्गत विवाहाचे गट पडलेले दिसून येतात. काही विचारवंतांच्या मते, जातीअंतर्गत विवाह हा जातीव्यवस्थेचा महत्त्वाचा पैलू आहे. प्रत्येक जात किंवा उपजात ही आपल्या सदस्यांवर स्वजातीय विवाह करण्यासाठी आग्रही असते.


**उपक्रम - १**

'फँड्री' हा सिनेमा पाहून त्याचे थोडक्यात विश्लेषण करा व जात व्यवस्था ही सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये कशी अडथळे निर्माण करते ते लिहा.

**उपक्रम - २**

सद्यस्थितीत जातीची वैशिष्ट्ये कमी अधिक प्रमाणात परिवर्तित होताना दिसतात. त्यातील कोणती वैशिष्ट्ये बदलत आहेत आणि कोणती नाहीत, यावर गटचर्चा करा.

## ७.२.२ वर्ग




सामाजिक वर्ग हा समान सामाजिक दर्जा धारण करणाऱ्या व्यक्तींचा मिळून बनलेला असतो. प्रत्येक वर्गाची स्वतःची अशी विशिष्ट मूल्ये, विचार, मान्यता आणि राहणीमान असते व ते इतर वर्गांपेक्षा भिन्न असते. सामाजिक वर्ग हा मूलतः दर्जावर आधारित वर्ग असतो. वर्ग हा सामाजिक दर्जाशी संबंधित असतो. वर्ग व्यवस्थेमध्ये दर्जा हा स्वसंपादित असतो, तो जन्मजात मिळालेला नसतो. वर्ग हा एक सार्वत्रिक घटक आहे असे म्हणता येईल. प्रत्येक सामाजिक वर्गाचा स्वतःचा असा एक दर्जा किंवा स्थान आहे. हा दर्जा किंवा स्थान हे प्रतिष्ठेशी जोडलेले दिसून येते. सामाजिक रचनेतील व्यवस्थेनुसार समाजातील स्थान हे सामाजिक दर्जाशी संबंधित प्रतिष्ठेनुसार उंचावत जाते. सामाजिक वर्ग हा सामान्यतः स्थिर वर्ग किंवा समूह आहे. याला अनेकदा विशिष्ट वर्गाच्या राहणीमानाचा किंवा जीवनशैलीचा संदर्भ दिला जातो. यामध्ये वेशभूषा, राहणीमान, मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक साधने यांचा समावेश होतो. एखाद्या वर्गाची पसंती, आवडनिवड, मूल्ये यांच्या विशेषत्वावरून त्यांची

जीवनशैली दिसते. सामाजिक वर्ग हे खुले समूह असतात. ते खुली सामाजिक व्यवस्था दर्शवतात. खुली वर्गव्यवस्था ही अशी व्यवस्था आहे ज्यामध्ये तळापासून ते उर्ध्व दिशेने गतिशीलता शक्य आहे. सामाजिक वर्गाचा पाया हा मुख्यतः आर्थिक दर्जावर आधारित असतो. परंतु वर्ग म्हणजे फक्त आर्थिक समूह नाहीत.

**तुम्ही पाहिले आहे का?**

बी.के.स्टॅलीन यांची 'India Untouched' ही डॉक्युमेंटरी पहा आणि भारतातील बदलणाऱ्या जाती व्यवस्थेवर गटचर्चा करा.

**व्याख्या**

१. ***ऑगबर्न व निमकॉफ :*** "व्यक्तींच्या समूहाचे एक, दोन किंवा अधिक असे विस्तृत समूह असतात जे समूहातील सदस्यांना सामाजिकदृष्ट्या श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा दर्जा देतात, त्यास सामाजिक वर्ग म्हणतात."

२. ***मॅक्स वेबर :*** "वर्ग हा अशा एकत्रित व्यक्तींचा समूह आहे ज्यांना वस्तू व भौतिक साधने तसेच राहणीमानाचा समान दर्जा प्राप्त करण्यासाठी समान संधी उपलब्ध होतात."

३. ***मॉरिस गिन्सबर्ग :*** "वर्ग हा अशा व्यक्तींचा समूह आहे. जे समान कुळ, व्यावसायिक समानता, संपत्ती आणि शिक्षण यांद्वारे समान जीवनशैली, समविचार, भावना, भूमिका आणि वागण्याच्या समान पद्धती प्रस्थापित करतात."

म्हणजेच ज्यांचे स्थान किंवा पत समान आहेत अशा व्यक्तींचा एकत्रित समूह म्हणजे सामाजिक वर्ग होय. अशा समूहाला त्यांच्या आर्थिक व्यवस्थेतील स्थान, सत्ता आणि विशिष्ट जीवनशैली यांवरून ओळखले जाते. वर्गातील विविधता ओळखण्यासाठी संपत्ती आणि व्यवसाय हे महत्त्वाचे घटक आहेत.



**पिअरे बोर्द्यु**

पिअरे बोर्द्यू यांनी समाजातील उतरंड टिकवून ठेवण्यामध्ये भांडवलाचे चार प्रकार कशी महत्त्वाची भूमिका बजावतात ते स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, उच्च वर्गाचे समाजातील स्थान टिकवून ठेवण्यासाठी संपत्ती आणि आर्थिक भांडवलाबरोबरच सामाजिक, प्रतिकात्मक आणि सांस्कृतिक भांडवलही तितकेच महत्त्वाचे आहे.

| भांडवलाचे प्रकार | व्याख्या आणि वैशिष्ट्ये | कसे ओळखाल? |
|---|---|---|
| आर्थिक भांडवल | संपत्तीवरील मालकी हक्क | संपत्ती, मिळकत, मालमत्ता |
| सामाजिक भांडवल | सामाजिक गोष्टींमध्ये असणारे सभासदत्व आणि सहभाग | उत्तम समाज संपर्क व ओळखी |
| सांस्कृतिक भांडवल | कुटुंब आणि शिक्षणातून प्राप्त होते | शैक्षणिक प्राबल्य, कला आणि संस्कृतीचे ज्ञान |
| प्रतीकात्मक भांडवल | प्रतिष्ठा, दर्जा आणि सामाजिक सन्मान | नावलौकिक आणि आदर |

परंतु शिक्षण, वंशपरंपरागत मिळालेला दर्जा, समूहातील सहभाग, स्व-ओळख आणि इतरांच्या नजरेत असणारी 'स्व' ची ओळख या गोष्टीही वर्ग वैशिष्ट्यामध्ये महत्त्वाच्या भूमिका बजावतात.

### वर्गाची वैशिष्ट्ये

१. **संपत्ती आणि उत्पन्न :** समाजातील इतर वर्गांपेक्षा उच्च वर्गाकडे मोठ्या प्रमाणात एकवटलेल्या संपत्तीवरील मालकी हक्क हा एक महत्त्वाचा घटक असतो. सामान्यतः ज्या व्यक्तींकडे जास्त संपत्ती आणि उत्पन्न आहे त्यांनाच समाजामध्ये उच्च स्थान आणि आदर प्राप्त होतो. जरी संपत्ती आणि उत्पन्न उच्च दर्जासाठी आवश्यक असले तरी एखाद्याचे समाजातील स्थान हे केवळ त्याच्या उत्पन्नाशी जोडलेले नसते. उदाहरणार्थ, एखाद्या कार मेकॅनिकचे उत्पन्न हे शिक्षकापेक्षा जास्त असले तरी त्याचा सामाजिक दर्जा हा शिक्षकापेक्षा कमी मानला जातो. संपत्ती आणि उत्पन्न यांच्या आधारे सामाजिक वर्ग ठरविण्यात काही मर्यादा असल्या तरी उच्च जीवनशैली ही संपत्ती व उत्पन्नामुळेच मिळत असल्याने हा घटक महत्त्वाचा मानला जातो.

२. **व्यवसाय :** व्यवसाय हा सामाजिक वर्गाचा आणखी एक निर्णायक घटक आहे. काही व्यवसाय हे इतर व्यवसायांपेक्षा अधिक सन्माननीय आहेत. उदाहरणार्थ, डॉक्टर, इंजिनिअर, प्रशासकीय अधिकारी, वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक आणि वकिल यांना समाजामध्ये शारीरिक श्रम करणाऱ्यांपेक्षा उच्च दर्जा मिळतो.

व्यवसाय किंवा उद्योगधंदा हा एखाद्याच्या जीवन पद्धतीचा उत्तम निर्देशक आहे आणि म्हणूनच त्याला समाजातील वर्गामध्ये स्थान मिळवून देणारा महत्त्वाचा घटक असेही म्हणता येईल. व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरवण्याबरोबरच व्यवसाय हा घटक नीतिमूल्ये, प्रमाणके, कौटुंबिक संबंध अशा अनेक पैलूंशी देखील निगडित आहे.

३. **शिक्षण :** सामाजिक वर्ग आणि शिक्षण यांचाही अन्योन्य संबंध आहे. एखाद्या व्यक्तीचे समाजातील स्थान त्या व्यक्तीला मिळालेल्या शैक्षणिक संधींवर अवलंबून असते. उच्च शिक्षणामुळे व्यक्तींना उर्ध्व गतिशीलतेच्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे शिक्षण हे सामाजिक वर्गाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

४. **प्रतिष्ठा :** प्रतिष्ठा हा घटक समाजाकडून आदर आणि सन्मान प्राप्त झालेल्या व्यवसायाशी संबंधित आहे. समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या व्यवसायाशी निगडित प्रतिष्ठेची क्रमवारी लावण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तीला समाजामध्ये उच्च स्थान आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी संपत्ती, व्यवसाय आणि शिक्षण याव्यतिरिक्त कौटुंबिक पार्श्वभूमी, नातेसंबंध, वास्तव्याचे ठिकाण इत्यादी देखील महत्त्वाचे निर्धारक आहेत.

### ७.२.३ लिंगभाव

प्रत्येक मानवी समाजामध्ये स्तरीकरण दिसून येते. परंतु पूर्वी आर्थिक वर्ग आणि जात हेच या स्तरीकरणाचे महत्त्वाचे निकष मानले जात होते. परंतु नजीकच्या काळामध्ये महिला समाजशास्त्रज्ञांनी हे दाखवून दिले आहे की, आपल्या समाजात स्तरीकरणामध्ये लिंगभाव हा घटकही महत्त्वाची भूमिका बजावतो. लिंगभाव हा सामाजिक स्तरीकरणाचा वैश्विक पाया आहे. भारतातदेखील आपल्याला लिंगभावावर आधारित स्तरीकरण दिसून येते. लिंगभावाधिष्ठित स्तरीकरणामध्ये महिलांपेक्षा

पुरुषांना कायमच उच्च दर्जा दिला जातो.

सर्वसामान्यतः लिंगभावाधिष्ठित स्तरीकरणाची व्याख्या ही दोन भिन्न लिंगांमधील संपत्ती, अधिकार आणि मिळणारे विशेषाधिकर यांचे असलेले असमान वाटप यांच्याशी संबंधित आहे. लैंगिक विषमतेचे परीक्षण हे प्रतिष्ठा, जीवनशैली, विशेषाधिकार आणि संधी यांवर अवलंबून असते. त्याचा संबंध सामाजिक वर्ग, उत्पन्न, शिक्षण, व्यवसाय आणि अधिकाराशी जोडलेला असतो.

लिंगभाव आणि लिंग या दोन समान संज्ञा नाहीत हे जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. लिंग हे स्त्री व पुरुष यांतील शारीरिक फरकाचे निदर्शक आहे. याविरुद्ध लिंगभाव ही संकल्पना स्त्री आणि पुरुषांमधील सामाजिक भेदभाव आणि त्यांच्यातील उतरंडीशी निगडित आहे. लिंग म्हणजे स्त्री किंवा पुरुष यामधील शारीरिक भेद परंतु लिंगभाव म्हणजे पुरूषत्व आणि स्त्रीत्वाची सामाजिक जडणघडण होय. हा भेद समाजातील प्रत्येकाची वर्तणूक कशी असावी हे ठरविते. उदाहरणार्थ, पुरुषाने पुरुषाप्रमाणेच वागावे आणि धैर्य, शौर्य, शारीरिक ताकद हे ठरावीक गुण त्याच्यात असणे गरजेचे मानले जाते आणि दुसरीकडे स्त्रियांमध्ये संगोपन/सुश्रूषा, प्रेमळपणा, त्याग या गुणांमुळे स्त्रीला स्त्रीत्व प्रदान होते असे मानले जाते.



लिंगभेद

जगातील बऱ्याचशा देशांमध्ये समाजाने पुरुषांपेक्षा स्त्रियांना खूपच कमी संधी प्रदान केलेल्या दिसून येतात. जवळजवळ सर्वच समाजामध्ये लिंगभेद दिसतो. सर्वच समाजांमध्ये पुरुष हे स्त्रीयांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात. त्यामुळेच ते स्त्रियांवर वर्चस्व गाजवतात. पुरुषसत्तेमुळे पुरुषी वर्चस्वाला मान्यता मिळते. पुरुषसत्तेमधील पुरुषसत्ताक मूल्यांमुळे स्त्रियांवर वर्चस्व गाजवले जाते. स्त्रियांचे शोषण आणि पिळवणूक केली जाते. पुरुषसत्ता ही जगभर आढळत असली तरीही वेगवेगळ्या समाजातील पुरुषांना असणारे अधिकार आणि सत्तेमध्ये फरक दिसून येतो.

**'या सर्व गोष्टींमध्ये स्त्रीचे स्थान कोठे आहे?' असा प्रश्न विचारण्याची गरज आहे.**

काही समाजशास्त्रज्ञ असा दावा करतात की, समाज या शब्दाचा उपयोग करताना पुरुषी समाज अशा अर्थानेच केला जातो. याबद्दल आपण जागरुक राहिले पाहिजे आणि समाजशास्त्राने नेहमी 'समाजात स्त्रियांचे स्थान कुठे आहे?' असा प्रश्न करत रहायला हवे.

या चर्चेकरीता काही मुद्दे:

* **अर्थव्यवस्था :** यामध्ये कमी मोबदल्याची कामे, लिंगभेदावर आधारित कामे आणि मुलांचे पालनपोषण, घरकाम, सुश्रूषा यांसारखे विनापगारी काम यांचा ऊहापोह व्हायला हवा.
* **राज्यसंस्था :** मतदानाचा अधिकार, सत्तेतील प्रशासनामध्ये स्त्रियांचे असणारे स्थान, स्त्रियांचे असणारे

जागतिक नेतृत्व, युद्धामध्ये असणारी स्त्रियांची संख्या आणि शांततेची चळवळ याविषयी प्रश्न विचारण्याची गरज आहे.

* **गुन्हेगारी :** स्त्रिया किती प्रमाणात गुन्हेगारी क्षेत्रात दिसून येतात? किती स्त्रिया तुरुंगवास भोगतात? किती स्त्रिया हिंसक आहेत? खुनासारख्या गुन्ह्यामध्ये सामील आहेत? कायदा स्त्रियांचे प्रश्न कशा प्रकारे हाताळतो?
* **धर्मसंस्था :** किती स्त्रियांना जगामध्ये एखाद्या देवीचा दर्जा दिला गेला आहे किंवा किती स्त्रिया प्रवक्ता/धर्मगुरू आहेत. धर्मामध्ये स्त्रियांना कशा प्रकारे वागणूक दिली जाते. स्त्रियांना ठरावीक धार्मिक विधी, ठिकाणे किंवा दर्जा यापासून वंचित ठेवले जाते का?
* **कुटुंब :** मुलांच्या पालनपोषणातील स्त्री व पुरुषाची भूमिका, लिंगाधिष्ठित श्रम विभाजन कशाप्रकारे दिसते.
* **आरोग्य :** स्त्रियांच्या आजारपणात त्या दवाखान्यात किती वेळा जातात किंवा घरगुती उपायांवरच अवलंबून राहतात. याविषयी विचारणा व्हायला हवी तसेच त्यांना त्यांचे किमान हिमोग्लोबीनचे प्रमाण माहिती आहे का? हे माहिती करून घेणे आवश्यक आहे.

Source: Macionis and Plummer: Sociology - A Global Introduction, Pearsons, UK,2014

**उपक्रम – ३**

विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाने वरील चौकटीच्या आधारे कोणत्याही एका मुद्द्याच्या अनुषंगाने माहिती जमा करावी व या माहितीचे वर्गात सादरीकरण करावे.

### लिंगभावात्मक व्यक्तित्वाच्या ध्रुवीकरणाची पारंपरिक प्रतीके

| स्त्रीत्वाची लक्षणे | पुरुषत्वाची लक्षणे |
|---|---|
| विनम्र | वर्चस्ववादी |
| अवलंबित्व | स्वतंत्र |
| भावनिक | विवेकवादी |
| भित्री | खंबीर |
| अबला/दुर्बल | सामर्थ्यवान |
| संतुष्ट | महत्त्वाकांक्षी |
| निष्क्रिय | कार्यक्षम |
| सहकार्याची भावना | स्पर्धात्मक |
| लैंगिक दुय्यमत्व | लैंगिक आक्रमकता |
| Source: Macionis and Plummer: Sociology - A Global Introduction, Pearsons, UK, 2014 | |

आपण लहान मुलांना ज्या प्रकारची खेळणी देतो त्यातूनच त्यांचे लिंगभावात्मक सामाजीकरण सुरू होते. त्यातूनच लिंगभावात्मक उतरंडीचा पाया रचला जातो आणि त्यांच्यातील लिंगभेद स्पष्ट होत जातो. उदाहरणार्थ, मुलांना कार किंवा लेगो सेट किंवा बॅट-बॉल तर मुलींना भातुकली, मेडिकल

सेट, बाहुली इत्यादी खेळणी दिली जातात.

म्हणजेच, लिंगभावात्मक स्तरीकरण ही संकल्पना समाजातील अर्थसत्ता आणि विशेषाधिकार यांच्या लिंगाधारित विषम विभागणीशी संबंधित आहे.

## ७.३ सामाजिक गतिशीलता

बदल आणि चलनवलन याच्याशी गतिशीलता हा शब्द संबंधित आहे. तो बदल हा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी वापरला जातो. सामाजिक गतिशीलता म्हणजे एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींच्या समूहाचे समाजातील स्थान बदलणे होय.

### ७.३.१ सामाजिक गतिशीलतेचे प्रकार

१. **समस्तरीय गतिशीलता :** याचाच अर्थ दर्जा न बदलता वास्तव्य किंवा व्यवसायामध्ये केलेला किंवा झालेला बदल होय. या सामाजिक गतिशीलतेमध्ये व्यवसायामध्ये बदल झाला तरीही त्याच्या इतर सामाजिक स्थानामध्ये काहीही बदल होत नाही. काही व्यवसाय जसे की, डॉक्टर, इंजिनिअर आणि शिक्षक या सर्वांचे स्थान समान असते. परंतु एखाद्या इंजिनिअरने तांत्रिक काम सोडून इंजिनिअरिंगमधील शिक्षकी व्यवसाय स्वीकारला तर त्याचे एका व्यवसायामधून दुसऱ्या व्यवसायामध्ये स्थानांतरण होते. परंतु त्यामुळे सामाजिक स्तरीकरणाच्या व्यवस्थेमध्ये कोणताही बदल घडून येत नाही.

२. **एकरेषीय गतिशीलता :** एखाद्या व्यक्ती किंवा समूहाचा व्यावसायिक, आर्थिक किंवा राजकीय स्थानातील बदल ज्यामुळे त्यांचे समाजातील स्थान बदलते किंवा उंचावते म्हणजेच एकरेषीय गतिशीलता होय. सोरोकीनच्या मते, एखाद्या व्यक्तीचे समाजातील एका स्तरामधून त्यापेक्षा वरील स्तरामध्ये होणारे स्थानांतर म्हणजेच ऊर्ध्व गतिशीलता होय. त्याचबरोबर व्यक्तीचे आहे त्यापेक्षा खालच्या स्तरामध्ये होणारे स्थानांतर म्हणजे अधोगामी गतिशीलता होय.

३. **आंतरपिढीय गतिशीलता :** या प्रकारच्या गतिशीलतेमध्ये पुढची पिढी ही आधीच्या पिढीपेक्षा स्वतःच्या सामाजिक दर्जामध्ये खूप मोठा बदल घडवताना दिसून येते. असे असले तरी हा बदल ऊर्ध्वगामी किंवा अधोगामी असू शकतो. उदाहरणार्थ, कनिष्ठ जात किंवा वर्गातील व्यक्ती आपल्या मुलांना चांगले उच्च शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य मिळण्यासाठी वेगवेगळ्या सोई-सुविधा पुरवतात. याच्या मदतीने ही नवी पिढी उत्तम व्यवसाय किंवा नोकरी मिळवते.

४. **पिढी अंतर्गत गतिशीलता :** ही संकल्पना एकाच किंवा समान पिढीमधील गतिशीलतेशी संबंधित आहे. एखाद्या व्यक्तीच्या नोकरीची सुरुवात लिपीक या पदापासून झाली. त्याने / तिने पुढील शैक्षणिक पात्रता संपादन करून काही कालावधीतच तो/ती IFS ऑफिसर बनला/बनली किंवा उच्च पदावर गेली. यामध्ये एकाच पिढीअंतर्गत ती व्यक्ती आधीच्या स्थानापेक्षा उच्च सामाजिक स्थानावर पोहोचली यालाच पिढीअंतर्गत ऊर्ध्व गतिशीलता असे म्हटले जाते. याउलट, आहे त्यापेक्षा

खालच्या स्तरावर गेली तर त्याला पिढीअंतर्गत ‘अधोगतिशीलता’ असे म्हणतात.

**उपक्रम – ४**

आपल्या सभोवतालची आंतरपिढी आणि पिढीअंतर्गत गतिशीलतेची उदाहरणे शोधून त्याचे वर्गात सादरीकरण करा.

पूर्णतः समानतेवर आधारित समाज ही एक आदर्शवादी संकल्पनाच आहे. पण सामाजिक स्तरीकरण हे आपले वास्तव आहे. आपले काम, धार्मिक व्यवहार, नातेसंबंध आणि अगदी व्यक्तिगत अवकाशदेखील जात, वर्ग आणि लिंगभाव या स्तरीकरणाच्या प्रमुख व्यवस्थांशी निगडित आहे हे या पाठामधून तुम्हाला समजले असेल. आतापर्यंत तुमच्या लक्षात आले असेलच की आपण एका अत्यंत विषम जगात रहातो.

## सारांश

- बहुतेक समाजातील सामाजिक व्यवस्थेमध्ये सामाजिक विभागणी आणि सामाजिक स्तरीकरण हे विविध स्तरामध्ये झालेले दिसते.
- एखादी व्यक्ती किंवा समूहास उच्च किंवा कनिष्ठ अशा सामाजिक श्रेणीरचनेमध्ये स्थान मिळते त्यालाच सामाजिक स्तरीकरण असे म्हणतात.
- सामाजिक वर्गीकरण आणि सामाजिक स्तरीकरण यामध्ये फरक आहे. सामाजिक विभागणी म्हणजे समान स्तरावर होणारे सामाजिक विभाजन तर सामाजिक स्तरीकरण म्हणजे श्रेणीरचनेवर आधारित सामाजिक स्तरातील स्थान होय.
- स्तरीकरण हे सामाजिक आणि पिढ्यानपिढ्या टिकून राहते.
- सामाजिक स्तरीकरण हे सार्वत्रिक परंतु विविधांगी किंवा बदलणारे आहे.
- सामाजिक स्तरीकरण हे जात, वर्ग, लिंग या विविध घटकांवर आधारित आहे.
- जातीव्यवस्था हे बंदिस्त स्तरीकरणाचे उदाहरण आहे.
- वर्गव्यवस्था हे खुल्या स्तरीकरणाचे उदाहरण आहे.
- लिंगभाव हा सामाजिक स्तरीकरणाचा महत्त्वाचा आणि सार्वत्रिक घटक आहे.
- जेव्हा व्यक्तींचे एका स्तरातून दुसऱ्या स्तरामध्ये स्थानांतर होते तेव्हा त्याला सामाजिक गतिशीलता असे म्हणतात.

## स्वाध्याय

**प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. सामाजिक स्तरीकरण हे ------ आहे.
(स्थानिक, राष्ट्रीय, सार्वत्रिक)

२. वर्ग हा ------ स्तरीकरणाचा प्रकार आहे.
(खुल्या, बंदिस्त, ताठर)

३. लिंगाधारित स्तरीकरणामुळे समाजातील ----- वाढीस लागते.
(न्याय, पिळवणूक, समानता)

४. ------ तील सामाजिक स्तरीकरण पवित्र आणि अपवित्रतेच्या संकल्पनेवर आधारले आहे.
(वर्ग, लिंगभाव, जात)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) संपत्तीवरील मालकी हक्क - आर्थिक भांडवल

(ii) सामाजिक बाबतीतील सभासदत्व आणि सहभाग - सामाजिक भांडवल

(iii) शिक्षणामधून प्राप्त होते - सांस्कृतिक भांडवल

(iv) प्रतिष्ठा, दर्जा आणि सामाजिक सन्मान - आर्थिक भांडवल

**क) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधान पूर्ण करा.**

१. जात ही संपत्तीवर आधारित आहे.

२. ज्यामध्ये स्त्रियांना समाजातील सर्वात खालचे किंवा निम्न दर्जाचे स्थान दिले जाते, अशी उतरंड ही वर्गावर आधारित असते.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. जात - सामाजिक स्तरीकरणाचा बंदिस्त प्रकार

२. लिंगभावाधिष्ठित सामाजीकरण

**(ब) टीपा द्या.**

१. सामाजिक स्तरीकरणाची तत्त्वे.

२. डॉ. जी.एस.घुर्ये यांनी मांडलेली जातीची वैशिष्ट्ये

३. स्थलांतराचे प्रकार

**प्र. ३ फरक सांगा.**

१. जात आणि वर्ग

२. आंतरपिढीय गतिशीलता आणि पिढीअंतर्गत गतिशीलता

**प्र.४ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. उर्ध्व (vertical) गतिशीलता


२. आंतरपिढीय गतिशीलता

**प्र.५ खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. वर्गव्यवस्थेमध्ये गतिशीलता शक्य नाही

२. शिक्षण हे स्त्रियांच्या सबलीकरणाला प्रोत्साहन देते.

**प्र.६ पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**प्र. ७ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

वर्ग आणि लिंगभाव यावर आधारित स्तरीकरणाच्या प्रकारांची तुमच्या शब्दांत उदाहरणे देऊन चर्चा करा.

**उपक्रम**

बाबुराव बागुल यांची 'जेव्हा मी जात चोरली होती', दया पवार यांची 'बलुतं', उर्मिला पवार यांची 'आयदान', ओमप्रकाश वाल्मिकी यांची 'झूटन', किशोर शांताबाई काळे यांची 'अगेंस्ट ऑल ऑडस्' यापैकी कोणत्याही दोन पुस्तकांचे सामूहिक वाचन करून सामाजिक विषमता तसेच लिंगभाव विषमतेवर चर्चा करा.

***

# ८. सामाजिक परिवर्तन

**८.१ सामाजिक परिवर्तन : अर्थ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये**
**८.२ सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत ठरणारे घटक**

## प्रस्तावना

समाज नेहमीच स्थिर असतो का? इ.स.१९९१ पूर्वी जशा रोजगाराच्या संधी उपलब्ध होत्या त्याचप्रमाणे आताही आहेत का? नाशिक आणि पुण्यातील दळणवळण व्यवस्था पूर्वीप्रमाणेच आहे का? दशकांपूर्वी असणारी राजकीय परिस्थिती आताही तशीच दिसून येते का? या सर्व प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच आहेत.

संपूर्ण मानवी समाज आणि त्यांची संस्कृती या गतिशील आणि परिवर्तनशील आहेत. या पाठामध्ये आपण सामाजिक परिवर्तनाचा अर्थ, त्याची वैशिष्ट्ये आणि सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत असणारे घटक समजावून घेणार आहोत.

## ८.१ सामाजिक परिवर्तन: अर्थ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये

### ८.१.१ व्याख्या

*(१) हॅरी जॉन्सन :* "मूलभूत अर्थाने सामाजिक संरचनेमध्ये होणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

*(२) हॉर्टन आणि हंट :* "सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील सामाजिक रचना आणि सामाजिक संबंध यांतील बदल होय."

*(३) किंग्जले डेव्हिस :* "केवळ समाजाच्या संघटनात म्हणजेच समाजाच्या संरचनेत आणि कार्यात होणाऱ्या बदलांनाच सामाजिक परिवर्तन असे म्हणतात."

वरील सर्व व्याख्यांमधून असे दिसून येते की, सामाजिक परिवर्तनाचा संबंध रचनात्मक-कार्यात्मक परिवर्तनाच्या दृष्टिकोनाशी आहे. यातून असे दिसून येते की समाजाच्या रचनेतील परिवर्तनाचा त्यांचा एकमेकांशी असणाऱ्या परस्परसंबंधावर प्रभाव पडतो.

### ८.१.२ सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप

मानवी समाज परिवर्तनशील आहे. निसर्गामध्ये जसे सतत परिवर्तन होत असते त्याचप्रमाणे मानवी समाजामध्येही ते दिसून येते. समूह मग तो आदिवासी, ग्रामीण, शहरी, मागास, प्रगत किंवा संमिश्र, कसाही असला तरी तो परिवर्तन अनुभवत असतोच. परिवर्तनाचे गुणधर्म आणि परिवर्तनाची दिशा या समाजपरत्वे भिन्न असू शकतात. परंतु परिवर्तन हे अपरिहार्य असते. परिवर्तन हे संथ किंवा जलद असू शकते; परिवर्तनाचे परिणाम हे सकारात्मक/रचनात्मक किंवा नकारात्मक असू शकतात. परिवर्तन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

वरील परिच्छेदामध्ये आपण सामाजिक परिवर्तनाचे 'गुणधर्म', त्याची 'दिशा' आणि त्याची 'गती' या गोष्टींचा उल्लेख केला. या सर्व संज्ञाची सविस्तर माहिती घेऊया.

सामाजिक परिवतर्नाची काही मूलभूत वैशिष्ट्ये असतात. सामाजिक परिवर्तनाशी संबंधित ज्या काही संज्ञा आहेत त्या जाणून घेतल्यावर याची चर्चा करता येईल.

काही वेळा परिवर्तन हे एका क्रमाने आणि एका ठरावीक दिशेने एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत होत असते. उदा., ऑगस्ट कॉम्त यांनी मानवी विचारांच्या तीन अवस्थांचा सिद्धांत सांगितला आहे. हे एकरेषीय परिवर्तनाचे उदाहरण आहे. पण

परिवर्तन हे कायम एका सरळ रेषेतच होईल असे नाही, ते बहुरेषीय असू शकते. म्हणजे परिवर्तन हे एकाच वेळी अनेकविध दिशांनी किंवा मार्गांनी घडू शकते.

तसेच परिवर्तन हे चक्रीय असू शकते. उदा., फॅशन जगतात ही सामान्य बाब आहे. काही वर्षांपूर्वी लोकप्रिय असलेल्या वेशभूषा आणि केशभूषेच्या पद्धती काही वर्षांनी पुन्हा प्रचलित आणि लोकप्रिय होतात.

**उपक्रम – १**

**''पंक'' केशरचनेचा इतिहास जाणून घ्या.**

परिवर्तनाची गती ही सुद्धा वेगवेगळी असते. अर्थातच सामाजिक परिवर्तनाची संकल्पना समजून घेताना हे लक्षात ठेवले पाहिजे की नैसर्गिक शास्त्रातील अचूक मापन पद्धतींप्रमाणे परिवर्तनाची गती अचूकपणे मोजणे शक्य नाही. मात्र, परिवर्तन हे संथ किंवा जलद गतीने होत असते हे निश्चितपणे ठरवता येऊ शकते. संथ किंवा जलद या संज्ञा तुलनात्मक आहेत.

सामाजिक परिवर्तन ही संज्ञा सामाजिक संस्थांमध्ये संरचनात्मक किंवा कार्यात्मक होणाऱ्या बदलांसंदर्भात वापरण्यात येते. उदा., शासन, शिक्षण, अर्थव्यवस्था, विवाहसंस्था, कुटुंब, धर्म इत्यादी.

या दृष्टिकोनालाच संरचनात्मक कार्यवाद असे म्हणतात. समाजाचे कार्य कशाप्रकारे चालते हे पाहण्याची ही एक पद्धत आहे. हा एक व्यवस्थात्मक दृष्टिकोन आहे. ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांच्या जैविक समानतेच्या सिद्धांतामध्ये संरचनात्मक प्रकार्यवादी विचाराची मुळे सापडतात. या सिद्धान्तामध्ये त्यांनी समाज व मानवी शरीर यांची तुलना केली आहे.



हर्बर्ट स्पेन्सर

मानवी शरीराची स्वतंत्र रचना असते. त्यात शरीराचे विविध अवयव, या प्रत्येक अवयवाची स्वतःची अशी एक कार्यपद्धती असते. कार्याचा संच असतो, त्याचप्रमाणे मानवी समाजाची एक स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण रचना असते. समाजाचे वेगवेगळे घटक असतात. हे घटक एकमेकांशी संबंधित व एकमेकांवर अवलंबून असतात.

इथे आपण एका उदाहरणाचा विचार करू. आपल्या शरीरातील सर्व अवयव बहुतांश वेळी व्यवस्थित कार्य पार पाडतात. पण कधी कधी काही अवयव अकार्यक्षम होतात. उदा., जर तुमची कबड्डीची स्पर्धा असेल परंतु त्याचवेळी तुमची तब्येत बिघडली तर तुम्ही तुमच्या खेळावर लक्ष केंद्रित करू शकत नाही. तुम्हांला पूर्ववत होण्यासाठी विश्रांती किंवा उपचाराची गरज असते.

त्याचप्रमाणे समाजव्यवस्थाही काही वेळेस अकार्यक्षम होत असते. त्यामुळे मानवी समाजाला समाजामध्ये स्थिरता, समतोल आणि समानता आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. आपण पुन्हा एमिल दुरखीम यांच्या 'प्रमाणकशून्य आत्महत्या' याचा सदर्भ घेऊ. ज्या वेळेस प्रमाणके, मूल्ये यांचा अभाव असतो, अशा वेळी आत्महत्येचा विचार व्यक्तीच्या मनात येऊ शकतो.

सामाजिक संस्था जसे की शिक्षण, शासन आणि अर्थसंस्था या सामाजिक व्यवस्थेमध्ये समाविष्ट

होतात. या संस्था मानवी आचरणांचे नियमन करतात, भूमिकांचे वाटप करतात, संसाधने पुरवतात. बदलत्या कालखंडानुसार व्यक्तींच्या बदलत्या सामाजिक भूमिकांचा देखील सामाजिक परिवर्तनात समावेश होतो. अलीकडच्या काळातील माहितीच्या युगात असलेली शिक्षकाची भूमिका ही हजारो वर्षांपूर्वी वैदिक काळात असणाऱ्या शिक्षकापेक्षा कैकपटींनी वेगळी आहे. शाळांची व्याप्ती, परिसर, विद्यार्थी, शिक्षणाची साधनसामग्री, शैक्षणिक तत्त्वज्ञान, शिकवण्याची आणि मूल्यांकनाची पद्धती या सर्वांमध्ये जाणवण्याइतका बदल झालेला दिसतो.

समाज ही अशी व्यवस्था आहे ज्यात वेगवेगळे घटक समाविष्ट असतात. या व्यवस्थेत त्या घटकांमध्ये परस्परसंबंध असतो. सामाजिक संरचना ही एका जैविक व्यवस्थेप्रमाणे असते. संस्था आणि समूह हे घटक कायम कोणत्या ना कोणत्या परिवर्तनातून जात असतात. समाजामध्ये कायम संरचनात्मक बदल दिसून येतात.

उदा., कुटुंबाच्या आकाराचा संरचनेच्या दृष्टीने विचार केला तर असे दिसून येते की, एकत्र कुटुंबपद्धतीत अमूलाग्र बदल होत आहेत. तसेच कुटुंब व्यवस्थेच्या कार्यात्मकतेमध्ये देखील बदल झालेले दिसून येतात. पूर्वीच्या काळी शिक्षण हे कुटुंबाचे कार्य होते. परंतु आजच्या काळात ते शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ यांमधून देण्यात येते.

सामाजिक परिवर्तन ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यामध्ये सामाजिक परिवर्तनाची दिशा, सामाजिक परिवर्तनाची पद्धत, सामाजिक परिवर्तनाचे स्रोत, सामाजिक परिवर्तनाची कारणे आणि सामाजिक परिवर्तनाचे परिणाम या सर्वांचा अंतर्भाव होतो. कालानुरूप मानवी जीवनामध्ये होणारे बदल म्हणजेच परिवर्तन होय.

### ८.१.३ सामाजिक परिवर्तनाची वैशिष्ट्ये

**(१) सार्वत्रिकता :** सर्व मानवी समाजामध्ये परिवर्तन घडून येते. यामध्ये लोकसंख्या, सामाजिक मान्यता, संसाधने, पोशाख, रीतीरिवाज, भूमिका, संगीत, कला, स्थापत्य इत्यादींचा अंतर्भाव होतो. सामाजिक परिवर्तन हे सार्वत्रिक आहे. हे प्रत्येक ठिकाणी दिसून येते. हे परिवर्तन एकसमान नसून त्याच्या गतिमानतेमध्ये भिन्नता दिसून येते. तरीही बदल अपरिहार्यपणे होत असतो.

**(२) सतत चालणारी प्रक्रिया :** समाज हा अविरत प्रवाहाच्या स्थितीत असतो. मानवी समाजाच्या निर्मितीपासून, आदिम समूहांपासून ते आजच्या प्रगत मानवी अवस्थेपर्यंत समाजात सतत बदल सुरू आहेत.

**(३) कालबद्धता :** सामाजिक परिवर्तन हे कालबद्ध असते. परिवर्तन हे नेहमी नवीन कल्पनांचा शोध, बदल आणि विद्यमान घटकातील नूतनीकरण आणि जुनाट पद्धती सोडून देणे याला वेळ लागतो. सामाजिक परिवर्तन झपाट्याने होत नाही, तर परिवर्तनासाठी वेळ लागतो. सामाजिक परिवर्तनाची गती ही स्थानपरत्वे, कालपरत्वे आणि विशिष्ट सामाजिक संदर्भानुसार बदलत जाते.

**(४) आंतरक्रियात्मक प्रतिक्रियांची साखळी :** एखादा घटक हा ठरावीक परिवर्तनासाठी कारणीभूत ठरू शकतो. परंतु हा घटक बऱ्याचदा इतर घटकांशीही संबंधित असतो. शारीरिक, जैविक, तांत्रिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि इतर घटक हे एकत्रितरीत्या सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत ठरू शकतात. हे सामाजिक घटनांच्या परस्परावलंबित्वामुळे घडते. उदा., शाळेच्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या फीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या नोंदणीवर होतो. याचा दूरगामी परिणाम म्हणजे

शिक्षण व्यवस्थेतील मोठ्या प्रमाणावर होणारी विद्यार्थ्यांची विशेषतः विद्यार्थिनींची गळती होय.

**(५) तटस्थता :** सामाजिक परिवर्तन या संज्ञेमध्ये मूल्य निवड नसते. एक घटना म्हणून ते नैतिक किंवा अनैतिक असे काही नसते. ते नैतिकदृष्ट्या तटस्थ असते. सामाजिक परिवर्तन ही एक वस्तुनिष्ठ संज्ञा आहे.

**(६) अल्पकालीन व दीर्घकालीन परिवर्तन :** काही सामाजिक परिवर्तनाचे परिणाम हे तत्काळ दिसून येतात तर काहींचे परिणाम हे काही वर्षे/दशकांनी दिसून येतात. याचे एक उदाहरण म्हणजे एखाद्याकडे मनोरंजनाची नवीन उपकरणे खरेदी करण्याची क्षमता असेल तर ती व्यक्ती होमथिएटर लगेचच विकत घेईल आणि त्याच्या मनोरंजनाच्या साधनांमध्ये लगेच बदल दिसून येईल. परंतु सामाजिक प्रथा लवकर बदलत नाहीत. हुंडा, बालविवाह किंवा कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या सामाजिक प्रथा मोडून काढणे ही अतिशय संथ प्रक्रिया आहे. खोलवर रुजलेल्या प्रथा परंपरांचा बिमोड करून मुक्तता मिळवण्यासाठी दशके जावी लागतात.

**(७) नियोजित किंवा अनियोजित परिवर्तन :** अनियोजित या शब्दावरून आपल्या लक्षात येते की ज्यामध्ये कोणतेही नियोजन करून बदल केलेला नसतो असे परिवर्तन होय. हे अचानक होणारे परिवर्तन आहे. उदा., दुष्काळ, पूर, भूकंप, त्सुनामी इत्यादी यांसारख्या नैसर्गिक आपत्ती. जेव्हा एखादी नैसर्गिक आपत्ती येते तेव्हा मानव, प्राणिजात तसेच संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होते. अशा आपत्तीग्रस्त लोकांसाठी तत्परतेने पुनर्वसन कार्यक्रम आखणे आणि त्याची अंमलबजावणी करावी लागते.

नियोजनबद्ध परिवर्तन जाणीवपूर्वक नियोजन करून घडवून आणले जाते. आपण भारतातील शहरांचे असलेले नियोजन बघूया. या नियोजनामध्ये रहिवास, बागबगीचा, मैदाने, उपासनेच्या जागा, व्यवसाय किंवा कारखानदारीसाठी जागा, आर्थिक प्रदेश आणि इतर जागांसाठी स्थाननिश्चिती केलेली असते.



नियोजित शहर

## ८.२ सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत असणारे घटक

सामाजिक परिवर्तनासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत असणारे घटक हे वेगवेगळ्या श्रेणीअंतर्गत येतात जे नेहमी एकाच प्रकारचे नसतात. सामाजिक परिवर्तन हे अधिकाधिक घटकांमध्ये घडणाऱ्या आतंरक्रियांमुळे होते. सामाजिक परिवर्तनाच्या महत्त्वपूर्ण घटकांची माहिती पुढीलप्रमाणे :

**(१) भौतिक घटक :** या घटकाला भौगोलिक किंवा नैसर्गिक घटक असेही म्हणतात. भौतिक घटकांमध्ये हवामानाची स्थिती, भौतिक वातावरण, प्राणिजीवन, जैवविविधता, खनिजांचे स्रोत, नैसर्गिक स्रोत (नद्या, वनसंपत्ती, पर्वत) इत्यादी घटक येतात. या सर्व घटकांचा मानवी जीवनावर खूप मोठा प्रभाव पडतो. भौतिक घटक हे काही प्रमाणात सामाजिक परिवर्तनावर मर्यादा आणतात किंवा अवलंबून असतात. सामाजिक परिवर्तनाचा वेग आणि दिशा ही भौतिक वातावरणाने नियंत्रित होत असते. उपासमार किंवा दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीचाही मानवी जीवनावर दुष्परिणाम होत असतो. १९९३ मध्ये महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील भूकंपामुळे अनेक कुटुंबे विस्थापित झाली व त्याचे अनेकांना दीर्घकालीन परिणाम भोगावे लागले.

जरी असे असले तरी मानवी वसाहतींसाठी भौगोलिक परिस्थिती अनुकूलही असते. निरोगी भौतिक वातावरणामुळे मानवी समाज किती प्रगत झाला आहे याची असंख्य उदाहरणे देता येतील. उदा., जेथे पावसाचे मुबलक प्रमाण आहे, कसदार जमीन आणि खनिज संपत्ती आहे अशा ठिकाणी लोक राहतात आणि प्रगती करतात.

दुसरीकडे, मानवी वर्तनाचादेखील भौतिक वातावरणावर परिणाम होत असतो. 'विकासाच्या' नावाखाली चालणाऱ्या मानवी वर्तणुकीमुळे भौतिक पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम झालेला दिसतो. उदा. औद्योगिक प्रदूषणाचा वातावरणावर होणारा परिणाम आणि त्या अनुषंगाने जागतिक तापमान वाढीवर होणारा परिणाम, वितळत चाललेले ध्रुवांवरील बर्फ, समुद्राच्या पाण्याच्या पातळीत होणारी वाढ, काही समुद्रकिनाऱ्यांची लुप्त होत चाललेली जमीन/बेटे,



भूकंप

मर्यादित संसाधनांचे आव्हान. या सर्वांचा मानवी जीवनमानाच्या दर्जावर परिणाम होतो. त्यामुळे आजच्या परिस्थितीत सर्वांनी शाश्वत विकासाच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांना प्रोत्साहन द्यायला हवे.

**उपक्रम – २**

तुम्ही सामाजिक परिवर्तनातील भौतिक घटकांचा अभ्यास केला. आता नैसर्गिक आपत्तींचा मानव आणि सामाजिक जीवनावर कसा परिणाम होतो ते योग्य उदाहरणांसह लिहा.

**(२) जैविक घटक :** या घटकालाच लोकसांख्यिक घटक असेही म्हणतात.

**लोकसंख्याशास्त्र :** लोकसंख्याशास्त्र म्हणजे लोकसंख्येचा सांख्यिकीय अभ्यास होय. यामध्ये लोकसंख्येचा आकार, संरचना, लोकसंख्येचे वितरण या सर्वांचा समावेश होतो. तसेच यामध्ये काळानुसार आणि स्थानानुसार जन्म, मृत्यू, वार्ध्यक्य, स्थलांतर याच्या संदर्भात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या बदलाची नोंद ठेवली जाते.

जैविक मर्यादेमध्ये जे घटक समाविष्ट आहेत ते म्हणजे सामाजिक सातत्य, चिरस्थायी भाव किंवा शाश्वतता, लोकसंख्येची वाढ किंवा घट, स्थलांतर आणि स्पर्धा.


जैविक घटकांमुळे प्रभावित होणाऱ्या गोष्टी म्हणजे लोकसंख्या, लिंगरचना, जन्म आणि मृत्यू दर, प्रजनन क्षमता, पिढ्यानपिढ्या चालत आलेली वंशपरंपरागत गुणवत्ता होय. लोकसंख्येची व्याप्ती किंवा आकार आणि रचना हे घटकही सामाजिक परिवर्तन घडवण्यास कारणीभूत ठरतात.

अन्न, निवारा, बेकारी, निकृष्ट आरोग्य, गरिबी, राहणीमानाचा निकृष्ट दर्जा इत्यादी समस्या या लोकसंख्येतील बदलावर थेट परिणाम करतात. तसेच अति लोकसंख्या किंवा कमी लोकसंख्येचाही देशाच्या विकासावर परिणाम होत असतो. यामुळे प्रादेशिक असमतोल, घनतेमध्ये बदल, लिंग गुणोत्तरात असणारी तफावत हे सर्व समाजावर परिणाम करतात. लोकसंख्येच्या आकारमानामुळे सामाजिक, आर्थिक विकास आणि संधींची उपलब्धतता यावर परिणाम होतो. उदा., काही समाजांतील ज्येष्ठ नागरिकांची वाढती लोकसंख्या आणि युवकांची घटती संख्या **हे** त्या समाजासाठी नवीन आव्हाने निर्माण करतात.

**लिंग गुणोत्तर:** लिंग गुणोत्तर म्हणजे कोणत्याही लोकसंख्येमध्ये दरहजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या होय.

**हे माहिती आहे का?**

| वर्ष | संपूर्ण लोकसंख्येमधील लिंग गुणोत्तर | लहान बालकांमधील लिंग गुणोत्तर |
|---|---|---|
| १९९१ | ९२७ | ९४५ |
| २००१ | ९३३ | ९२७ |
| २०११ | ९४० | ९१४ |




भारतातील विषम लिंगगुणोत्तराचा आलेख

**(३) सामाजिक–सांस्कृतिक घटक :** मानवी संस्कृती ही परिवर्तनाची एक प्रक्रिया आहे. समाजाच्या एका सांस्कृतिक घटकात होणारे परिवर्तन संपूर्ण सामाजिक बदलासाठी कारणीभूत होऊ शकते. जेथे दोन संस्कृती या समोरासमोर येतात किंवा भिडतात तेथे सामाजिक परिवर्तन अपरिहार्य असते. सांस्कृतिक

प्रसरण हा परिवर्तनाचा एक स्रोत आहे. संस्कृतीमध्ये मूल्ये, प्रमाणके, कल्पना आणि विचारधारा, नैतिकता, रीतिरिवाज आणि परंपरा या येतात. हे सर्व परिवर्तनाचे घटक आणि कारणे देखील आहेत.

सामाजिक परिवर्तनामध्ये सांस्कृतिक मूल्ये आणि विचारप्रणाली किती महत्त्वाची भूमिका बजावतात हे काही उदाहरणांवरून स्पष्ट होते. जीवशास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन, मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉईड आणि विचारवंत कार्ल मार्क्स यांनी मागील शतकामध्ये संपूर्ण जगामध्ये मांडलेल्या काही महत्त्वपूर्ण संकल्पनांचा प्रभाव आजही कायम टिकलेला दिसून येतो. विचार आणि सांस्कृतिक मूल्यांची सामाजिक परिवर्तनामध्ये काय महत्त्वाची भूमिका काय आहे हे समजून घेण्यासाठी आपण काही उदाहरणे बघू. जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबरने सामाजिक परिवर्तनातील सांस्कृतिक घटकाला महत्त्व दिले आहे. त्यांनी आपल्या 'Protestant Ethics and the Spirit of Capitalism' या प्रसिद्‌ध पुस्तकात प्रोटेस्टंट धर्माची शिकवण आणि भांडवलशाहीचा प्रसार याचा आंतरसंबंध दाखवून दिला आहे.

दुसरीकडे सांस्कृतिक मूल्यांचा नकारात्मक परिणामदेखील होऊ शकतो. धार्मिक कट्टरतावाद, जहालवादी विचार, रीतिरिवाज, अंधश्रद्‌धा, चुकीचा भौतिकवाद, निरुपयोगी मूल्ये असे विचारधारांचे काही नकारात्मक परिणाम हे अचानक उद्‌भवणारी संकटे आणि मानवी दुर्दशेमध्ये भर घालत असतात. हे परिवर्तनात अडथळे निर्माण करतात.

**(४) आर्थिक घटक :** सामाजिक परिवर्तनामध्ये या घटकाला खूप महत्त्व आहे. मानवी इतिहासातील आर्थिक विकासाचे टप्पे हे आर्थिक परिवर्तनाबरोबरच राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाचे देखील निर्देशक आहेत. प्रगत राहणीमान आणि मानवी कल्याण हाच आर्थिक परिवर्तनाचा मूलभूत हेतू असतो.

आर्थिक विकास हा विविध संस्थांवर परिणाम करतो. पहिल्या पाठामध्ये आपण औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक क्रांतीचा मानवी समाजावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला. मोठ्या उद्योगांचे वाढणारे प्रमाण, वाढते शहरीकरण, रोजगाराच्या संधी, व्यावसायिकता, पिळवणूक, व्यापारातील संघटनवाद आणि इतर गोष्टींना चालना देते.

आर्थिक स्पर्धेमधून वर्गसंघर्ष व वाढणारा भौतिकवाद अशा गोष्टी निष्पन्न होतात. अलीकडच्या काळात वर्गांमध्ये सतत विभाजन होताना दिसते. कार्ल मार्क्सचा प्रसिद्‌ध 'वर्ग संघर्ष सिद्‌धान्त' हा दुसऱ्या पाठामध्ये चर्चिला गेला आहे. सामाजिक परिवर्तन आणि समाजातील अन्यायाविरुद्‌ध असणाऱ्या चळवळी समजून घेण्यासाठी 'संघर्षात्मक दृष्टिकोन' हा महत्वपूर्ण भूमिका पार पाडतो. उदा., शेतकरी चळवळ, स्त्रियांची चळवळ, कामगार चळवळ, उदारमतवादी चळवळ, समान हक्क चळवळ, विद्यार्थी चळवळ, आदिवासी चळवळ इत्यादी. संघर्षवादी विचारवंत संघर्ष हा समाजातील परिवर्तनाचा पाया मानतात. याउलट 'कार्यवादी दृष्टिकोन' हा समाजातील स्थिरता आणि समतोलावर अधिक भर देतो.

तुम्ही 'उत्तर-जागतिकीकरणाच्या' युगातील विद्यार्थी आहात. जागतिकीकरण ही भारतीय समाजावर मोठा परिणाम करणारी प्रक्रिया आहे. १९९१ मध्ये भारत सरकारने स्वीकारलेल्या उदारमतवाद, खाजगीकरण, जागतिकीकरणाच्या धोरणाचा (LPG) आपल्या राजकीय संस्था, अर्थव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, शिक्षणव्यवस्था इत्यादींवर दूरगामी परिणाम झाला आहे.

**उपक्रम – ३**

जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेऊन आपल्या सभोवताली जागतिकीकरणामुळे काय काय बदल घडले आहेत त्याचे निरीक्षण करा.

**(५) तांत्रिक घटक :** एखाद्या समाजातील तांत्रिक प्रगती हा त्या समाजाच्या सभ्यतेचा मोठा मापदंड समजला जातो. मात्र, आज विकासातील तंत्रज्ञानाच्या भूमिकेबद्दल खूप चर्चा सुरू आहे. 'विकास' म्हणजे काय? विकास कोणासाठी? विकासासाठी किती किंमत मोजावी लागते? हे सर्व प्रश्न आज उपस्थित केले जात आहेत. तरीदेखील हे मान्य करावे लागेल की, तंत्रज्ञान हा मानवी प्रगतीचा निर्विवाद घटक आहे.

मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनावर तांत्रिक बदलांचा परिणाम होत असतो. उदा., भारतामध्ये ब्रिटिश काळापासून दळणवळण आणि संपर्क साधनांची व्यवस्था आहे. त्याकाळी असणाऱ्या वसाहतींची गरज या सेवा भागवत असतील परंतु त्यानंतरही नवीन व्यवस्था उपयोगात येत आहेत. पुढील काळात भारत सरकारने या सेवा विस्तारित आणि विकसित केल्या आहेत.

आपले दैनंदिन जीवन हे तंत्रज्ञानाच्या परिणामाने मोठ्या प्रमाणावर प्रभावित होत आहे. आपल्या घरापासून ते कामाच्या जागेपर्यंत, खेळ, मनोरंजन, मतदान, बँकींग, ई-कॉमर्स, ई-बिझिनेस, ई-गव्हर्नन्स, प्रवास इत्यादी. नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधामुळे, आज ई-लर्निंग, ई-लायब्ररी, ई-कॉमर्स, ई-टिकिटींग, ऑनलाईन मार्केटिंग, ऑनलाईन परीक्षांमधील संधी हे शक्य झाले आहे.



मेट्रो प्रकल्प

आपण डिजिटल युगामध्ये राहत आहोत. एका बाजूला आपण नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहोत, तर दुसऱ्या बाजूला रोज उपाशी झोपणारे, आरोग्याची काळजी न घेऊ शकणारे, उत्तम शिक्षण न मिळू शकणारे किंवा ज्यांना निवाराच नाही असे लोकही आहेत ही खंत आहे. डीजिटायझेशन मुळे अशा गरजू लोकांपर्यंत पोहचण्यात सरकारला मदत होत आहे.

**उपक्रम ४**

सामाजिक परिवर्तनातील तांत्रिक घटकाचे महत्त्व तुम्हांला समजले असेल. आता, तुम्ही तुमच्या शेजारील दहा कुटुंबांच्या रोजच्या जीवनात आधुनिक तंत्रज्ञानाचा त्यांना कसा उपयोग होतो याची माहिती गोळा करा.

**(६) शैक्षणिक घटक :** शिक्षणाबाबतचे दुर्लक्ष, जागरूकतेची कमतरता आणि अनास्था हे परिवर्तनात अडथळे निर्माण करतात. विविध साधनांद्वारे शिक्षण-औपचारिक शिक्षण, सहज शिक्षण, अनौपचारिक शिक्षण आणि खुले किंवा दूरशिक्षण अशा शिक्षणाच्या संधी आज उपलब्ध आहेत.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

शिक्षण हे कल्पनांच्या आणि कौशल्यांचा विकासाचे, समस्या सोडवण्याचे, लोकांना परिवर्तित करण्याचे साधन आहे. शिक्षणातून लोक ज्ञान, कौशल्य, कार्यक्षमता मिळवतात आणि त्याचा उपयोग नोकरी किंवा स्वतःच्या व्यवसायासाठी करतात. शिक्षणाच्या हक्काच्यामार्फत (RTE) समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचवण्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले आहेत.

शिक्षणाचा हेतू, त्याची सामग्री, त्याच्या अध्यापन पद्धती हे सर्व आज बदलत आहेत. तंत्रज्ञानाचा शिक्षणामध्ये केला जाणारा उपयोग-, ई-लर्निंग, ऑनलाईन शिक्षण (उदा., MOOCS), स्मार्ट बोर्डस्, आभासी वर्ग, नॅशनल डिजिटल लायब्ररी इत्यादीद्वारे शिक्षण अगदी दूरपर्यंत पोहचले आहे.

सरकारच्या प्रयत्नांमुळे बऱ्याच लोकांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे.

लिंगबदल करणाऱ्या व्यक्तींना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) विशेष प्रयत्न केले आहेत. अनेक विद्यापीठांनी अभ्यासक्रमांसाठी लिंगबदल केलेल्या व्यक्तींना प्रवेश देण्यास सुरुवात केली आहे. गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना बऱ्याच समाजसेवकांमार्फत शिष्यवृत्ती दिली जाते. शिक्षण मानवाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणते.

**उपक्रम – ५**

मागील १० वर्षांतील शिक्षणाच्या परिवर्तनाबद्दल माहिती मिळवा. (उदा., Teach for India Campaign)

मानवी समाजामध्ये सतत परिवर्तन होत असते. या पाठामधून सामाजिक परिवर्तन म्हणजे काय हे समजले असेल तसेच सामाजिक, परिवर्तनाच्या जैविक, सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, तांत्रिक आणि शैक्षणिक घटकांची ओळख देखील तुम्हांला झाली आहे. आपल्या आसपासचे बदल समजून घ्यायला तुम्हांला निश्चितच या पाठाचा उपयोग होईल.

**सारांश**

- मानवी जीवन गतिशील प्रक्रियेतून जात आहे. परिवर्तन सर्वत्र दिसून येणारा घटक आहे. परिवर्तन हे अपरिहार्य आहे.
- समाजशास्त्र हे समाजाचा सांख्यिकी आणि गतिशील दृष्टिकोनातून अभ्यास करते.
- समाजशास्त्र समाजाचा संरचनात्मक आणि कार्यात्मक दृष्टिकोनातून अभ्यास करते. सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील संरचना आणि कार्यात्मकता यामध्ये दिसून येणारे बदल.
- सामाजिक परिवर्तनाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत : सतत चालणारी प्रक्रिया, तात्पुरता गुण, एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या घटना, नैतिक तटस्थता, कमी कालावधी आणि जास्त कालावधीसाठी परिवर्तन, नियोजित आणि अनियोजित परिवर्तन इत्यादी.
- सामाजिक परिवर्तनासाठी अनेक घटक कारणीभूत ठरतात. सामाजिक परिवर्तन केवळ एकाच घटकावर अवलंबून नसते.
- समाजामध्ये परिवर्तनासाठी कारणीभूत घटक- भौतिक किंवा भौगोलिक घटक, जैविक घटक, सामाजिक-सांस्कृतिक घटक, आर्थिक घटक, तांत्रिक घटक आणि शैक्षणिक घटक.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. सामाजिक परिवर्तन ही संज्ञा ......... आहे.
(मूल्ययुक्त, नैतिक, पूर्वग्रहित)

२. भूकंपाचा लोकांवर होणारा परिणाम हा .......... परिवर्तनाचा घटक आहे.
(भौगोलिक, जैविक, सांस्कृतिक)

३. लिंगगुणोत्तराचा अभ्यास हा .......... परिवर्तनाचा घटक आहे.
(जैविक, तांत्रिक, नैसर्गिक)

४. एखाद्या शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन कार्यक्रम हे ...... सामाजिक परिवर्तनाचे उदाहरण आहे.
(नियोजित, अनियोजित, क्रांतीकारी)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) भूकंप - भौतिक घटक
(ii) धार्मिक कट्टरतावाद - जैविक घटक
(iii) वाढते शहरीकरण - आर्थिक घटक
(iv) ई-गव्हर्नन्स - तांत्रिक घटक

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| भौतिक घटक, शैक्षणिक घटक, आर्थिक घटक |
|---|

१. किनारपट्टीच्या प्रदेशामध्ये वाढणारी समुद्राच्या पाण्याची पातळी -

२. लैंगिक शोषणाविषयीच्या समस्येविषयी जाणीवजागृती निर्माण करण -

**(ड) अधोरेखित शब्दांच्या जागी योग्य शब्द लिहून विधान पूर्ण करा.**

१. सामाजिक परिवर्तन फक्त <u>एकरेषीय</u> असते.

२. सर्व शिक्षकांनी वर्गामध्ये एखादा भाग शिकवताना पूर्वतयारी करणे, हे <u>अनियोजित</u> परिवर्तनाचे उदाहरण आहे.

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. नियोजित परिवर्तन-अनियोजित परिवर्तन
२. अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिवर्तन

**प्र.४ पुढील संकल्पना उदाहरणासहित स्पष्ट करा.**

१. सामाजिक परिवर्तन
२. अल्पकालीन परिवर्तन

**प्र.५ खालील विधाने चूक की बरोबर हे सकारण स्पष्ट करा.**

१. माहिती नसणाऱ्या गोष्टींबद्दल असणारे पूर्वग्रह आणि भीती या परिवर्तनात अडथळा निर्माण करणाऱ्या गोष्टी आहेत.

२. सामाजिक परिवर्तनाचे अचूक अंदाज वर्तवता येतात.

**प्र.६ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**

प्रत्येक संकल्पनेमधील परिवर्तनाचा महत्वपूर्ण घटक ओळखा.

| | |
|---|---|
| शोध | |
| भूकंपाचे परिणाम | |
| घसरत जाणारे लिंगगुणोत्तर | |
| विद्यार्थी अदलाबदल कार्यक्रम (Student exchange programme) | |

**(ब) आपले मत नोंदवा.**

१. तुमच्या स्थानिक भागात घडलेला महत्वपूर्ण बदल सांगा जो तुमच्या मते परिवर्तनाचा परिणाम आहे.

२. 'स्वच्छ भारत अभियान' याचा समाजावर सकारात्मक परिणाम झाला आहे, असे तुम्हांला वाटते का? तुमचा अनुभव लिहा.

**उपक्रम**

गेल्या एका दशकामध्ये युवकांच्या वेशभूषेमध्ये किंवा खानपान पद्धतीत कसा फरक पडला आहे यावर छायाचित्र निबंध (photo essay) तयार करा.

***




# विभाग II

* कृतिपत्रिकेमध्ये या उताऱ्यांवर शिक्षकांनी प्रश्न विचारणे अपेक्षित आहे.

१. समाजशास्त्र एक शास्त्र म्हणून आपण ज्या समाजात रहातो त्या समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करायला शिकवते. अर्थातच ही प्रेरणा आपण नैसर्गिक शास्त्रांकडून घेतली आहे. समाजाचा पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी ऑगस्ट कॉम्तनी वैज्ञानिक अभ्यासपद्धती वापरली. ऑगस्ट कॉम्त हे मूळचे फ्रान्सचे. अर्थातच त्या वेळच्या अडथळ्यांच्या आणि संघर्षाच्या परिस्थितीचा परिणाम ऑगस्ट कॉम्तच्या विचारांवर झाला होता. फ्रेंच राज्यक्रांती तर आपण ऐकून आहोत. तसेच औद्योगिक क्रांतीचाही त्या समाजावर परिणाम झालेला होता. एकूणच फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती यांचा परिपाक म्हणून फ्रान्समधील जनजीवन बदलून गेले होते.

समाजशास्त्र एक शास्त्र म्हणून विशेषतः युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात विकसित झाले. समाजशास्त्राच्या या विकास प्रक्रियेतूनच ऑगस्ट कॉम्त, हर्बट स्पेन्सर, एमिल डरखाईम, कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर यांसारखे अभिजात विचारवंत/समाजशास्त्रज्ञ उदयास आले. समाजशास्त्राचा विकास उत्तर अमेरिकेत देखील झाला. यामध्ये विशेषतः सी.एच्.कुले, टॉलकॉट पार्सन्स आणि मर्टन ह्यांचा उल्लेख करावा लागेल. समाजशास्त्राचा विकास भारतामध्ये देखील झाला. यात विशेषतः जी.एस.घुर्ये, एम्.एन्. श्रीनिवास, टी.के. ओमेन, गेल् ऑम्वेट आणि मुखर्जी ह्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रभावातून भारतात समाजशास्त्र ही एक शैक्षणिक विद्याशाखा म्हणून पाहिली गेली. भारतामध्ये समाजशास्त्राचा अभ्यास करताना भारतीय संस्कृती, राहणीमान, भाषा, आचारविचार ह्यांचा विचार करून जात, आदिवासी समुदाय, सामाजिक परिवर्तन, सामाजिक समस्या, शिक्षण, सामाजिक चळवळी, ग्रामीण समाजशास्त्र, उपयोजित समाजशास्त्र ह्यांसारख्या मुद्द्यांचा विचार केला गेला.

अशाप्रकारे समाजशास्त्राचा अभ्यास किंवा समाजशास्त्र ही शाखा समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यासाठी समर्पक आणि उपयोगी असून त्याची व्याप्ती खूप विशाल आणि गतिशील आहे.

२. १९ व्या शतकात फ्रान्समध्ये ऑगस्त कॉम्त यांनी समाजशास्त्राचा पाया रचला. सामाजिक वास्तव परिस्थिती वैज्ञानिक पद्धतींतून अभ्यासता येते या गृहितकावर त्यांचा प्रत्यक्षवादी दृष्टीकोन आधारित होता.

समाजशास्त्र या स्वतंत्र विद्याशाखेमध्ये अनेक पाश्चिमात्त्य आणि भारतीय विचारवंतांनी योगदान दिले आहे.

हा परिच्छेद केवळ एका दृष्टीकोनावर लक्ष केंद्रित करतो – संरचनात्मक कार्यवाही दृष्टीकोन. यालाच संरचनात्मक कार्यवाद असेही म्हणतात.

हा दृष्टीकोन स्पेन्सर यांच्या जैविक सिद्धांतावर आधारित आहे. त्यात समाजाची जैविक संस्थेशी तुलना केली गेली आहे. ज्याप्रमाणे विविध अवयवांचे मिळून संपूर्ण शरीर तयार होते तसेच समाज सुद्धा लग्न, कुटुंब, अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, शिक्षण आणि धर्म या व्यवस्थांचा बनलेला आहे.

या प्रत्येक व्यवस्था स्वतंत्र असतात तसेच त्या एकमेकावर अवलंबून देखील असतात. यालाच उपव्यवस्था असेही म्हटले जाते. प्रत्येक उपव्यवस्था स्वतःचे कार्य करते. परंतु कधीकधी यात समस्या देखील उद्भवतात. त्यामुळे व्यवस्था अकार्यक्षम देखील होऊ शकते. व्यवस्थेचे भाग व उपभाग परस्पर संबंधित आहेत. समाजाचे काम समजून घेण्याचा हा एक पर्याय आहे.

**३.** शहरांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या प्रमाणात लोक जेथे राहतात. मुंबईसारख्या शहरात १७ दशलक्ष लोक राहातात. ह्यासारख्या शहरांना 'महानगरे' म्हणतात. भारतात अशी बरीच महानगरे आहेत. यामध्ये मुंबई, चेन्नई, कोलकाता, पुणे बेंगळुर, हैदराबाद, अहमदाबाद, सूरत, कानपूर, विशाखापट्टणम्, पाटणा, विजयवाडा, जमशेदपूर ह्यांचा उल्लेख करता येईल. परंतु अशा प्रकारच्या महानगरांमध्ये दिल्या गेलेल्या पायाभूत सुविधा आणि सेवा आणि लोकसंख्या, वाढत्या मागण्या ह्यांचा मेळ कधीच बसत नाही. परिणामस्वरूप शहरांमध्ये बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते; यामध्ये घरांची समस्या, रस्ते, दळणवळणाची सुविधा, मनोरंजनाची साधने, क्रीडांगणे, आरोग्य सुविधा, मोकळ्या जागा आणि हरित क्षेत्रांचे प्रश्न समोर उभे राहतात.

आज शासनाकडून ह्या समस्यांवर मात करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न चालू आहेत. जे विशेषतः अधिक पायाभूत सुविधा आणि सेवा पुरवण्यासाठी केले जात आहेत. परंतु काही वेळा राजकीय इच्छाशक्ती कमी पडते. काही वेळा राजकीय दूरदृष्टी कमी पडते, तर काही वेळा वैयक्तिक स्वार्थासाठी केलेल्या लाचलुचपतीमुळे सामान्य जनतेला आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा ह्यामध्ये अडथळे निर्माण होतात.

खरे पाहता, 'शहरे' ही नवनवीन संधीची जागा असते. ह्यामुळेच लोक शहरांकडे आकर्षिले जातात. शहरातील ही संधी लोकांना अभ्यास, काम आणि शहरी जीवनमान या रूपात मिळते. लोकांचे ह्या कारणांसाठी शहरी भागाकडे आकर्षित होणे ह्या क्रियेलाच 'स्थलांतर' असे म्हणतात. महानगरे ह्याच कारणांमुळे लोकांच्या आकर्षणाची केंद्रे बनली आहेत.

**४.** तुम्हाला कधी आश्चर्य वाटते का? की आपण कसे जगतो? कोणत्याही सामाजिक नातेसंबंधांमध्ये आपण काय विचार करतो आणि एकमेकांशी कसे वागतो? या आपल्या नातेसंबंधावर गुंतागुंतीच्या घटकांचा प्रभाव असतो का?.

**पुढील छोटी कथा वाचा.**

श्री व सौ शहा यांचे १९९४ साली आधी कोर्टात लग्न झाले. नंतर धार्मिक विधी देखील करण्यात आले. त्यांना २००३ साली दोन जुळी मुले झाली आणि चार वर्षे घरी राहिल्यानंतर ते शाळेत गेले. त्यानंतर त्यांनी खाजगी विनाअनुदानित शाळेत प्रवेश घेतला. परिणामतः त्याभागातील राज्य शिक्षण मंडाळाच्या शाळांपेक्षा त्यांच्या शाळेचे शुल्क अधिक होते.

दोघे पालक व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांच्याकडे मुलांना महागडे शालेय शिक्षण देण्यासाठी आर्थिक साधने उपलब्ध होती. त्यांच्या वर्गातील मुले मध्यम व उच्च वर्गातील होती. शाळेत मात्र कमी आर्थिक उत्पन्न वर्गातील मुलांसाठी सामाजिक कामाची संधी दिली जात असे. उच्च वर्गातील असूनदेखील शहा यांची जुळे मुले बिगरशासकीय संस्थेमध्ये जाऊन सामाजिक काम करण्याचा हा साप्ताहिक अनुभव उपभोगत असत.

हे दोन्ही तरूण आज सामाजिक कामात सहभागी आहेत. त्यातील एक स्थानिक राजकीय पक्षात युवा आघाडीत काम करतो तर दुसऱ्याने गरजू लोकांपर्यंत पोहोचून त्यांना मदतीचा हात देणाऱ्या आंतरराष्ट्रीय उपक्रमात सहभाग घेतला आहे.

त्या जुळ्या मुलांमध्ये निर्माण झालेल्या संवेदनशीलतेकडे पाहून त्यांचा पालकांना अतिशय आनंद झाला आहे. कुटुंब आणि शाळा या मुलांना संवेदनशील बनविण्यास कारणीभूत आहेत, असे आपणास वाटते काय?

५. संस्कृती या संज्ञेचा सामान्यतः वापर लोकांच्या अभिरुचीच्या संदर्भात केला जातो. उदा., शास्त्रीय संगीत, साहित्य, कलेची अभिरुची. पण समाजशास्त्रात संस्कृती या संकल्पनेत मानवाने निर्माण केलेल्या सर्वच गोष्टींचा समावेश होतो. विचार, मूल्य, धारणा, भाषा, ज्ञान आणि मानवाने समाजाचा घटक म्हणून निर्माण केलेल्या सर्व भौतिक घटकांचा समावेश संस्कृतीत होतो. भारतीयांच्या बाबतीत बोलायचं तर आपण नेहमी बोलताना किंवा वैचारिक व्यासपीठांवरही 'भारतीय संस्कृती' असा उल्लेख करत असतो. पण 'भारतीय संस्कृती' म्हणजे नेमकी काय आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. 'भारतीय' अशी एक सर्वसमावेशक, सर्वसामान्य सांस्कृतिक ओळख आहे का? ह्याचे उत्तर तपासून बघताना दुसरीकडे चायनीज, इंडोनेशियन संस्कृतींपेक्षा आपली वेगळी ओळख ठसवणारी आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे. ती कोणत्या घटकांमुळे हेदेखील लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. आपला इतिहास, आपली भौगोलिक सीमा, इथले शासक, इथे झालेली आक्रमणं आणि त्यातून निर्माण झालेल्या एकात्मीकरण व संकरीकरणातूनच आपली 'भारतीय' संस्कृती विकसित झाली आहे. भारतीय समाज बहुविध संस्कृतींनी नटलेला आहे आणि बहुसांस्कृतिकता हे आपले बलस्थान आहे.

समाजशास्त्रात उपसंस्कृती अशी एक संकल्पना वापरली जाते. भारतीय संस्कृती म्हणजे अशा अनेक उपसंस्कृतींनी बनलेली आहे. काही वेळा प्रस्थापित संस्कृतीला आव्हान देणारी विरोधी संस्कृती निर्माण होते हेदेखील लक्षात घेतले पाहिजे.

आज प्रसार माध्यमांच्या प्रगतीमुळे जगभरातील संस्कृतींशी आपली ओळख होत आहे. दूरदर्शन आणि इंटरनेटमुळे जग जवळ येत आहे आणि एका अर्थाने छोटे होत चाललेय. आज वैश्विक संस्कृती, अशी नवीन संज्ञा आपण वापरतो. त्यामुळे खऱ्या अर्थाने कुठलीही संस्कृती शुद्ध किंवा सरमिसळ नसलेली राहिली आहे का हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

६. आजकालच्या जगात टेलिव्हिजन, इंटरनेट, मोबाइल ह्यांचे अनेक महत्त्व वाढले आहे की, त्याशिवाय जग ही कल्पनाच आपण करू शकत नाही. आपल्या जगण्याला खऱ्या अर्थाने माहितीच्या युगात परिवर्तित करण्यात ह्या सर्व साधनांचा पुरेपूर वाटा आहे. काही वेळा आपण ह्याला ज्ञानाचा किंवा माहितीचा विस्फोट असेही म्हणू शकतो. सध्या आपल्याकडे इतकी माहिती उपलब्ध आहे जी एका क्षणात आपणास इंटरनेटकडून मिळू शकते. पण ही मिळणारी माहिती अचूक, योग्य आणि किती वैध आहे याविषयी साशंकता उरते. अशा प्रकारच्या परिस्थितीमध्ये ज्या तांत्रिक साधनाद्वारे ही माहिती घेण्यात आली आहे ती माहिती इतर अनेक छपाई माध्यमांद्वारे तपासून त्यांची शहानिशा करून घेतली पाहिजे. आजकाल अंकेक्षणामुळे (Digitalization) कोणत्याही क्षणी कोणतीही माहिती सामान्य लोक इंटरनेटच्या माध्यमातून संक्रमित करू शकतात. स्वतःच्या नावाने एखाद्या विषयावरील माहिती संकलित करून ती संक्रमित करणे हा लोकांचा उद्योगच झाला आहे. माहितीचे व्यवस्थापन करणे ही सुद्धा आजकाल एक कामाची संधी म्हणून पाहिली जात आहे, विशेषतः ज्या लोकांकडे एखादा कार्यक्रम किंवा योजना विकसित करण्याचे कौशल्य आहे. खरोखरच माहिती तंत्रज्ञानाने आजकाल सर्वांचे जीवन व्यापून टाकले आहे. आपण 5G वगैरे आजकाल नुसतेच ऐकून आहोत. पण पुढील जग यापेक्षाही प्रगतशील तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे हे निश्चित!

७. खरंच मुलांना अग्निशामक यंत्रे आणि मुलींना कपबश्यांचा सेट आवडतात? वयाच्या कितव्या वर्षापासून मूल एखाद्या रंग अथवा खेळाशी सांगड घालू शकते? ब्लॉगवरील पुढील कथा वाचा.

माझी मैत्रीण (अंबिका) आणि तिचे दोन महिन्यांचे बाळ (टिना) व मी एकदा दुकानात गेलो होतो.

मी खेळणी ठेवलेल्या विभागाकडे गेले आणि तिथे मला अतिशय छानसा पाणघोडा (सॉफ्ट टॉय) दिसला आणि मी ते खेळणे टिनाला द्यायचा विचार केला. मी ते खेळणे टिनाला दाखवले आणि तिला त्याच्यासोबत खेळणे आवडले असे मला दिसले.

आणि मी अगदी सहज अंबिकाला सांगितले की मी हे खेळणे टिनासाठी घेणार आहे. त्यावर अंबिका म्हणाली, "पण ते निळ्या रंगाचे आहे! तू गुलाबी रंगातील एखादे खेळणे का घेत नाहीस?" हे ऐकून मला एकदम हसूच फुटले व मी म्हणाले, "पण टिनाकडे निळ्या रंगाचे खेळणे का असू शकत नाही? तुला वाटतं तिला या वयात रंग प्राधान्य/ पसंती आहे?" "तिची आई म्हणून मला माहीत आहे" अंबिका उत्तरली.

तरीदेखील मी तो निळा पाणघोडा टिनासाठी खरेदी केला. मला हे माझ्या मैत्रिणीला सांगायचं होतं की कदाचित ती तिच्या मुलीच्या वतीने सर्व ठरवतेय आणि तिला 'Girly girl" या ठरावीक साच्यात बसवू पाहतेय. परंतु हे बोलण्यापासून मी स्वतःला परावृत्त केलं कारण पालक त्यांच्या पालकत्वाबाबत केल्या गेलेल्या टिकेच्या संदर्भात संवेदनशील असू शकतात.

काही वर्षांनंतर मी टिनाला भेटले आणि ती 'Girly girl" या साच्यात बसलेली मुलगी होती. अंबिका बरोबर होती, तिला व्यवस्थित माहीत होतं की तिच्या मुलीकडून काय अपेक्षित आहे, अगदी इतक्या लहान वयात देखील!

**८. पुढे काही घटना दिल्या आहेत ज्यांचा तुम्ही कदाचित अनुभव घेतला असेल.**

**घटना अ –**

रात्री जेवणात तुमच्या पालकांनी वांग्याची भाजी बनवली आहे. संपूर्ण कुटुंब एकत्र बसून जेवतंय आणि तुम्ही म्हणता, "मला भाजी नकोय." आणि तुमचे पालक म्हणतात की पण अजून तू त्या भाजीची चव देखील घेतली नाहीस." यावर तुम्ही उत्तर देता की "पण मला नाही आवडत. जेव्हा तुम्ही मसाला भरून तळून करता तेव्हाच मला आवडते."

**घटना ब**

गुंजन नेहमी परीक्षेच्या एक आठवडा आधी अभ्यासाला सुरुवात करते. तथापि, सहामाहीत काय काय घडतंय यावर ती कायमच नीट लक्ष ठेवून असते. तिच्या शिक्षकांचे असे मत आहे की ती खूप काही करु शकते जर तिने परीक्षेची तयारी शेवटच्या क्षणाच्या ऐवजी थोडी आधीपासून केली तर! परंतु, गुंजन तिची सवय मोडायला असफल ठरतेय.

**घटना क**

तुम्ही कायमच पारंपरिक वेशभूषा वापरली आहे. तुम्ही महाविद्यालयात आल्यावर तुम्हांला जाणवतं की काही विद्यार्थी पाश्चिमात्य कपडे घालतात. तुम्हांला सुद्धा तसे कपडे घालावेसे वाटतात पण तुम्हांला खात्री नाहीये की तुमचे पालक तुम्हांला परवानगी देतील.

आपण बदलांसाठी पुरेसे प्रवृत्त केले जातो का? आपल्याला बदलण्याची परवानगी आहे? बदलापासून रोखणारी शक्ती आहे? अनुरूप पर्याय उपलब्ध आहेत?










महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी समाजशास्त्र इ. ११ वी

₹: ७६.००